म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय
दा. क. १२९५६
IRBK-0112956
IRBK-0112956

नों. क्र. १२९५६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

12 AUG 1978

1 JAN 1979

21 MAY 1980

8 JUN 1980

V

[ क्रु. मा. प. ]

॥ श्री ॥

५७३२

# ग फ ल त

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३०५१८
विभाग ५१.५१.
क्रमांक २६६८
नों. दि. ५.७.७५
ग्रंथालय शाखा

*

: लेखक :

द. मा. मिरासदार

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
वा. क्र. ७२८५६ नों दि.
वि. ५१.५१. श.

*

IRBK-0112956

IRBK-0112956

ग्रंथप्रकाशक आणि ग्रंथविक्रेते

श्रीराम प्रकाशन

ठाकुरद्वार, मुंबई २

प्रकाशिका
सौ. शैलजा भावे
श्रीराम प्रकाशन,
ठाकुरद्वार, मुंबई २

चार रुपये

प्रकाशनकाल
रथसप्तमी १८८२
२३। १। १९६१

सर्वाधिकार
लेखकाधीन

मुद्रक
ना. अ. मेहेंदळे
जीवन मुद्रणालय,
५५१ बुधवार, पुणें २

*आबा भाटे*

आणि

*हरिभाऊ बडवे*

या गांवाकडच्या मित्रांस—

# अनुक्रम


- मृगया ५
- चार लोक २३
- तलफ ३७
- शस्त्र ५२
- म्हातारा वकील ७१
- प्रदर्शन ८७
- दत्तु पैलवान १०३
- भामटा ११५
- गफलत १२८
- पाहुणे १४१

MBhole THANA
अनुक्रम ३०८९६ विभाग वा. वा. क्रमांक २४८८ नों. दि. ५।७।६१

# १ : मृगया

शस्त्रविद्येचें शिक्षण पूर्ण झाल्यानंतर कोठेंतरी सेवावृत्तीने रहावें असें मीं ठरविलें. त्याप्रमाणें मीं प्रयत्न केला आणि त्यास यश येऊन प्रासादांतील महाराजांच्या रक्षकवर्गांत माझी नियुक्ति झाली. त्यामुळें मला मोठाच हर्ष झाला. त्याचीं अनेक कारणें होतीं. एकतर प्रासादांतील राजवैभव मीं कधीं डोळ्यांनीं पाहिलेलें नव्हतें. आतां त्याच्या सन्निध रहावयास मिळणार होतें. दुसरें कारण मृगयेचें. मृगयेची मला मनांतून अत्यंत रुचि असली तरी ती प्रत्यक्ष करण्याची संधि कधींच प्राप्त झालेली नव्हती. आमचे महाराज मृगयेंत विशेष कुशल होते असें सर्व नगरवासियांत बोललें जाई. प्रतिवर्षी विजयादशमीच्या दिवशीं महाराज वनांत जाऊन मृगया करीत आणि मग राजपथावरून प्रचंड मिरवणुकीनें ते प्रासादांत प्रवेश करीत, हें मी पाहिलें होतें.तेव्हां त्यांच्या समीप राहिल्यानें आपल्यालाहि मृगयेची कला अवगत होईल हीहि इच्छा माझ्या मनांत होतीच.

प्रासादांतील एका प्रशस्त दालनांत महाराजांनीं आतांपर्यंत मारलेले प्राणी गवत भरून ठेवलेले होते. त्यांत वाघ होते, सिंह होते, अस्वलें होतीं, फार काय एका प्रचंड हत्तीचेंहि धूड होतें. मृग तर अनेक होते. ते प्राणी पाहून मला महाराजांविषयीं विशेषच कौतुक वाटूं लागलें. आपणहि असाच पराक्रम केला पाहिजे, असें मीं मनाशीं ठरवून टाकलें.

एके दिवशीं या प्रदर्शनांतून मी हिंडत असतांना अकस्मात् महाराजांची मूर्ति त्या ठिकाणीं प्रकट झाली. मी मोठ्या नम्रतेनें अभिवादन केलें. महा-

राजांच्या पाटोपाठ एक सेवक होता. त्याच्या हातांत मोठें तबक असून त्यांत विविध प्रकारचीं फळें होतीं.

आसनावर बसून फळें खात खात महाराजांनीं माझ्याबद्दल पृच्छा केली. मग ते म्हणाले,

‘ विजयसेन–का सेनाविजय, काय म्हणालास तुझें नांव ? ’

‘ विजयसेन, महाराज. ’ मी म्हटलें.

‘ जें कांहीं असेल तें. असो. तूं मृगया कधीं पाहिली आहेस ? ’

’ कोठून पहाणार महाराज ? ’

‘ हात् मूर्खा ! साधी मृगया तुला येत नाहीं अन् तूं आमचा सेवक रे कसा ? ’

मी कांहीं बोललों नाहीं.

‘ अन् युद्धांत कसें करशील ? ’

‘ शस्त्रविद्येचें माझें शिक्षण झालें आहे महाराज. युद्धांत मी खात्रीनें पराक्रम करीन. ’

‘ एकदम युद्धांत प्रवेश करणें तितकेंसें सोपें नाहीं. तेथें माणसें मारावीं लागतात. ’ महाराज तोंड हलवीत बोलले, ‘ अलीकडे बऱ्याच वर्षांत युद्धच लेकाचें झालें नाहीं. नाहींतर आम्हीं खूप माणसें ठार करून दाखविलीं असतीं– ’

मी नुसतीच मान हलवली.

‘ उद्यां आम्ही मृगयेस जाणार आहोंत. आम्हीं कशी मृगया करतों तें तुला पहावयाचें आहे ? ’ महाराजांनीं मुद्रा एकाएकीं भीषण केली. डोळे फिरवले. ‘ पण नको. तूं भिऊन जाशील. ’

‘ नाहीं महाराज. ’ मी उत्सुकतेनें म्हटलें, ‘ मला खरोखरच मृगयेची इच्छा आहे. तुम्ही आपल्याबरोबर मला न्याच. ’

‘ ठीक आहे. उद्यां विजयादशमी आहे. चल आमच्याबरोबर. तुलाहि बरेंचसें शिकावयास मिळेल. आमचें कौशल्य कळून येईल. ’

‘ होय महाराज. ’

'प्रतिवर्षी आम्हीं या दिवशीं मृगयेला जातों.' समोर ठेवलेला फळांचा ढिगारा कमी करीत महाराज अर्धस्फुट स्वरांत बोलले, 'प्रचंड पराक्रम करून परत येतों. गेल्या वर्षी आम्हीं काय केलें ठाऊक आहे तुला ?'

'काय ?'

'वनराज सिंह, एकदम खलास. हा पहा तो.'

महाराजांनीं सिंहाकडे बोट दाखवलें. मला मोठें आश्चर्य वाटलें. आमच्या या सबंध राज्यांत सिंहाचें वसतिस्थान कोठेंच नव्हतें. आणि महाराज आपलें राज्य सोडून बाहेर कोठें मृगयेसाठीं गेल्याचें कधीं ऐकिवांत नव्हतें. मग महाराजांनीं सिंह मारला तरी कसा ? एखादा चुकून भटकत भटकत आला म्हणावें कीं काय ?

मी माझी शंका महाराजांना बोलून दाखवली तेव्हां ते प्रथम गोंधळून गेलेले दिसले. नंतर त्यांचें मुख एकाएकीं क्रुद्ध झालें. इतकें कीं, समोरच्या आम्रफलांची संख्या त्यांनीं मोठ्या त्वरेनें शून्यावर आणून ठेवली.

'तें आपल्याला काय करायचें आहे ? तो सिंहाचा प्रश्न आहे. अमात्यांनीं वार्ता आणली. आम्हीं गेलों. एका घावांत दोन तुकडे. परत आलों. आतां काय तुझें म्हणणें आहे बोल ?'

जास्ती कांहीं विचारण्याची सोय नव्हती. एखाद्या वेळीं आपलेच दोन तुकडे व्हायचे. त्यापेक्षां हो ला हो म्हणावें हें बरें. अनुभवानें एवढें मला कळूं लागलें होतें.

'मग आपलें शौर्य म्हणजे—'

'विलक्षण प्रशंसनीय.' महाराज मध्येंच बोलले. 'सध्यां तरी आम्हांस तोड नाहीं. हो, पुढें कोणी निघाल्यास सांगवत नाहीं, पण कठीणच.'

'होय महाराज, हें मात्र खरें.'

'घे, हीं फळें घे.'

महाराजांच्या समवेत मींहि थोडीं फळें खाल्लीं. अशीं स्वादिष्ट आणि रसाळ फळें होतीं कीं माझें मन एकदम प्रसन्न होऊन गेलें. मुख सुगंधमय झालें. खातांखातां महाराजांनीं स्वतः केलेल्या मृगयेच्या अनेक कथा मला सांगितल्या आणि मींहि त्या अगदीं मन लावून ऐकल्या. त्यावरून मला कित्येक नवीन गोष्टी कळल्या. महाराजांचें पहिलें वैशिष्ट्य हें होतें कीं ते

मृगया एकट्यानें करीत. बरोबर प्रचंड सेना नेणें म्हणजे मृगया या शब्दाची विटंबना होय, असें त्यांचें मत होतें. अरण्यांत पाऊल टाकल्यावर ते फक्त इतरांकडून प्राण्यांचा माग काढून घेत. नंतर हातांत खड्ग घेऊन एकटे पायीं संचार करीत. आपलें लक्ष्य बरोबर शोधून केवळ हातांतील शस्त्रांच्या साह्यानें त्याची मृगया करीत. चारदोन क्षणांत ते त्या दुर्दैवी प्राण्याला यमसदनाला पाठवीत. गेलीं कित्येक वर्षें हा त्यांचा उपक्रम चालू आहे. एकदां तर हत्तीच्या गंडस्थळावर चढून त्यांनीं त्याला ठार केलें. सिंह तर त्यांनीं इतका छिन्नविच्छिन्न करून टाकला कीं मागाहून कोणाला तो ओळखतांहि येईना. पण सर्वांत मौज म्हणजे अस्वलाची. महाराजांच्या हातांत त्या वेळीं शस्त्र नव्हतें. सहज पाय मोकळे करण्यासाठीं संचार करीत असतांना एकाएकीं एक काळेंकभिन्न अस्वल त्यांच्या अंगावर धांवून आलें. त्यानें विळखाच घातला. मोठा कठीण प्रसंग. हातांत खड्ग नाहीं आणि प्रत्यक्ष मृत्यूनेंच मिठी मारलेली. पण महाराज डगमगले नाहींत. त्यांनीं आपल्या दोन्ही हातांनीं अस्वलालाच गुदगुल्या करायला प्रारंभ केला. एवढा तो हिंस्र प्राणी, पण महाराजांच्या गुदगुल्यांनीं अगदीं जेरीस आला. एकसारखा खदखदां हंसूं लागला. महाराज जसजसे गुदगुल्या करीत तसतसा तो चेकाळून हंसायचा. हंसतां हंसतां टणाटण उड्या मारायचा. शेवटीं हंसण्याची परमावधि होऊन त्यानें डोळे पांढरे केले आणि राम म्हटला. तेव्हांपासून सगळ्या अस्वलांनीं महाराजांची विलक्षण दहशत घेतली आहे. महाराज अरण्यांत घुसले कीं आतां एकहि अस्वल त्यांच्या समोर येत नाहीं. सगळे भिऊन कोठल्याकोठें पसार होतात.

ही कथा सांगून झाल्यावर महाराज अंमळ थांबले. त्यांच्या कपाळावर घर्मबिंदु सांठलेले दिसले. त्यांचे हात आणि पायहि आवेशानें थरथरत होते. पुढें आलेल्या त्यांच्या पोटालाहि हा आवेश चढला असावा. कारण तेंहि बिचारें इतर अवयवांबरोबर थरथरत होतें. फार काय, महाराजांच्या गुच्छासारख्या दिसणाऱ्या मिशाहि एका लयींत हलत होत्या.

मी मान डोलवली.

'विलक्षण, विलक्षण ! महाराज, अस्वलाला तुम्हीं केवळ गुदगुल्या करून ठार मारलें म्हणजे अगदीं सीमाच झाली.'

महाराज खो खो करून हंसले.

'ऊं !' हें कांहींच नाहीं. एकदां तर आम्हीं वाघालाच या पद्धतीनें ठार मारणार होतों–'

'या पद्धतीनें म्हणजे ? गुदगुल्या करून ?'

'मूर्ख आहेस ! वाघ कधीं असल्या गुदगुल्यांनीं मरतो वाटतें ?'

'न–नाहीं महाराज.' मी गडबडीनें चूक मान्य केली.

'मृगयेची ही एक नवीनच रीत आम्हीं शोधून काढली.'

'कोणती बरें ?'

'ज्याचें शस्त्र त्याच्यावरच उलटवायचें. अस्वलाला कसें गुदगुल्या करून ठार केलें तसें.'

'मग; वाघाला —'

'त्यासाठीं मुद्दाम आम्हीं नखें वाढवलीं होतीं. एकदम वाघावर झेंप घ्यायची आणि नखांनीं, दांतांनीं वाघाला फाडून काढायचें.'

'बापरे ! –'

'मग ! उगीच नाहीं अमात्यांनीं आम्हांला 'मृगयाधिपति' अशी पदवी दिली. वाघच लेकाचा त्या वेळीं सांपडला नाहीं म्हणून. नाहींतर—'

मी महाराजांच्याकडे नीट निरखून पाहिलें. त्यांचे दांत नाहींतरी सुळ्यांसारखे दिसतच होते. सारखें खात राहण्याच्या अभ्यासानें या सुळ्यांना विलक्षण धारहि चढलेली असावी. त्यांतून त्यांनीं नखाग्रें वाढवल्यावर कसे दिसतील ? महाराजांचा जबडा वाघापेक्षांहि रुंद होता. त्यामुळें त्या भयंकर प्राण्यापेक्षांहि हे भयंकर दिसत असतील असें मला वाटलें. महाराजांनीं खरो-खर वाघावर आक्रमण केलें असतें तर वाघाची कांहीं प्रतिकार करण्याची छाती झाली नसती.

मी असा विचार करीत होतों तोंपर्यंत महाराजांनीं आपल्या पुढ्यांतलें आणखी एक मिष्टान्नाचें ताट संपवलें होतें आणि एका सुवर्णशलाकेनें ते दंतपंक्ति कोरीत होते. त्यांचे नेत्र हळूहळू मिटत होते.

थोड्या वेळानें ते एकदम दचकून जागे झाले. डोकें झाडून म्हणाले,

'अं ? काय ठरलें ? उद्यां येणार ना मृगयेला ?'

महाराजांच्या मृगयेविषयीं मला बरेंच कुतूहल वाटूं लागलें होतें. म्हणून मी लगेच त्यांच्या पृच्छेला होकार दिला.

'होय महाराज. एकदां आपला पराक्रम डोळ्यांनीं पाहून धन्य व्हावें अशी इच्छा आहे.'

'उत्तम. मग असाच अमात्याकडे जा. त्यांना म्हणावं, आमच्या मृगयेची सिद्धता करा. उद्यां सकाळींच आम्हीं निघूं म्हणावं. संध्याकाळीं परत.'

'होय महाराज.'

'आणि हें पहा, उद्यां कोणत्या प्राण्याची मृगया करायची तेंहि सांगून ठेवा म्हणावं. म्हणजे मला रात्रीं त्यावर चिंतन करतां येईल.'

मी चकित होऊन उभा राहिलों.

'म्हणजे? हेंहि पण ठरलेलें असतें वाटतें?'

'अर्थात्. सगळें कसें योजनाबद्ध पाहिजे असें अमात्यांचें मत आहे. आमच्या मृगयेचा सगळा कार्यक्रम तेच ठरवतात. फार बुद्धिमान पुरुष बोवा!'

अधिक कांहीं पृच्छा न करतां मी तेथून निघालों. प्रासादाच्या ज्या भागांत अमात्य वसत असत तेथें येऊन पोंचलों. अमात्य फार घाईंत होते. तरी त्यांनीं माझी त्वरित भेट घेतली. मला पाहिल्यावर ते गंभीर मुद्रेनें म्हणाले,

'महाराजांना म्हणावं, उद्यांच्या मृगयेची सर्व सिद्धता आहे.'

मी आश्चर्यानें त्यांच्याकडे पहातच राहिलों.

'आपल्याला कसें कळलें मी त्यासाठीं आलों म्हणून?'

खालीं मान घालून अमात्य कागदपत्र चाळीत होते. माझ्याकडे न बघतांच ते म्हणाले,

'त्यांत कळायचंय काय! उद्यां विजयादशमी. उद्यांची मृगया ठरलेलीच असते. इथल्या राजवंशांतला तो नियमच आहे. आतां तूं दुसऱ्या कोणत्या कामासाठीं येणार?'

'बरें, महाराजांनीं आणखी विचारलें आहे—'

'काय?'

'उद्यां कोणाची मृगया करायची?'

‘ हो, तें सांगायचें राहिलेंच. ’ अमात्यांनी वर मान केली. माझ्याकडे रोखून पाहिलें. ‘ परवांच मंत्रिमंडळाची बैठक झाली. महाराजांना म्हणावं, एकमतानं आम्हीं निर्णय केला आहे. या वर्षी आपण वाघाची मृगयाच करावी. समजलें ? ’

अमात्यांच्या दृष्टींत छद्मीपणा असल्याचा मला भास झाला. नेमकें कांहीं कळलें नाहीं. कारण त्यांनीं पुन्हां आपलें मस्तक कागदत्रांत खुपसलें.

मी म्हटलें, ‘ संध्याकाळीं परत येऊं असें महाराज म्हणाले आहेत ’

‘ निश्चित. संध्याकाळीं मृगयेंतील विजयाबद्दल येथें मिरवणूकच ठरली आहे. तिला ते वेळेवर आलेच पाहिजेत. ’

मला कांहीं नीटसें कळलें नाहीं. गोंधळून जाऊन मी तसाच उभा राहिलों. मृगया निश्चित. ती व्याघ्रराजाची करायची हें निश्चित. तिच्यांतील विजयहि निश्चित. हा आहे काय प्रकार ? अमात्यांना मी नम्रपणें विचारलें तेव्हां ते म्हणाले,

‘ अरे, त्यांत काय विशेष आहे ? आपले महाराज मृगया करण्यांत फार कुशल आहेत. त्यांना असा कितीसा वेळ लागणार एक वाघ मारायला ? ’

‘ होय. मघाशींच त्यांनी मला अनेक कथा सांगितल्या. ’

‘ तें त्यांचें कौशल्य तुला प्रत्यक्ष दिसेलच. आणखी कांहीं ? ’

‘ कांहीं नाहीं. ’

‘ ठीक आहे. ’

ही मला जाण्याची सूचना होती. अमात्यांचा निरोप घेऊन परत आलों. सर्व निरोप महाराजांना सांगितला. मृगयेसाठीं कांहीं वस्त्रें निवडलीं. शस्त्रागारांत जाऊन कांहीं विशेष शस्त्रें पारखून घेतलीं. तोंपर्यंत रात्र झालीच. प्रातःकाळीं लवकर निघायचें म्हणून लवकरच शय्येवर अंग टाकलें

प्रातःकाल होऊन सूर्योदय होईपर्यंत मी मृगयेचीं वस्त्रें चढवून सिद्ध झालों होतों तथापि प्रत्यक्ष नगरीबाहेर पडेंपर्यंत बराच उशीर लागला. कारण महाराजांची सिद्धता व्हायला बराच वेळ लागला. तिघांचौघांनीं मिळून त्यांच्या अंगावर वस्त्रें चढविलीं तोंपर्यंत महाराजांचा सकाळचा आहार एकसारखा चालला होता. प्रथम त्यांनी लाडू खाल्ले. नंतर दूध पिऊन फलाहार केला. मग तोंडाला चव यावी म्हणून कांहीं सुकीं फळें तोंडांत टाकलीं त्याचा

परिणाम असा झाला कीं आधीं चढवलेलीं वस्त्रें फारच दाटून तंग बसलीं. त्यामुळें महाराज इतके संतप्त झाले कीं मृगयेचा कार्यक्रम आतां या ठिकाणींच पार पडतो कीं काय अशी भीति मला वाटूं लागली. अखेर दोनतीन तास या प्रकारांत मोडल्यानंतर एकदांची सर्व सिद्धता पूर्ण झाली आणि अश्वारूढ होऊन आम्हीं निघालों. सर्वांत पुढें महाराज, त्यांच्या मागोमाग मी आणि इतर सेवक. कांहीं सेवकांच्या हातांत मृगयेचीं विविध शस्त्रें होतीं. बाकी बहुतेकांच्या हातांत निरनिराळ्या खाद्यपदार्थांचीं भरलेलीं ताटें होतीं. त्यापाठोपाठ सैनिकांची एक तुकडी होती.

सैनिक पाहून आश्चर्य वाटलें. मृगयेला तर आपण एकटेच जातों असें महाराज म्हणाले होते. मग हे एवढे पन्नाससाठ सैनिक कशाला ?

राहवेना म्हणून मी घोड्याची गति वाढवली. महाराजांना समांतर होऊन विचारलें,

' महाराज, हे एवढे लोक कशासाठीं ?

महाराज खिशांतून अक्रोड काढून ते खात होते. त्यांचें तोंड भरलेलें होतें. त्यांनीं बराच वेळ माझ्या प्रश्नाचें उत्तर दिलें नाहीं. मग तोंड मोकळें करून ते म्हणाले,

' काय म्हणालास ? '

' नाहीं, हे एवढे सैनिक कशाला असें विचारलें मी. '

' लाडू ना ? अरे, तेवढे लागणारच. सबंध दिवस जाणार मृगयेंत. तरी बेतानेंच घेतले आहेत. '

' लाडू नव्हे ! –'

' फळें ? – हां हां, तीं मुखशुद्धीसाठीं. फक्त दोनच ताटें घेतलीं आहेत. '

' फळें नव्हेत, सैनिक म्हणतों मी. '

महाराजांनीं समजल्यासारखी मान हलवली.

' हां हां, ते आपले उगीच शोभेला. अमात्य म्हणतात म्हणून. मृगया मात्र आपण एकट्यानेंच करायची बरें का. '

' पण वाघाची वार्ता आणायचें काम–'

' हां हां, तशीं कांहीं थोडीशीं कामें करतात हे लोक. '

' मग ठीक. '

हळुहळू राजपथ संपला. नगरी मागें पडली. सूर्य चांगला मध्यावर आला आणि मग आम्हीं महाराजांच्या विशेष वनांत प्रवेश केला. वन चांगलें दाट वृक्षांनीं, लतावेलींनीं भरलेलें होतें. आंत गडद सांवली होती. वेड्या-वांकड्या वाटा इकडे तिकडे गेलेल्या होत्या. मध्येंच खांचखळगे होते. त्यांतून जावें लागल्यामळें आमच्या अश्वांची गति साहजिकच कमी झाली. शिवाय वृक्षांच्या सर्पण शाखा एकसारख्या तोंडावर येऊं लागल्या त्यामुळें आम्हीं धीरेधीरे चाललों.

हळूहळू आम्हीं अरण्यगर्भांत येऊन पोंचलों.

सगळेजण थांबले. महाराजांनीं सैनिकांच्या प्रमुखास बोलावून घेतलें आणि सांगितलें.

‘ हें पहा धनसेन, आतां आमची मृगया सुरू होईल. ’

धनसेनानें नम्रपणें अभिवादन केलें.

‘ होय महाराज. ’

‘ तुम्हीं आपले सैनिक घेऊन सर्व दिशांना जा. आज वाघाची मृगया आहे. त्याची वार्ता आणा. ’

‘ अगदीं बरोबर आणतों महाराज. आपण उपाहार करावा. तोंपर्यंत एका घटकेंत वाघाची वार्ता आणतों. ’

‘ वाहवा ! मग पुढें काय करशील ? ’

‘ काय करूं महाराज ? ’

‘ त्याला असेंच इकडे ढकलीत आणा. आतां आणखीन् लांब जायचा आम्हांला कंटाळा आला बोवा ! ’

‘ ढकलीत ? ’ माझ्या तोंडांतून शब्द गेले.

धनसेनानें माझ्याकडे तीव्र दृष्टीनें पाहिलें. मी एकदम लज्जित झालों.

‘ ढकलीत म्हणजे काय ? हुसकून लावून आणायचें. मृगयेंत असेंच असतें. आपण अगदीं अनभिज्ञ दिसतां या शास्त्रांत ? ’ त्यानें विचारलें.

‘ होय, मी आज प्रथमच येतों आहें. ’ मी म्हणालों.

‘ मग शिका महाराजांपासून कांहीं गोष्टी. ’

असें म्हणून त्यानें आपला अश्व वळवला आणि सैनिकांना बरोबर घेऊन तो दाट झाडींत नाहींसा झाला.

महाराज खालीं उतरले. सेवकांनीं त्यांच्यासाठीं एका वृक्षाच्या छायेंत मऊ, सुखकर आसनाची योजना केली. त्यावर बसून त्यांनीं हुशहुश केलें. घटकाभर लोळण घेतली. मग उठून त्यांनीं खाद्यपदार्थांचीं ताटें मागवलीं. त्यावर बराच वेळ घालवला. आम्हींहि जवळपास बसून थोडेंसें खाल्लें.

थोड्या वेळानें महाराजांना चांगली झोंप लागली. ते जोरजोरानें घोरूं लागले.

आतां टळटळीत दुपार झाली होती. दाट सावलीमुळें उन्हाची तीव्रता जाणवत नव्हती हें खरें; पण तरी वृक्षांच्या फटींतून सूर्यकिरणांचे बाण कोठें कोठें भुईला येऊन भिडले होते. पश्चिमेच्या दिशेनें सरकत होते. वेळ भराभर चालला होता आणि बसून बसून मला कंटाळा आल्यासारखें झालें होतें. महाराजांचा इतर सेवकवर्ग स्वच्छंदपणें इकडे तिकडे संचार करीत होता. मी एकटाच महाराजांच्या समीप होतों.

एकाएकीं जवळपासच्या झुडपांत खसफस झाली. त्यापाठोपाठ एक मोठी आरोळी ऐकूं आली.

मी दचकून सावध झालों. कान टवकारले. लक्ष देऊन इकडे-तिकडे पाहिलें. तेवढ्यांत महाराजहि जागे झाले. उठून बसून जांभई देत ते म्हणाले,

‘ काय रे, काय प्रकार आहे ? ’

‘ वाघ तर नव्हे ? ’ मी शस्त्र सरसावलें.

‘ छे: छे: ! वाघ कुठला एकदम येईल इथें ?’ महाराजांनीं आपल्या भृकुटी वर चढविल्या. ‘ आधीं धनसेन येऊन वर्दी देईल. इतर सैनिक येतील. मग वाघ येईल. तुला अगदींच कांहीं कळत नाहीं बुवा ! ’

यावर मी कांहीं उत्तर देणार होतों, पण तेवढ्यांत एक प्रचंड वराह धांवत येतांना दिसला. मी गडबडीनें उठून उभा राहिलों. ओरडलों.

‘ महाराज, महाराज, वराह–’

‘ काय, वराह ? ’

असें म्हणून महाराज ताडदिशीं उठून उभे राहिले. एक उंच उडी घेऊन त्यांनीं वृक्षाची डोक्यावरची फांदी पकडली आणि तिला ते लोंबकळले.

धडपड धडपड करीत निमिषार्धांत त्यांनीं तिच्यावर आरोहण केलेंहि. त्यांची ही चपळाई पाहून मी थक्कच झालों.

फांदीवर नीट बसून महाराज ओरडले.

'कोठें आहे तो दुष्ट वराह?'

हें सगळें होईपर्यंत त्या प्रचंड वराहानें वाटेंतील झाडेंझुडपें मोठ्या वेगानें ओलांडलीं होतीं आणि थेट माझ्याकडेच आपला मोर्चा वळविला तो दृष्टीच्या टप्प्यांत आल्याबरोबर मी कमरेचें खड्ग उपसलें आणि पवित्रा घेतला. त्याची ती विस्तीर्ण काळीकुळकुळीत पाठ, तीक्ष्ण सुळे, क्रूर दृष्टि पाहून क्षणमात्र माझें चित्त विचलित झालें. पण दुसऱ्याच क्षणीं माझ्या अंगांत विलक्षण बळ आलें. वराहानें माझ्याकडे वेगानें मुसंडी मारल्याबरोबर मी झटकन् बाजूला झालों. खड्गाचा प्रहार केला, पण तो निसटताच लागला.

तेवढ्यांत महाराज वरून म्हणाले.

'हां, हाण. कर प्रहार. सोडूं नकोस. आज हा पहिला धडा मृगयेचा. समजलें?'

त्यांच्याकडे पहायलाहि मला अवधि नव्हता. घायाळ झालेल्या त्या वराहानें पुन्हां माझ्यावर चाल केली. मीहि प्रतिहल्ला केला. त्याच्या पाठीवर जोराचा घाव बसला आणि रक्ताची चिळकांडी उडाली. त्यामुळें चिडलेल्या त्या हिंस्र प्राण्यानें एकामागोमाग एक सतत हल्ले चालवले. तेव्हां मीहि त्वेषानें आक्रमक पवित्रे घेऊन प्रहार केले. अखेर मानेवर एक तीव्र प्रहार करून मी त्याला लोळवलें. पण तत्पूर्वी त्यानें एक विलक्षण धडक घेतली ती मी चुकवली. त्यामुळें थेट त्या वृक्षाच्या बुंध्यालाच त्याची ती धडक बसली. अशी विलक्षण बसलीं कीं तो वृक्षहि हादरला. त्याच्या सगळ्या शाखा वरखालीं झाल्या. महाराज बसले होते ती फांदी तर फारच हलत राहिली. एकसारखी थरथर कांपत राहिली.

अखेर त्या भयंकर प्राण्याचें मस्तक फुटलें. सतत प्रहारांनीं घायाळ झालेलें तें धूड भूमीवर कोसळलें. शेवटचे आंचके देऊं लागलें. हातपाय हलवूं लागलें.

हलणाऱ्या फांदीवरून शब्द आले,

'काय झालें विजयसेन?'

घामानें डबडबलेलें तोंड पुसून हाशहुश करीत मी म्हटलें.

'मेला अखेरीस वराह !'

'निश्चित ?'

'अगदीं निश्चित.'

'पहा हं, नीट. हिंस्र प्राणी मोठे विचित्र असतात.' महाराज आपलें आसन न सोडतां वरूनच बाणेदारपणें बोलले, 'आपल्याला वाटतें, ते मेलेले आहेत. आणि नसतात लेकाचे मेलेले. मला नेहमींचा अनुभव आहे.'

'नाहीं, मेला.' मी म्हटलें.

'पहा बरें खात्री करून.'

माझी खात्री होती, पण महाराजांच्या शब्दासाठीं मी पुन्हां जवळ जाऊन पाहिलें. पुन्हां त्यांना तेंच सांगितलें. मग महाराजांनीं फांदीवरून खालीं उडी घेतली. धप्‌दिशीं आवाज झाला. मी चमकून मागें वळून पाहिलें. महाराज कांहीं क्षण भूमीशीं समांतर झालेले दिसले. वराहाप्रमाणें त्यांचेंहि मुखमंडल धुळींत लोळलें. हातपाय हलले. नुसते पायच वर उचलले गेले आणि खालीं आले. असा प्रकार चारदोन वेळां झाल्यावर ते भराभरा उठून उभें राहिले व वस्त्रावरची धूळ झटकीत माझ्याकडे रोखून पहात त्यांनीं विचारलें,

'काय ? कशी सफाईनें उडी घेतली कीं नाहीं मी ?'

मीं मान डोलावली.

'अर्थात् अशी उडी मला नाहीं जमणार महाराज.'

'त्याला सराव लागतो.'

'अगदीं खरें.'

'आतां हा वराह मारायलासुद्धां तुला फार प्रयास पडले. महाराजांनीं वराहाकडे क्रूर दृष्टीने पाहिलें. किती प्रहर वांया घालवलेस ! त्यापेक्षां असें करायचें—'

'कसें महाराज ?'

'एका हातांत एक काठी घ्यायची. अन् दुसऱ्या हातांत शस्त्र. वराह अंगावर आला की त्याच्या तोंडांत काठी खुपसायची. झालें तोंड बंद ? कीं लगेच वर मानेवर प्रहार. एका झटक्यांत मुंडकें उडवायचें.'

'खरेंच, हें माझ्या लक्षांत आलें नाहीं.'

बोलतां बोलतां महाराजांनीं कमरेचें शस्त्र उपसलें. तें हातांत धरून त्यांनीं संतप्त मुद्रेनें वराहावर चाल केली. अजून तो प्राणी अंतकाळची तडफड करीतच होता. एकेक पाऊल सावकाशपणें आणि धूर्तपणें टाकीत टाकीत महाराज त्या वराहाच्या अगदीं समीप येऊन ठेपले. थोडा वेळ त्यांनीं अगदीं सूक्ष्मपणें पाहणी केली. मग एकाएकीं त्वेषानें उडी घेऊन त्यांनीं त्या वराहावर जोराचें प्रहर केले. तो आधींच मेलेला प्राणी अगदीं छिन्नविच्छिन्न करून टाकला

अखेर ' हुश्श ' करून त्यांनीं प्रहार थांबवले.

' चला, संशयनिवृत्ति केली. पुन्हां प्रश्न नको.'

' होय महाराज.'

' अरे घायाळ झालेला प्राणी मारणेंच फार धोक्याचें असतें, लक्षांत ठेव.'

' होय महाराज.'

' मी म्हटलें होतें मनांत, कीं आपणच हा वराह मारून टाकावा. तुला मौज दाखवावी. पण तुला पुन्हां अशी कोठून संधी मिळणार ?'

' आपल्या कृपेनेंच ती मिळाली !' मी मान हलवली.

' म्हटलें, तुला साह्य करण्याची बुद्धीदेखील व्हायला नको. म्हणून मुद्दाम उंच वृक्षशाखेवर जाऊन बसलों.'

' तें तर आपण फारच उत्तम केलेंत !'

' तरी पण अखेरचे प्रहार आम्हांला करावेच लागले, हें तुझ्या लक्षांत आलें ना ?'

' तर ! त्याशिवाय एवढा प्रचंड वराह मरणार कुठून ?'

एवढा संवाद झाल्यावर महाराज प्रसन्न झाले. त्यांच्या मुद्रेवर दैवी हास्य पसरलें.

' आतां आम्हीं या वृक्षाआड जाऊन थोडीशीं वस्त्रें बदलतों. तोंपर्यंत इथेंच थांब.'

' वस्त्रें बदलतां ?' मी जिज्ञासेनें विचारलें.

' होय.'

'तीं कशाला ?'

महाराज क्षणभर गोंधळल्यासारखे दिसले.

'अं...झाडावर बसून तीं जरा मलीन झालीं आहेत.'

महाराजांच्या वस्त्रांवरून नकळत माझी दृष्टि फिरली. मलीनतेचें चिन्ह कोठेंच आढळलें नाहीं. तथापि जास्ती पृच्छा न करतां मी नम्रतेनें मान हलवली. महाराज डुलत डुलत एका वृक्षाआड गेले आणि दिसेनासे झाले. थोडया वेळानें बाहेर आले तोंपर्यंत इकडेतिकडे गेलेला सेवकवर्ग हळूहळू गोळा झाला. मेलेला वराह पाहून त्यांनीं महाराजांचा जयजयकार केला.

वृक्षाखालीं मांडलेल्या आसनावर बसून महाराजांनीं थोडी विश्रांति घेतली. मग फलाहार केला. तेवढयांत एका सैनिकानें धांवत धांवत वार्ता आणली कीं इथून अगदीं समीप एका वृक्षाखालीं व्याघ्रराजाची मूर्ति शांतपणें पहुडली आहे. त्वरित गेल्यानें फार उत्तम मृगया होईल.

वाघ ? मला आश्चर्य वाटलें. मघाशीं एवढा गोंधळ चालला असतांना वाघ इतक्या जवळ कोठें बसून राहिला आहे ? एखादा प्राणी दूर धांवला असता किंवा अंगावर चाल करून आला असता. वाघाचें घ्राणेंद्रिय तर अति तीक्ष्ण असतें म्हणतात. मग असें कसें ?

विचार करूनहि मला नीटसें समजलें नाहीं. मी सहज महाराजांजवळ पृच्छा केली. तेव्हां माझ्या अज्ञानाची कींव करीत ते म्हणाले,

'ऊंः ! त्यांत काय विशेष आहे ? आज आम्हीं वाघ मारणार ना ? मग तो कोठेंतरी असायलाच पाहिजे. नाहींतर आम्हीं मारणार कसा ?'

'होय, तेंहि खरेंच.' मी निरुत्तर होऊन बोललों.

'आतां पहा आम्हीं कसा वाघ मारतों तें.'

महाराजांनीं भराभर आहार आटोपला. हातांत खड्ग घेऊन ते सिद्ध झाले आणि लगबगीनें चालत गेले. त्यांच्या पाठोपाठ इतर सेवकहि घाईघाईनें गेले. आपण बरोबर असावें अशी माझीहि इच्छा होती. पण मघांच्या झटापटींत माझा पाय किंचित् दुखावला होता. नीटसें चालतां येत नव्हतें. म्हणून मी सावकाश हळूहळू चालत गेलों. कांहीं वेळ महाराज लपतछपत जातांना दिसले आणि थोडयाच वेळांत दिसेनासे झाले. माझी छाती उगीचच धडधडू लागली. नाहीं म्हटलें तरी वनराजाशीं गांठ आहे. कांहीं भलतेंच घडलें तर ?

त्यापेक्षां आपण सन्निध असलेलें बरें. मघांशीं महाराजांचें जें दर्शन झालें तें काहीं तितकेंसें समाधानकारक नव्हतें.

असा विचार करतों आहें तोंच एकाएकीं व्याघ्रगर्जना ऐकूं आली आणि माझ्या काळजाचा थरकांप झाला. दिङमूढ होऊन मी जागच्या जागींच उभा राहिलों.

थोडा वेळ गेला. वृक्षावरील पांखरांची मंद कुजबुज आणि पानांची सळसळ तेवढी ऐकूं येत राहिली.

— आणि मग एकाएकीं आरडाओरड झाली. त्यापाठोपाठ महाराजांच्या नांवानें केलेला मोठा जयजयकार ऐकूं आला. त्या ध्वनीनें सबंध वन कोंदून गेलें.

पाय दुखत होते तरी पण मला राहवेना. लंगडत लंगडत मी भरा-भरा पावलें उचललीं. एका विशाल वृक्षाच्या तळाशीं सैनिकांचा वेढा पडलेला दिसला. त्यांच्या गर्दीतून वाट काढून मीं पुढें गेलों.

पाहिलें तों एक वाघ गतप्राण होऊन पडलेला होता आणि त्याच्या छातीवर पाय देऊन महाराज क्रुद्ध मुद्रेनें उभे होते. वाघाचें मुंडकें कापून त्यांनीं एका हातांत धरलें होतें. दुसऱ्या हातांत रक्तानें न्हालेलें नग्न शस्त्र होतें.

तो देखावा पाहिला आणि मी थक्क होऊन उभा राहिलों. माझी एकदम वाचाच बंद झाली.

सैनिकांनी सतत महाराजांचा जयजयकार चालविला होता. मी तेथें येऊन पोंचल्यावर महाराजांनीं हाताच्या खुणेनें तो बंद केला. मुद्रा हंसतमुख करून विचारलें,

'काय विजयसेन ? तुला आश्चर्य वाटलें ना ? '

'हं. होय महाराज. इतक्या शीघ्र—!'

महाराजांनीं मिशीला पीळ भरला. हातांतलीं दोन्ही ओझीं सेवका-जवळ दिलीं.

'त्याला काय उशीर ? या वृक्षाखालीं वाघ निद्रिस्त होता.'

'बरं—' मी डोळे विस्फारून म्हटलें.

'आम्हीं लपतछपत गेलों. इतक्या सावधगिरीनें कीं वाघाची निद्रा अजिबात भंगली नाहीं. अगदीं जवळ जाईपर्यंत डाराडूर.'

'वा ! पुढें ?'

'पुढें काय ? काढलें शस्त्र आणि केला प्रहार. एका सपाटयांत मस्तक उडवलें. त्याला लेकाला कळलेंहि नसेल आपण मेलों म्हणून.'

'पण मीं तर चांगली गर्जना ऐकली.'

'ती एक गंमतच झाली !' महाराज बोलले, 'आम्हीं मुंडकें उडवलें. चांगलें हात दीड हात लांब जाऊन पडलें. अन् मग त्या मुंडक्यानेंच नुसती गर्जना केली. हा: हा: !'

'बापरे !'

महाराज प्रसन्न होऊन हंसले. त्यांची मुद्रा उजळली. या वेळीं त्यांच्या मस्तकामागें वलयांकित तेजहि दिसल्याचा भास मला झाला. तसें मी त्यांना बोलून दाखवलें तेव्हां ते आणखीनच प्रसन्न झाले.

'अरे, हें कांहींच नाहीं. पुढल्या वर्षीं आम्हीं वराहाची मृगया करून दाखवूं तुला. कशी माहीत आहे ?'

'कशी ?'

'नवी पद्धत अगदीं. वराह अंगावर धांवून आला कीं त्याचे सुळेच एकदम हातांनीं धरायचे आणि जोरांत पिरगाळून टाकायचे. त्याचे दांत त्याच्याच घशांत दांत घालायचे. घशांत अडकून आपोआपच मेला पाहिजे वराह, हा: हा: !'

महाराजांची ही अभिनव रीत ऐकल्याबरोबर सैनिकांनीं पुन्हां एकदम महाराजांचा जयजयकार केला आणि मग आम्हां निघालों.

नगरीपाशीं येऊन पोंचलों तों वेशीपासून प्रासादापर्यंत राजपथावर नगरजनांची ही गर्दी उसळून राहिली होती. ध्वज फडकत होते. तोरणेंपताका लागल्या होत्या. ठिकठिकाणीं कमानी उभारलेल्या होत्या आणि नगरवनितांनीं सर्व राजमार्ग रंगवल्लिकांनीं सुशोभित केला होता. अमात्य आणि इतर सर्व मंत्रिगण स्वागताला सामोरा आला होता. महाराजांना पुष्पहार घालून त्यांनीं स्वागत केलें. मग महाराज अंबारीच्या हत्तीवर चढले तेव्हां सगळ्या पौरजनांना त्यांचें दर्शन घडलें. त्याच क्षणीं भेरी, तुताऱ्या आणि दुंदुभी हीं सर्व एकदम वाजलीं.

अंबारीच्या पुढेंमागें सेवकवर्ग, पाठीमागें सैनिकांचें पथक आणि काठींत अडकवलेले ते दोन प्रचंड प्राणी. त्या पाठोपाठ मंत्रिगण आणि सैनिक अशी ही भव्य मिरवणूक निघाली. तें दृश्य पाहिल्यावर नागरिकांनीं गगनभेदी जयजयकार केला.

प्रासादापर्यंत मिरवणुकीला बरेंच मोठें स्वरूप प्राप्त झालें. त्या गर्दींतून वाट काढीत अश्वारूढ अमात्य माझ्याजवळ आले. सचिंत मुद्रेनें त्यांनीं मला विचारलें,

'विजयसेन, ही वराहाची काय भानगड आहे ? त्याची मृगया करण्याचें ठरलेलें नव्हतें.'

घडलेली सगळी कथा मी त्यांना सांगितली तेव्हां त्यांचें समाधान झालें. त्यांनीं सुटकेचा निःश्वास सोडला.

'बरे झालें तूं होतास जवळ. नाहींतर अनवस्था प्रसंगच ओढवता.'

'होय, अमात्य.'

'आतां यासंबंधीं कोठें कांहीं–'

'छेः छेः ! ' ही मृगया महाराजांनींच जर केलेली आहे तर मी काय बोलणार ? ' अमात्यांनीं माझ्याकडे पाहिलें. पाठीवर थाप मारली.

'शहाणा आहेस. तुला कांहीं कमी पडणार नाहीं.'

हळुहळू आम्हीं दोघेहि तसेच पुढें चाललों. थोड्या वेळानें मला आठवण झाली.

'अमात्य, एक विचारूं ?'

'काय ?'

'या वाघाच्या मृगयेचें गूढ मला नीटसें उकललें नाहीं.'

'त्यांत गूढ कसलें ?' अमात्य स्मितमुद्रेने म्हणाले, 'अगदीं सरळ गोष्ट आहे.'

मी चकित होऊन म्हटलें, 'म्हणजे ? ही मृगया महाराजांनीं स्वतः केली ?'

'होय. कां बरें ?'

'तसें नाहीं, पण–!'

'बाबा, प्रतिवर्षी महाराज स्वतःच मृगया करतात. फक्त आम्हीं त्यांना थोडेंसें साह्य करतों, इतकेंच.'

'म्हणजे ?'

'म्हणजे असें कीं-' अमात्य थोडेंसें थांबून बोलले,

'आधीं आपले सैनिक बरेंचसें काम आटोपतात. आणि मग महाराज राहिलेलें पूर्ण करतात.'

'पण मी तर वाघाची गर्जना ऐकली. अगदीं शपथपूर्वक ऐकली. महाराज तर म्हणाले कीं, वाघाच्या नुसत्या तोडलेल्या मस्तकानेंच ही गर्जना केली.'

'तेंहि खरें आहे. त्यासाठीं आम्हांला एक नकल्याहि द्यावा लागतो. या खेपेस त्याची वेळ चुकली. त्यानें जरा उशीरा काम केलें–'

पण अमात्यांचे पुढचे शब्द कांहीं ऐकूं आले नाहींत. मिरवणूक प्रासादापर्यंत पोंचली होती. राजस्त्रिया निरांजनांनी महाराजांना ओवाळीत होत्या. तुतारी आणि दुंदुभी एकसारख्या वाजत होत्या आणि सहस्र कंठांतून निघालेल्या महाराजांच्या जयजयकारानें अवघें वातावरण भरून गेलें होतें.

****

## २ : चार लोक

गांवापासून उगवतीकडे ओढ्याच्या कांठाकाठानें गाडीवाट गेली होती. या गाडीवाटेनें सरळ कोसभर वाट तुडविली म्हणजे संभा माळ्याची जमीन लागत असे. दहा–बारा एकराची ही जमीन कसदार होती. काळी करंद माती. एका अंगानें ओढ्याचा उतार, त्याला लागून लहानशी आंबराई आणि बाभळी–लिंबांचीं झाडें. पाण्यानें भरलेल्या दोन विहिरी. त्यामुळें रानाला उतार चांगला होता. नाहीं म्हटलें तरी खंडीनें मोजावी अशी ज्वारी सुगींत होत होती. वर्षभर पोटाला पुरेल अितकें पिकत होतें. त्यामुळें संभा माळ्याचा मळा गांवांत सगळ्यांना माहीत होता. गांवांतल्या इतर लोकांकडे कुठें कांहीं सांगण्यासारखें उत्पन्न झालें तर-त्याची संभाशीं तुलना होई. लोक म्हणत, ‘ लेका दाव झाला. औंदा संभा माळी झाला म्हण कीं तुझा ! ’

लोकांनीं असें म्हणावें अशी संभाची कर्तबगारी खरोखरीच होती त्याचें रान चांगलें होतें तशीच त्याची मेहनतहि चांगली होती दिवसाचे अठरा तास राबून त्यानें शेती कर्तुकीला आणली होती. राबराबून काळ्या आईची सेवा करावी आणि तिनें दिलेलें दोन्ही हात भरभरून घ्यावें असा क्रम कित्येक वर्षे चालत होता. त्याचें नांव झालें होतें. लोक नांवाजत होते.

असा हा संभा माळी आतां म्हातारा झाला होता आणि अंथरुणावर पडून होता. त्याचा एकुलता एक पोरगा शेतीकडे बघत होता. त्याच्या अंगांत बापासारखें कर्तृत्व नव्हतें. धमक नव्हती. त्यामुळें शेतीचा लौकिक

पूर्वीसारखा राहिला नव्हता. उत्पन्न कमी झालें होतें. लहान सहान कटकटी, भांडणें होत होतीं. एकसारख्या तक्रारींनीं हा तरणा पोरगा कंटाळून गेला होता. रोज कांहींना कांहीं गाऱ्हाणें बापाला सांगत होता. म्हातारा दर वेळीं त्याला सबुरीचा सल्ला देत होता.

आज बापाजवळ बसून त्यानें असेंच एक गाऱ्हाणें सांगितलें. मळ्याला लागून चौगुल्याचें रान होतें. त्यानें बांधावरून कांहींतरी भांडण काढलें होतें. बांधावरचीं लिंबाचीं चार झाडें कोणाचीं याबद्दल तक्रार सुरू केली होती. तीं आपलीं असल्याबद्दलचा त्याचा दावा होता.

थोडक्यांत हा प्रकार सांगून यशवंता म्हणाला,

'ह्यो आणखी एक खेळ सुरू झालाय आजपासनं. आतां सांग कसं काय करूं तें. हाय का न्हाई डोस्कं फिरायचं काम ?'

म्हातारा संभा खोकत खोकत अंथरुणावर उठून वसला. थोडा विसावा घेत म्हणाला,

'चौगुल्या पयलं असं करीत नव्हता.'

'आतां बघ म्हंजे झालं!'

'अन् तूं जरा दमानं घे. माणसाला शांतपणा असावा. चिडूं नये.'

यशवंताच्या कपाळाला आंठ्या पडल्या. त्यानें चेहरा कसनुसा केला.

'बास्. एवढं आपलं बोलत जा म्हंजे झालं. काय करावं, काय न्हाई, सगळं आपलं मोघमांत.'

म्हाताऱ्यानें आपल्या पोराकडे रोखून पाहिलें. पुन्हां त्याला खोकल्याची उबळ आली. ती थांबल्यावर तो म्हणाला,

'बरं, आस कर. त्याला लावून दे माझ्याकडं. मी सांगतों समजावून त्याला.'

'तो यायला तयार न्हाई हुयाचा. आन् तूं काय जल्माला पुरणार हायेस का माज्या ?'

'मग तुजं तूं बघ. मी तर काय करणार ?'

'मी इचारतों चार लोकास्नी गांवांत. काय म्हंत्यात बगतों आन् करतों काय तरी.'

'त्यांत काय इचारायचंय ? नीट शेण्यासारखं वागलं म्हंजे काय होत न्हाई जात न्हाई '

'हां. तूं आधींच नाट लाव मला.'

म्हाताऱ्यानें सुस्कारा सोडला. हें तरणें रक्त आपल्याला जुमानीत नाही हें त्याला कळलें. ठीक आहे. त्याचें त्याला करूं दे. आपण नाहींतरी कुठपर्यंत सांगणार–सवरणार ? शेवटीं ज्यानें त्यानें स्वतःच व्यवहार सांभाळायला शिकलें पाहिजे. अनुभवानें सगळें शहाणपण माणसाला येतें.

भिंतीला रेलून बसत संभानें डोळे मिटले. मान हलवली.

'कसं तुला वाटंल तसं कर. माजं काय म्हणणं न्हाई.'

बापानें एवढे उद्गार काढल्यावर यशवंताला हुरूप आला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो उठून चावडीकडे गेला. तिथें जमलेल्या लोकांत बसून त्यानें घटकाभर इकडे तिकडे गप्पा मारल्या. मग आपला विषय काढला, बांधावरून चौगुल्याशीं आलेला वांधा सगळ्यांना सांगितला.

चावडींतल्या खांबाच्या तळखड्याला टेकून पाटील उगीच सकाळधरनं बसला होता. कांहीं विशेष ऐकायला मिळालें नव्हतें. म्हणून तो नाखूष होता. आतां ही हकीकत ऐकून त्याला बरें वाटलें. त्यांतून त्याचें चौगुल्याशीं वांकडें होतें. त्यामुळें तर त्याला फारच बरें वाटलें. फाटक्या धोतरांतली एकच मांडी हलवीत तो म्हणाला.

'आयला, हें चौगुल्याचं बनं पयल्यापासनं साडशिटलीचं बरं का ! आतां हें भांडान काडायचं काय नडलं हुतं का ?'

तुकाराम गुमास्ता पाटलाच्या तोंडाकडं नजर लावून बसला होता. मधूनमधून तोंडावरच्या माशा वारीत होता. फट्दिशीं स्वतःच्याच गालावर थप्पड मारीत होता. तो म्हणाला,

'व्हय व्हय. लई जात वाईट. यशवंतराव, तुमी हाटूं नका हां मागं. खऱ्याला मरण न्हाई.'

यशवंता मुंडी हलवून चाचरत बोलला,

'तें खरं. पण मारामारीवर आलं तर कसं काय करावं ?'

दुसरा एकजण म्हणाला, 'काय करायचं ? द्यावं दोन टिंबं ठिवून आन् काय !'

'त्येच्याकडं गडीमाणसं बक्कळ. मोटा बारदाना हाये.'

'मग आपनबी माणसं आणूं. आपल्याला काय कमी हाये ? हूं जाऊं दे. लाठ्याकाठ्यांनीं हाणाहाणी हूं दे. म्हंजे जरा ताळ्यावर यील त्यो.'

'उगी पेटायचं त्यातनं दुसरंच काय तरी.'

'काय न्हाई पेटत. आन् पेटलं तर पेटलं--'

'हां, काय भ्याचं काम न्हाई. आमी हायेच कीं.'

अशीं बोलणीं झालीं आणि यशवंताच्या डोक्यांत वारें शिरलें. तो तिथून उठला आणि जेवणींखाणीं आटोपून मळ्यांत गेला. चौगुल्याच्या गडीमाणसांशीं त्याची नेहमींप्रमाणें बोलाचाली झाली. त्यानेंहि शब्दाला शब्द दिला. तेव्हां चौगुले धांवून आला. चांगली जोरांत लठ्ठालठ्ठी झाली. हातघाईवर प्रकरण आलें आणि थोडीफार मारामारीहि झाली. चौगुल्यानें यशवंताला चांगला प्रसाद दिला. खालीं भुईत घालून लोळवला आणि बुकलला. यशवंताचें सगळें अंग ठणकलें. दिवसभर विव्हळत वस्तीवर तो गपचिप पडून राहिला. घरीं गेलाच नाहीं.

दिवसभरांत आसपासच्या वस्तीवरून ही बातमी सगळीकडे झाली. काय प्रकार झाला हें ऐकायला चार माणसें संभा माळ्याच्या रानांत येऊन गेलीं. यशवंताची चौकशी करून गेलीं. रात्रीं उशीरा हातांत कंदील घेऊन नाना कुलकर्णी आला. यशवंताजवळ बसून त्यानें सगळी गोष्ट विचारून घेतली. मग विचारांत पडल्याप्रमाणें चेहरा करून तो बोलला,

'हुं, आसं झालं तर मग ?--'

यशवंता कण्हतकुथत म्हणाला,

'व्हयहो. कुनीकडनं त्या भडव्यांचं ऐकलं आस झालंय मला. आई ग-'

'झालं ना असं ? वाटलंच मला. अरे, चावडीवरचा सगळा कॅंपच मर्दा वाईट आहे तो. निष्कारण त्यांच्या नादाला लागून ही पाळी आणलीस.'

'गाढवपणा केला.'

'आतां चौगुल्या फौजदारी केल्याशिवाय राहणार नाहीं.'

'कशावरनं ?'

'मी त्येच्याकडनंच जाऊन आलों आतां. तसा कांहींतरी त्याच्या बोलण्यांतनं सूर निघाला होता.'

यशवंताचें कण्हणें एकदम बंद पडलें. घाबरून जाऊन तो ताडकन् उठून बसला. डोळे विस्फारले.

'मग हो नाना ?'

नानानें तोंडांत विडी धरली. कंदिलाची कांच वर सरकवली आणि कंदील वर उचलून तोंडाजवळ धरून मग विडी पेटवली. गप्‌कन धूर सोडला. चार दोन झुरके घेतले.

'कांहीं भ्यायचं कारण नाहीं. एक उपाय आहे.'

'कंचा ?'

'त्याच्या आधीं आपणच फौजदारी करायची. लेखी कंप्लेंट द्यायची, म्हणजे हादरा बसेल त्याला.'

'आन् कोरटांत गेलं प्रकर्ण म्हंजे ?'

'जाऊं दे. आपण डरतोंय त्याला थोडेच ! एकापेक्षां एक फस्कलास वकील माज्या वळखीचे आहेत. कुणाकडंहि जाऊं. चांगला नांगा मोडून टाकूं. काय ?'

यशवंतानें मनाशीं थोडा वेळ विचार केला. डोळे मिटले. तोंपर्यंत नकळत हातानें दंड, मांड्या चेपल्या. मग तो म्हणाला,

'पर पैका लई जाईल नाना.'

'आपली बाजू खरी का खोटी ?'

'खरी.'

'मग खऱ्यासाठीं भांडायला पाहिजे का नको ?'

'पाहिजे कीं.'

'मग झालं तर. चार पैसे गेले तर हरकत नाहीं. पण खऱ्याची बाज वर आली पाहिजे.'

'हो, हें खरं आहे.'

'पाटील अन् त्यो त्याचा गडी, दोघंहि चोर आहेत. त्यांना पैसे खायला पाहिजे असतील म्हणून तुला भरीला घातला, दुसरं काय ?'

'आसंल हां.'

अशा प्रकारें बोलणें झालें. नानानें निरनिराळ्या तऱ्हेनें यशवंताला पटवून दिलें कीं आधीं चौगुल्याशीं मारामारी करण्याची पाळी तूं आणायला नको होतीस. आतां केलीसच मारामारी, तर हें भांडण शेवटपर्यंत कडेला नेलें पाहिजे. चौगुले फिर्याद करील त्याआधीं आपणच करून टाकावी हें उत्तम. शें–दोनशें रुपये खर्च होतील ही गोष्ट आतां खरी; पण त्याला कांहीं उपाय नाहीं. तसें केलें नाहीं तर मार खाऊनच्या खाऊन वर पुन्हां बिन-भाड्याच्या जागेंत राहावें लागेल. चार दोन महिन्यांचा सरकारी पाहूणचार घ्यावा लागेल. त्यापेक्षां आपण उत्तम वकील शोधावा हें चांगलें आणि असे उत्तम वकील डझनांनीं आपल्याला माहीत आहेत. तेव्हां कसलाहि विचार न करतां फक्त एका वकीलाकडे जायचें म्हणजे पुरे.

एवढें सगळें बजावून आणि यशवंताचा होकार घेऊन, नाना दोन पायांवर बसला. डाव्या हातानें कंदील किंचित् वर उचलून घेऊन म्हणाला,

'बरं, मग निघतों मी.'

आणि हळूंहळूं निघून गेला.

रात्रभर झोंप घेऊन जरा ताजातवाना होऊन यशवंता दुसऱ्या दिवशीं सकाळीं गांवांत आला. चावडीवरूनच घराकडे मान खालीं घालून निघाला. पाटील आणि तुकाराम दोघेहि सकाळचे चावडींतच होते. पाटील पटक्याच्या फटींतून टकुऱ्यावरचे वाढलेले केंस खाजवीत होता आणि तुका-राम त्याच्याकडे बघत उगीच माशा मारीत बसला होता. दोघांनींहि यशवंताला पाहिलें. मग पाटलानें हांक मारली.

'यशवंता–'

'यशवंता थांबला, चावडीकडे आला. तो रस्त्यावरच उभा राहिला हें पाहून पाटील बोलला.

'का रं ? टेक कीं मर्दा. बस घटकाभर.'

'नगं, जायचंय घराकडं.'

'आतां हिच्या मारी ! घर कुठं पळून चालून चाललंय का ?'

यशवंताच्या मतांन नव्हतें. पण पाटलानें आग्रह करून त्याला बसवून घेतलें. मग काल मारहाणीचा जो बोभाटा झाला होता त्याची हकीकत विचा-

रून घेतली. यशवंतानेंहि सगळी सांगितली. ती ऐकल्यावर पाटील पुन्हां डोकें खाजवीत म्हणाला,

'आसं झालं व्हय ? चौगुल्या लई माज कराया लागला मग !'

तुकाराम पाटलाकडे बघत बोलला,

'लई म्हंजे लईच मस्तवाल झालाय म्हणाना.'

'गड्या, आमाला आधीं तरी कळवायचं.'

'हां, म्हंजे धापांच मानसं घेऊन आलों आसतों आमी हाणाहाणीला. हूं, जाऊं दे वायलीला, उचल कीं आपट, उचल कीं आपट–'

'एकेकाची टकुरीं फोडलीं आसतीं.'

'रगातच काडाय पायजे. त्याबिगर न्हाई ऐकायचा हालकट त्यो.'

त्या दोघांचेंहि हें बोलणें यशवंतानें ऐकून घेतलें. मग त्यानें रात्रीं नाना कुलकर्णी येऊन गेल्याची गोष्ट सांगितली,

'नाना म्हंतोय, तूं फिर्याद ठोक. आपण चांगला वकील देऊं.'

हें ऐकल्यावर पाटलानें डोळे विस्फारले.

'आरं तिच्या मों नानाच्या ! असा डाव हाय का त्येचा ?'

यशवंतानें गोंधळून जाऊन विचाकलें,

'कसला डाव ?'

'आरं त्यो पित्त्या हाये तालुक्याच्या वकिलाचा '

तुकाराम बोलला, 'हां, आडत्या हाय.'

'त्यो काय करतो ?'

'कमिशन खातो पांच पंचवीस रुपये. दर माणसामागं पंचवीस रुपये खातो !'

'खरं ?'

'खरं म्हजे ? मागंबी त्यानं दनका दिला. कुनाला रं तुका ?'

पाटलाबरोबर तुकारामनेंहि डोकें खाजविलें. दोघांचींहि डोकीं आणि हात हलले. चेहेरे वेडेवांकडे झाले. दोघांनींहि डोळे मिटले आणि उघडले. थोड्या वेळानें पाटलाला एकदम आठवण झाली.

'हां, आत्तां आलं ध्येनांत. त्यो भोईटयाचा कोन–'

'गणा ?'

'हां, गणा. त्येला आसंच नादीं लावून गोंदेगांवला नेलं. चार नोटा गडप शंभराच्या. एक ह्या बाबानं हाणली.'

तुकाराम म्हणाला,

'तर वो ! आन् इतकं करून निकाल इरुध्. लई कळवळला.'

'कळवळला ? बोंबलत बसला !' पाटलानें त्याच्या दुःखाची तीव्रता हाताच्या अभिनयानें दाखवली. 'तूं त्येंच्या नादाला लागूं नगंस हां. ही कोर्टकचेरीची आदत वाईट. एकदां चटक लागली म्हंजे सुटत न्हाई जन्मांत. गांजासारकंच काम आसतंय्.'

रात्रीं नानानें सांगितलेल्या हकीकतीवर यशवंता अजून विचार करीत होपा. त्यानें दिलेला सल्ला योग्य आहे असें त्याला वाटूं लागलें होतें. एवढ्यांत पाटलानें त्याला ही खरी गोष्ट सांगितली. त्यामुळें पुन्हां त्याचें मन डळमळलें. त्याचा गोंधळ उडाला.

'मग न्हाई जात मी नानाकडं. कसं ?'

'भले भाद्दर !' तुकाराम मुंडी हलवून म्हणाला, 'आसा झटपट निकाल पायजे खालच्या कोरटासारखा. आपिलीचं काम नसूं ने.'

'पर ही भानगड मिटवावी कशी काय ?'

'मिटवायचं न्हाईच. तुकडाच पाडायचा.'

'म्हंजे ?'

'दन्नादन्नी चालू ठिवायची. हटायचं न्हाई राजा, नामर्दावानी.'

'आमाला रिपोट दे. लगी काठ्या घेऊन माणसं पाठवितों.'

'बराय्.'

असें म्हणून यशवंतानें दोघांचा निरोप घेतला. भराभरा पाय उचलून घरीं आला. घरांत गड्यांनीं सगळा प्रकार सांगितला होता. त्यामुळें सगळे त्याची वाटच पहात होते. कुणी कांहीं, कुणी कांहीं विचारलें. पण यशवंता फारसें कांहीं बोलला नाहीं. म्हातारा कांहींतरी विचारील, जवळ बोलावून घेईल आणि कांहीं सांगेल, असें त्याला सारखें वाटत होतें. पण संभा कांहींच बोलला नाहीं. एका अक्षरानें त्यानें झाल्या प्रकाराची चौकशी केली नाहीं. जेवणखाण आटोपून यशवंता दम्यानें खोकणाऱ्या बापाजवळ जाऊन बसला.

कांहीं न बोलतां बसला. शेवटीं त्याच्या मनांत आलें कीं, काय घडली ती गोष्ट नुसती सांगावी. म्हणून त्यानें तोंड उघडलेंहि. तेवढ्यांत बाहेरून हांक आली,

'यशवंता--'

'ओ--'

अशी हांक देऊन यशवंतानें बसल्या बसल्या वांकून बघितलें तों नाना कुलकर्णी पुन्हां आलेला. दृष्टादृष्ट झाल्यावर नानानें यशवंताला बाहेर येण्याची खूण केली.

'का हो ? हिकडं या कीं, बसा.'

'नको. घाई आहे. तूंच इकडं ये.'

यशवंता उठला आणि अंगणांत गेला. नाना कुलकर्णी हातांत तपेली घेऊन ऐन उनांत बोडका उभा होता. कडेच्या भिंतीची सांवली धरून तो सरकला आणि म्हणाला,

'मग ? ठरलं ना काल सांगितल्याप्रमाणं ?'

यशवंता जरा चांचरला, 'मी–म्हंजे–आजून–'

'अरे, काय इचार करायचाय त्यांत ? द्यायचा धडाड् करून बार उडवून. ते चौगुलं उड्या मारीत पळत येतंय बग तुज्याकडं.'

'उड्या मारीत ?'

'हां, आगदीं टणाण्–'

'म्हाताऱ्याला इचारून सांगतों.'

'कसंहि कर. तुझ्या कल्याणाची गोष्ट सांगितली मीं. वाटलं ऐक, न्हाई तर सोडून दे. मला कळलंय खरं काय आहे तें.'

यशवंता चकित होऊन म्हणाला, 'काय कळलंय ?'

'पाटलानं कान फुंकलेत तुझे. सकाळीं चावडीवर बसून चाललं होतं कांहींतरी सूतगूत. खरं का नाहीं ?'

नाना कुलकर्ण्यानें असा रोखठोक प्रश्न विचारल्यावर यशवंता कांहींच बोलला नाहीं. दृष्टि चुकवून इकडेतिकडे बघत उभा राहिला. तेव्हां नाना जास्तीच चवताळला. हातवारे करून त्यानें पाटलाला बारीक आवाजांत कुचक्या शिव्या घातल्या आणि यशवंताला बजावलें कीं, पाटील आणि

त्याचा मुकादम दोघेहि हरामखोर माणसें आहेत. ते तुम्हां दोघांनाहि मारामारी करायला लावतील. एकमेकांचीं टाळकीं फोडायला लावतील. आणि शेवटीं दोघांकडूनहि प्रकरण मिटवण्यासाठीं पैसे खायला मागतील. शहाण्या माणसानें अशा टग्यांच्या नादाला लागूं नये हें चांगलें. मागाहून फार पश्चात्ताप होईल.

'तुला उदाहरणच सांगतों'—नाना नाकपुड्या फुगवून हातवारे करीत म्हणाला, 'मागं असाच प्रकार घडला. कोण तो ?– आपला हा रे ? भोईट्याचा–'

'हां हा. गणा काय ?' यशवंताला सकाळचें बोलणें आठवलें.

'बरोबर, गणाच. त्याची आशीच काय तरी झकाझकी झाली. पाटलानं पेटवलं प्रकरण. फौजदारीपर्यंत पाळी. मग काय ? पाटलानं पैसा मारला दाबून मधी. मिटवतां मिटवतां नाकीं नव. शेवटाला मग लागला म्हणायला, 'नाना, तुझा सल्ला घेतला असता तर आसं झालं नसतं.' म्हणलं बाबा, आतां म्हणून काय उपयोग ? वेळ गेली ती.'

'निकाल इरुध् लागला म्हणे त्येच्या !'

नाना गंभीरपणें बोलला, 'लागणारच हुता. पर मी चांगल्या वकिलाकडं नेला म्हणून महिन्यावर भागलं. नाहींतर जात होता वर्ष-दीड वर्ष. आन् वेळेवर ऐकलं असतं माझं तर मग कांहींच होत नव्हतं.'

'खरं हाये ?'

'मग ?' नानानें उजवा हात उडवला.

'येतों उद्यांच्याला. काय तरी कायम करून टाकूं.'

'जसं म्हणशील तसं. पण उद्यां तरी नक्की ये बाबा.'

एवढें बजावून नाना निघून गेला. यशवंताचा अगदीं गोंधळ उडाला. त्याला कांहींच कळेनासें झालें. हा पाटील लबाड का नाना लुच्चा ? पैसे कुणीं खाल्ले ? दोघांपैकीं कुणाचें म्हणणें आपल्याला पटण्याजोगें आहे ? कुणाचें ऐकावें ?

यशवंताचें डोकें गुंग होऊन गेलें. त्याला कांहींच कळेनासें झालें. एवढेसें तोंड करून तो मागें फिरला. पायऱ्या चढून घरांत गेला. बापाजवळ बसला. कांहीं न बोलतां मनांत विचार करीत राहिला. डोकें खाजवूं लागला.

३०६१५ ३३ वाचा २५८५ ५।७।६

आणि तेवढ्यांत पुन्हां हांक आली,

'यशवंता--'

यशवंतानें पुन्हां एकदां अंगणाकडे दृष्टि टाकली. त्याच्या पोटांत गोळा आला. पाटील तर नाहीं ! होय ! असायचा एखाद्या वेळीं. त्याचा काय नेम ? नाना येऊन गेला हें कळलं तर तो पुन्हां घरींहि येईल. पुन्हां कांहीं-तरी सांगत बसेल.

भराभर अंगणांत येऊन पाहिलें. पाटील नव्हता. ज्ञानू सुतार होता. आपले पिचपिचे डोळे उनांत वरखालीं करीत तो उभा होता. कधीं नव्हे तो ह्या माणूस कशासाठीं आलाय आज ?

'का ग्यानबा, काय म्हंताय ?

'उगी आपलं. म्हनलं म्हाताऱ्याला आढळून येवं. लई दिसात गांठ न्हाई.'

'वर येताय् का ?'

'हां हां, चला.'

म्हाताऱ्याच्या अंथरुणाजवळ बसून ज्ञानूनें इकडेतिकडे चौकशी केली, घटकाभर गप्पागोष्टी केल्या. म्हाताऱ्या संभानेंहि खोकतखोकत उत्तरें दिलीं असें थोडा वेळ बोलणें झालें. मग डोळे मिचमिच करीत ज्ञानू उगीच बसून राहिला. त्यानें कानामागचा भाग खाजवला. हाताचीं बोटें मोडलीं. खिशांतली तपकिरीची डबी काढून तिची चिमट भसदिशीं नाकांत घालून जोरदार झटका सोसला. डोळ्यांतलें पाणी पुसतांपुसतां आठवण झाल्यासारखा चेहरा केला. म्हणाला,

'आरं यशवंता, एक इचारीन म्हटलं आन् इसरूनच गेलों तिच्या मारी. काल कसली मारमारी झाली रं ? काल झाली म्हण.'

'व्हय. बांधावरच्या झाडावरनं. चौगुल्या न्हाई का इठोबा ? त्येशीं.'

असें म्हणून यशवंतानें आदल्या दिवशीं घडलेली सगळी कथा ज्ञानूला सांगितली. अगदीं तपशीलवार सांगितली. चौगुल्यानें आणि त्याच्या गड्यानें कसकशा काठ्या घातल्या, हातांनीं गुद्दागुद्दी केली तें वर्णन करून सांगितलें. ज्ञानूनें सगळी हकीकत तपकीर ओढत-ओढत ऐकून घेतली.

'आस्सं ! आसं झालं म्हणतोस ?'

'व्हय हो.'

'चौगुल्या मानूस पयल्यापासनं डांबीस. आन एखाद्याच्या मागं लागला म्हंजे लागला. भूत हाये निव्वळ!'

यशवंता मान हलवून बोलला,

'मला तर आसं झालंय कीं कुटनं हें शेतकीचं काम धरलं! आयला, रोज कटकट काय तरी.'

'मग आतां हें मिटवणार कसं काय?'

'नाना कुळकरनी म्हंतोय'—यशवंता अर्धवट बापाला, अर्धवट ज्ञानूला उद्देशून म्हणाला, 'फौजदारी कर चांगल्या वकीलाकडं जा.'

ज्ञानूनें एकदम तपकीर ओढायची थांबवली. चेहरा पोक्त केला.

'हां, यशवंतराव संबाळा हां.'

'का वं?'

'नाना लई लबाड माणूस. शेंदोनशें रुपायाला माती दील तुला, आन् आपण पन्नास खाईल. मागं आसंच त्येनं उद्योग केला. कोण बरं त्यो–?' ज्ञानूनें डोळे मिटले.

'गणा भोईटे ना? हाये ठावं मला.'

'त्योच! नाना, नगं रं बाबा. म्हणच हाय. सोनार, शिंपी, कुलकर्णी आप्पा, तिघांची संगत नको रे बाप्पा.'

यशवंतानें मुंडी हलवली.

'खरं हाय.'

'आन् पाटील काय म्हणत हुता?' ज्ञानूनं चौकशी केली.

'त्योबी म्हनतोय, कोरटांत जाऊं नगंस, नानाच्या नादीं लागूं नगंस.'

'हें बरोबर सांगितलं त्येनं.'

'आणखी म्हणतोय कीं, आपली बाजू खऱ्याची आहे तर पाय मागं कशापायीं? होऊं दे मारामारी झाली तर. आमी हायेच तुज्यामागं.'

'ह्यो मर्दा डात्र हाये त्येचा हां! त्येच्या बी नादाला लागूं नये शाण्या माणसानं. सोकलाय भडवा पैशे खायाला.'

ज्ञानूनें तपकीर ओढतां ओढतां यशवंतला असा बराच उपदेश केला. हीं दोन्ही माणसें कशीं लुच्चीं आणि लबाड आहेत त्याचे अनेक दाखले दिले.

अनुभवानें यशवंताला तें पटलें होतेंच. ज्ञानूसारख्या वयस्थ माणसानें सांगितल्यावर तर त्याला तें जास्तीच पटलें. आतां या प्रकरणांत कसें काय वागावें असें त्यानें ज्ञानूला विचारलें तेव्हां ज्ञानू खुषींत आला. डोळे मिटून अंथरुणावर पडलेल्या संभाकडे बघत त्यानें यशवंताला खूण केली. दोघेहि उठून बाहेर दरवाज्यापर्यंत बोलत आले.

दारापाशीं पोंचल्यावर ज्ञानू खाजगी आवाजांत बोलला,

' एक सांगू ? सरळ घेणार आसशील तर सांगतों. '

नाना कुलकर्णी आणि पाटील हीं दोन्ही लबाड माणसें आहेत, असें ज्ञानूनें सांगितल्यामुळें त्याच्या कळकळीविषयीं यशवंताची खात्री पटली होती. तो म्हणाला,

' सांगा कीं, तुमी काय वाईट सांगणार न्हाई. '

' हो गड्या, मी रास्त आसंल तें बोलणार. '

' बोला. '

ज्ञानूनें इकडे तिकडे पाहिलें.

' चौगुल्या चावट माणूस हाये. सारखी कटकट करीत बसंल रं त्यो.

यशवंताला कांहीं कळलें नाहीं.

' बरं मग ? '

' न्हाई, पण तूं त्याचा संबंधच तोडून टाक. '

' तें कसं काय ? '

' हां, तें सांगतों तुला. ' ज्ञानू जरा थांबला. थोडा वेळ घुटमळला. ' त्या बांधाकडची पांच सात एकर जिमीन निराळीच का करीनास तूं ? '

' म्हंजे ? '

' इकलीस तरी चालंल. कुणीबी घील. चौगुल्यासुदीक घील. मला काय जरूर न्हाई म्हणा, पर मी सुदीक घीन. जमवून देणार आसशील नीट तर बघ. '

यशवंताच्या डोक्यांत उजेड पडला !

' आसं व्हय ? '

' हां, बग, इचार कर. तुला तरी एवढी जिमीन आटपतीया का ? आं ? '

' बगतों. '

'त्यांत काय बगायचंय् ? शेंदोनशें कमीन् जास्त. तुझ्या जिवापुढं त्याची काय किमत ? खरं का न्हाई ? '

'खरंच हाये.' यशवंतानें निमूटपणें मुंडी हलवली.

'कागदाचासुदीक खर्च मी करीन शेवट.'

'सांगतों उद्यांच्याला—'

एवढें म्हणून यशवंतानें ज्ञानूला निरोप दिला. मनाशीं विचार करीत हळूहळू चालत तो अंगण ओलांडून वर आला. बापाच्या अंथरुणाजवळ येऊन बसला. बापाच्या तोंडाकडे उगीच शून्य दृष्टीनें पहात राहिला. मग थोडया वेळानें त्यानें हांक मारली,

'आन्ना—'

संभा डोळे मिटून स्वस्थ पडला होता. पोराची हांक ऐकूं आल्यावर त्यानें डोळे उघडले. हळूहळू कूस बदलली. यशवंताकडे दृष्टि वळवली.

'कां र ?'

'उठून बैस.'

संभाला कांहीं कळलें नाहीं. तरी पण तो उठून बसला. एका हातावर भार देऊन प्रश्नार्थक दृष्टीनें यशवंताकडे पहात राहिला.

'हां, बोल.'

यशवंता बापाजवळ सरकला. त्याचा हात हातांत घेऊन थांबला. मग एकाएकीं म्हणाला,

'आता तूंच सांग. मला काय सांगशील तसं करतों.'

****

## २ : तळफ

सकाळचीं कोंवळीं उनें पसरलीं होतीं. वाऱ्याच्या लहानसहान झोतानें पोपटी पिकें डोलत होतीं आणि झाडावर बसून नाना प्रकारचीं पांखरें गाणीं म्हणत होतीं. सगळीकडे कसें प्रसन्न वातावरण होतें.

आपल्या रानाच्या बांधावर बसून लक्ष्मण घसाघसा दांत घांशीत होता. मधूनमधून तोंडांतली मिश्री खालीं थुंकत होता.

अशा वेळीं एकदम कुणीतरी रामराम केला म्हणून त्यानें दचकून मागं बघितलं. बघितलं तर चौऱ्याचा सोपाना हिरमुसल्या तोंडानं उभा.

' रामराम लक्षुमन. '

' ह्यो रामराम. '

असं म्हणून लक्ष्मण सोपानाकडं बघत राहिला. मुंडी हलवून म्हणाला,

' बस कीं. '

सोपान बसला.

' का आलतास ? '

' उगी आपलं. '

' हिकडं कुनीकडं आलास ? '

' उगी आपलं–'

' इनामदाराच्या नानाकडं आलतास जनू ? '

सोपानानें त्याच्याकडं टक लावून पहात आश्चर्यानें विचारलें, ' इनामदाराचा नाना ? '

' व्हय. रानांत आज आलाय न्हवं फाटचा. मला गड्या वाटलं, तू त्याच्याकडंच आला असचीला. '

गांवांतला म्हातारा इनामदार नुकताच अपंग होऊन अंथरुणावर पडला होता. त्याचा शेतीचा बारदाना बऱ्यापैकीं होता. म्हाताऱ्याचा एकुलता एक पोरगा नाना शहरांत शिकत होता आणि बरीच वर्षं गांवाकडं आला नव्हता. त्यामुळं इनामदाराची शेतीभाती आतां कोण सांभाळणार हें कुणाला माहीत नव्हतें. कारण पोरगा गांवीं यायला तयार नव्हता असें ऐकिवांत होतें.

सोपानाला इतकी सगळी माहिती होती. पण नाना गांवीं आला आहे आणि तो पहांटचा रानांतही आला आहे, हें मात्र त्याला कळलें नव्हतें. दोन दिवस तो पाव्हण्याकडं शेजारगांवीं गेला होता आणि आदल्या रात्रींच परत आला होता. त्याला माहीत नव्हतें.

पण तें न दाखवतां तो म्हणाला,

' तर ! मी त्येच्याकडंच आलुया. पर म्हटलं, लक्षुमन हाय शेजारा. काय कसं हाय, खबर घिवून यावी. '

' आमचं कसं असायचं ? आनंद हाय. '

असं म्हणून लक्ष्मण ओठाला जीभ लावीत थुंकला.

सोपाना डाव्या हाताच्या तळव्यावर उजव्या हाताचं दुसरं बोट ठेवून उगीचच रिकामा हात चोळत राहिला. थोड्या वेळानं तो म्हणाला,

' लक्षुमन —'

' का रं बाबा ? '

' जरा तमाखू असली तर दे की उलीशी. '

' तमाखू ? अरारा... '

' का रं ? '

' त्येका माज्याकडं बी न्हायी. शाफ खलास. '

' बरं मिश्री तर दे. '

' हात् मर्दा, तुला उशीर झाला ! '

' का बरं ? '

लक्ष्मणानें रिकाम्या मडक्याकडे बोट दाखविलें.

' हे बघ. आत्तांच दांत घासलं, संपली पाक. लास्ट चिमट हुती. आधी बोलायचं न्हाई व्हय ? '

हें ऐकू सोपान चुकचुकला.

' सकाळपासनं दांत हुळहुळतोय बघ. '

यावर लक्ष्मणानें गंभीर चेहरा केला. थोडा वेळ विचार केल्यासारखें केलें आणि म्हटलें.

' असं का करतो का ? '

' कसं ? '

' मुका घेतो का माज्या तोंडाचा ? म्हंजी हुईल तुजी हुळहुळ कमी ! '

लक्ष्मणनें अशी चेष्टा चालवली तेव्हां मग सोपाना तिथं थांबलाच नाहीं. तो घाईघाईनें उठला आणि तोंडांतल्या तोंडांत शिव्या पुटपुटत निघाला. लक्ष्मणानें आग्रह केला तरीसुद्धां तो थांबला नाहीं. बांधावरनं चालत चालत तो इनामदाराच्या रानाकडं आला. बांधावरनंच लांबचं न्याहाळत राहिला.

दूरवर आडव्या बांधावर एक तरणा माणूस एकटाच उभा होता. त्याचे कपडे लांबूनही पांढरे धोप दिसत होते. ते बघून सोपानानें ओळखलें कीं इनामदाराचा नाना हाय.

मग आडव्या बांधावरनं भराभर चालत जात सोपाना नानाजवळ जाऊन पोंचला. नानाकडं निरखून बघूं लागला.

बावीस–चोवीस वर्षांचा नाना रंगानं गोरा आणि अंगानं भरलेला होता. उंच आणि तरतरीत नाक, डोईचा भांग आणि खळणीचे कपडे यांनीं तो अगदीं छबकडा दिसत होता. किंचित् त्रासिक चेहरा करून तो आपल्या रानाकडं फिरून फिरून पहात होता.

लांबवर गडीमाणसं कामांत गुंतलेलीं दिसत होतीं. मोटेचा कुरकुर आवाज सतत चालला होता आणि त्या तालावर वहात चाललेलें पाटाचें पाणी नानाच्या पायाजवळनं चाललं होतं. त्या पाण्यांत तो मधूनमधून डोकावीत भांग साफ करीत होता.

' पानी लई छानबाज सुटलयां ?...बाकी हीर दणकेबाज हाय म्हना तुमची. काय कमी हाय ! '

आपण प्रश्न विचारून आपणच उत्तर देणारा हा कोण माणूस आहे या विचारानें नादांत असलेल्या नानानं मागं वळून पाहिलं तेव्हां एक शिडशिडीत अंगाचा, काळसर माणूस हंसतमुखानं उभा असलेला दिसला. हा कोण ? आपल्याला तर कांहीं ओळख लागत नाहीं. पण खेडेगांवांत बोलायला ओळख लागतेच असं कांहीं नाहीं. असेल कुणीतरी गांवांतला.

उत्तरादाखल थोडेंसें हंसून नाना बोलला,

'अं ?...हं हं.'

त्यानें 'अं' कशाला केलें आणि 'हं हं' तरी तो कां म्हणाला, कोण जाणें. त्याचें त्यालाही नीटसें कळलें नाहीं

'मला वळखलं का न्हायी नानासाहेब ?'

'अं...'

'अव मी सोपाना चौरे न्हवं का ?'

'हं हं. आतां आलं लक्षांत.'

असें म्हणून नाना त्याच्याकडे बघून हंसला. मग सलगीच्या सुरांत म्हणाला,

'हं, काय सोपाना--'

'जी.'

'पीकपाणी कसं काय यंदा गांवांत ?'

'हाय, बरं हाय. तुमच्यासारक्याच्या क्रिपेनं.'

'शेतकी काय म्हणती ?'

'पावसानं चांगला नेट धरला हुता. आत्तां आभाळ जर फिरलं झकास तर खंडीनं मोजून घ्यावं. हो.'

'अस्सं !'

'व्हय.'

'तुमची किती जमीन आहे घरीं सोपाना ?'

'माजी ! म्हणजे आमची घरीं ठिवल्याली म्हंतां काय ?'

'हं हं.'

'आमाला तुकडाभर जिमीनबी न्हायी.'

सोपानानें सहज दिलेलें हें उत्तर ऐकून नानांना आश्चर्य वाटलें.

'म्हणजे काय ?'

'व्हय की. मला कुटली आलिया वो जिमीन ?'

'मग आत्तां काय सांगत होतास ?'

'कुठं काय ? '

'आभाळ फिरायला पाहिजे अन् खंडीनं मोजून घ्या ? आं !'

'हां हां,' सोपाना निर्विकारपणानं बोलला, 'त्ये आपलं सर्वसाधारन सांगितलं म्यां–बाकीच्यांचं सांगितलं.'

सोपानाचें हें बोलणें ऐकून नानाला मोठी गंमत वाटली. मघाशीं ऐटींत एक बोलला काय, आत्तां पुन्हां दुसरेंच सांगतो काय ! .. मोठा गंमतीदार स्वभाव दिसतो याचा. घटकाभर गप्पा मारायला हरकत नाहीं. तेवढाच या खेडेगांवांत वेळ जाईल.

असा विचार करून तो म्हणाला,

'काय सोपाना, उद्योग नसला तर चल घरापर्यंत. येणार का ?'

सोपानानं डोळे मिटून क्षणभर विचार केला. मग तो म्हणाला,

'उद्योग हायेच कीं. पन तुमी आता म्हनताय तर चला. येतो सोबत.'

• 'चल.'

असं म्हणून नाना बांधावरनं भराभरा चालूं लागला. त्याच्या मागोमाग सोपानहि लगबगीनं निघाला. बोलत बोलत दोघेहि रान ओलांडून मोठ्या रस्त्याला लागले.

चालतां चालतां नाना म्हणाला,

'एकदां मला वाटतंय, शेती करावी घरीं. सोडून काय झालंय ?'

सोपाना मान हलवून म्हणाला,

'शेती केलीच पायजे. सोडूं ने.'

'पण पुन्हां वाटतं, जमल का नाही ?'

'हृये बरूबर हाय.'

'हल्लीं शेती फार कठीण झालीय.'

'लई अडीअडचणी हायती बगा. काय इचारूं नगासा.'

'पण मी निश्चय केलाय कीं करायची शेती.'

'भले भले! बराबर केलंत बगा.'

'लोक म्हणतात, खेडेगांवं बिघडलींत, माणसं फार वाईट झाल्याती. एकाचढ एक आगाऊ. पण मी म्हणतों, आपण हुषार असल्यावर कुणाची आय व्यालीय फसवायची आपल्याला?'

'तर वो! आपन खंबीर असल्यावर कोन काय करतंय?'

'पुन्हां असं वाटतं कीं करायची काय शेती? विकावी, नाहींतर खंडानं लावावी अन् शहरांत जाऊन रहावं.'

'व्हय की. शेरांतली मज्जा काय हितं येनार हाय का?...तसंच करावं शेवट.'

अशा पद्धतीनें घर येईपर्यंत प्रश्नोत्तरें चाललीं. नाना आपल्या नादांत गुंग होता आणि मधूनमधून तो भांगावरनं हात फिरवीत होता आणि मनांत येईल तें बोलत होता. सोपाना काय बोलला याचा त्याला पत्ता नव्हता. तिकडे त्याचें लक्षच नव्हतें.

घरापाशीं आल्यावर नाना थांबला व म्हणाला,

'बराय् मग. या असंच केव्हांतरी.'

सोपाना तिथंच उभा राहिला. क्षणभर नानाकडं टक लावून पहात त्यानें पुन्हां कांहींतरी विचार केला. बोलावं का बोलूं नये, असा कांहींतरी भाव त्याच्या तोंडावर दिसला. मग तो मान हलवून बोलला,

'बराय् एक काम हुतं, पर आतां यीन पुना कवांतरी.'

'काम?'

'व्हय. तुमच्या फायद्याचं कलम हाय. म्हनूनच अर्जंट सकाळीं आलतो.'

आपल्या कांहींतरी फायद्याची गोष्ट आहे हें ऐकल्यावर नानाची उत्सुकता वाढली. काय काम आहे तें विचारून घ्यावें, असें त्याला वाटूं लागलें. म्हणून त्यानें हातानें खूण करीत म्हटलें,

'अस्सं?...मग ये कीं आंत. बैस घटकाभर.'

आंत ओसरीवर मोठी सतरंजी टाकलेली होती गादी होती. चार–दोन तक्के, दोन खुर्च्या आणि आणखी तसलेंच बरेंच सामान होतें. सोपाना सतरंजीचें टोंक धरून बसला. नाना त्याला बसायला सांगून आंत गेला आणि

घटकाभरांत तोंड पुशीत परत आला. आंत जाऊन हा चहापाणी करून आला असला पाहिजे, एवढें सोपानाच्या लक्षांत आलें, पण तो कांहीं बोलला नाहीं. वर टांगलेल्या देवादिकांच्या फोटोकडं उगीच टक लावून बघत तो थांबला.

नानानें तक्क्या आडवा घेतला आणि गादीवर लोळण घेऊन तो आरामशीर पडला. हाताला आलें तें वर्तमानपत्र उचलून त्यांतल्या सिनेमाच्या जाहिराती वाचूं लागला. थोड्या वेळानं म्हणाला,

'आ ?... सोपाना, बोल कीं र ?'

सोपाना इतका वेळ उगीचच ताटकळत बसला होता. नाना बोलल्यावर मग त्याला कंठ फुटला. जरा हलल्यासारखं करून तो म्हणाला,

'नानासाहेब, यंदा वाजनार हाय म्हन तुमचं ?'

आपल्या लग्नाची चौकशी हा कां करतो आहे, हें नानाला कळलें नाहीं. यंदां आपल्याला कर्तव्य आहे ही गोष्ट खरी; आतां गांवांतहि चार जणांना त्याचा सुगावा लागला असेल. पण याचा त्याच्याशीं काय संबंध ?'

नानाला नीटसें उमगलें नाहीं. तो म्हणाला,

'कां रे बाबा चौकशा ? '

'तसं न्हवं, लाडूचा इचार आपला हाय का न्हव हे इचारलं. '

'बरं आहे. मग ?'

हें उत्तर ऐकल्यावर सोपानाचा चेहरा खुलला. खुषींत येऊन आणि किंचित् पुढं सरकून तो म्हणाला,

'एक झकास सोयरिक आणूं का तुमाला ? '

सोपानानें ध्यानींमनीं नसतांना हा प्रश्न विचारलेला पाहून नानाला एकदम खुद्कन् हंसूंच आलें.

'चेष्टा न्हवं. खरंच इचारतुया.'

'कुठली सोयरिक आणणार आहेस ?'

'आहे आपली. एकदम नंबरी. आनूं का नको इवढं सांगा.'

'पण कसली, कुठली—?'

'पोरगी लई फाकडूबाज हाय ब ा. गोरीपान नुस्ती हळदीसारखी.'

हें ऐकल्यावर नानाचें हंसणें कमी झालें. सोपानाच्या बोलण्याकडे

त्याचें एकाएकीं लक्ष वेधलें. मुलगी चांगली आहे म्हटल्यावर त्याला कुतूहल वाटूं लागलें. तो नकळत उठून बसला.

'काय म्हणतोस ?'

'व्हय नानासाहेब. नाकेली अन् गोरीपान. अंगानं शेलाटी. तोंड तर लई मंजुळ दिसतंय बगा.'

'खरं ?'

'अगदीं नामांकित काम '

'मुलगी कुणाची ?'

'आमच्या मावळणीचं गांव हाय नगरकडं तकडं. तिकडचीच हाय. तियला पावना आला हुता परवा माज्याकडं.'

'बरं मग ?'

'त्यो म्हणाला कीं आसंआसं वतनदार देशपांड्याचं घर हाय गांवांत. चांगली विस्टेट हाये. घरांत बा हाय, चुलता हाय, चुलती हाय—'

'पण मुलगी–?'

'बहिणी हायत्या, भाऊबी हायेत—'

'पण मुलगी–?'

'आन् आज्जा हाय अन् आज्जीबी हाय.'

नाना किंचित् रागावून, भुंवई चढवून म्हणाला,

'पण वय काय तिचं ?'

'कुणाचं ? आजीचं ?...असंल की सत्तर–पंचाहत्तर.'

'लेका ! आजीचं वय कशाला ?'

'मग ?'

'मुलीचं.'

'हां हां. मुलीचं वय इचारलं व्हय तुमी ?'

सोपाना दिलगिरीच्या सुरांत म्हणाला, 'मुलगी आसंल की सतरा–अठरा न्हायितर अठरा–एकूनीस. हां, इकतीच असं.'

नानाचें वय तेवीस–चोवीस वर्षांचें होतें. त्या दृष्टीनें मुलीचें वय अगदीं अनुरूप होतें. आहे हें सगळें छान जुळण्यासारखें होतें.

मग नानाच्या एकाएकीं लक्षांत आलें कीं सोपाना आपल्यापासून बराच लांब, सतरंजीवर अर्धा आणि भुईवर अर्धा बसलेला आहे; इतकी चांगली, महत्त्वाची गोष्ट सांगण्याऱ्याला थोडेंसें जवळ बोलावून घ्यायला पाहिजे. तो एकदम म्हणाला,

'अरे सोपाना, खालींच बसला आहेस होय जमिनीवर? भले!... वर ये ना. नीट बैस...असं!'

सोपाना गादीपाशीं येऊन बसल्यावर नानाला आणखी बऱ्याच गोष्टी विचाराव्याशा वाटूं लागल्या. पण आपली उत्कंठा इतक्या उघडपणें दाखविणें बरें दिसणार नाहीं म्हणून मनांत आलेल्या गोष्टी तशाच मागं परतवून तो म्हणाला,

'एकूण मुलगी चांगली आहे म्हणतोस!'

गादीशेजारींच पानाचें तबक पडलें होतें त्यांतील अडकित्यानें सुपारी फोडून ती नानाच्या हातांत ठेवीत सोपाना बोलला,

'आतां काय सांगावं! महालक्षुमीच्या मुखवटयावानी हुत्या बहिनी–बहिनी. एक झाकावी आन् दुसरी काडावी.'

बहिनीबहिनी म्हटल्यावर नानाला एकदम आश्चर्य वाटलें. हें मध्येंच एकदम काय निघालें!

बहिणीबहिणी!'

'हां.'

'म्हणजे दोन मुली आहेत का लग्नाच्या?'

'न्हायी, एकच.'

'मग बहिणीबहिणी काय?'

'मुलीला बहीण होती ना एक! तिचं लग्न झालं.'

'थोरलीचं?'

सोपाना हंसून आणखी पुढं सरकला. पानसुपारीचें साहित्य चाळवीत तो म्हणाला,

'हां, तीच गंमत हाय. लगीन थोरलीचं झालं का धाकटीचं झालं याचा पत्त्याच लागत नाय अजून.'

नानानें एकदां डोळे वर खालीं केले. किंचित् बुचकळयांत पडून तो म्हणाला,

'म्हणजे काय ?'

'अवं, दोघी बहिनी दिसायला सादमुद सारक्या. त्येनंच हा घोळ हुतूया. लगीन कुनाचं झालं हें घरांतल्या मानसांनाबी कळालं न्हायी म्हंत्यात अजून.'

सोपानाचें हें उत्तर ऐकून नानाला फार हंसूं आलें. एखाद्या सत्य घटनेचें थोडचा अतिशयोक्तीनें वर्णन करण्याचें या माणसाचें कसब त्याला फार गंमतीदार वाटलें. मग तोही गंमतीला आला. म्हणाला,

'त्या बहिणींना स्वतःला तरी माहिती आहे का कुणाचं लग्न झालं म्हणून ? नाहींतर लग्न न झालेली बहीणच सासरीं जायची !'

नानाच्या या प्रश्नाला सोपननें लवकर उत्तर दिलें नाहीं. कारण तयार केलेला सुरेख चौपानी विडा त्यानें तोंडांत घातला होता. त्यावर तंबाखूची एक जबरदस्त चिमट गालफडांत ठेवून दिली होती. आणि एखाद्या म्हशीप्रमाणें संथ आणि समाधानी चित्तानें तो जबडा हलवीत स्वस्थ बसून राहिला होता. दोन मिनिटेंपर्यंत तो असाच स्वस्थ बसून राहिला. तंबाखूची गुंगी घटकाभर घेतली, कळा मस्तकापर्यंत जाऊन पोंचल्या तसें त्याला बरें वाटलें.

संभाषण चालूं करता येईल इतकी पिंक शेजारच्या तस्तांत टाकून तो म्हणाला,

'काय म्हणाला ?'

नाहीं म्हटलें तरी नानाला या प्रकरणाबद्दल बरीच उत्सुकता निर्माण झाली होती. मुलगी रूपानें चांगली आहे एवढीच महत्त्वाची गोष्ट सोपानच्या बोलण्यावरून आतां निश्चित झाली होती. पण तेवढचानें भागण्यासारखें नव्हतें. त्याच्या जोडीला बाकीची माहिती कळणेंहि आवश्यक होतें. शेतीवाडी, घरदार, माणसें, स्वभाव याचा अदमासहि कळला म्हणजे बरें. नाहीं म्हटलें तरी आपण इनामदार; तेव्हां आपल्या मोलानें हुंडा देणारें स्थळ असलें तर बरें. सगळें कांहीं तसें व्यवस्थित असेल तर 'दाखवायला घेऊन या' असा निरोप द्यायला कांहीं हरकत नाहीं. जमलें खरोखर तर छानच झालें ! ...

सोपाना पानतंबाखूच्या नादांत होता तोंपर्यंत नानाच्या मनांत असे विचार आले. सोपानाच्या उलट प्रश्नानें तो पुन्हां भानावर येऊनं हंसून म्हणाला,

'आपल्यापैकीं कुणाचं लग्न झालंय् हें त्या बहिणींना तरी कळलय् का, असं विचारलं मी.'

हें ऐकून, सोपानाहि तोंड सांभाळून जितकं हंसतां येईल तितकं हंसला.

'ह्यॅं ह्यॅं !...ते मातुर ठावं न्हयी आं. त्या दोघीत जरा का ह्यो घोळ पडला तर नवरा आडवाच झाला मग.'

'बरं; ते जाऊं दे. घरची परिस्थिति कशी आहे ?'

'कुणाची ! त्या नवऱ्याची ?'

'त्याची काय करायची ?' नाना त्रासला.

'मग ?'

'ह्यांच्या घरची.'

'हां हां. झकास हाय. त्येला काय झालं ! विस्टेट म्हंजी जळता जळायची न्हाई इवती हाय. दोनशें एकर बागाईत हाय नुस्ती.'

'आं ?...अरे बापरे. !'

'मग !...सांगतोय काय ! पन्नास बैलजोडचा हायत्या दावणीला.

'दांडगा बारदाना आहे कीं.'

'तर ! पन्नास गडीमाणसं हायेत कामाला नुस्ती. दाबून पैका हायहूं, गबरगंड काम.'

'अस्सं.'

'जांवयाला हुंडा हज्जारानी देत्यात हज्जारानी ! पयल्याला धा हज्जार दिलं. दुसऱ्यालाबी तितकंच गठ्ठं ठिवलंय म्हनत्यात.'

'दहा हजार !' नाना चकित होऊन म्हणाला,

'खरं म्हणतोस ?'

'आईच्यान् खरं. लबाड बोलून मला काय मिळणार ?'

सोपानानें सांगितलेली माहिती ऐकून नानाचें काळीच एकदम एखाद्या पाकोळीसारखें उडालें दहा हजार रुपये हुंडा हें ऐकून त्याचे डोळे फाटले. आतां सोपाना सांगतो त्यांत अतिशयोक्ति असेल थोडी. पण अजूनहि खेडे-

गांवांत कांहीं ठिकाणीं मातबर घरं आहेत, त्यांच्यांत इतका खर्च करायची हिंमत आहे. तेव्हां ही गोष्ट खरी असेलही...

या विचारानं नानाच्या अंगावर काटे आले. एक सुंदर मुलगी बायको म्हणून करून घेण्याच्या दगदगीबद्दल दहा हजार रुपये इतकी रक्कम तर आपण कधींच अपेक्षिली नाहीं. एकूण आपला योग चांगला दिसतो. नाहींतर हा फाटका माणूस आपणहून चालत इथं कशाला येता आणि हें सगळं कशाला सांगता ?...तरी पण थोडी खात्री करून घ्यावी हें बरं.

मग त्यानें सोपानाला विचारलें,

'पण हें जुळण्यासारखं आहे का ?'

मान हलवून आणि पुन्हां तंबाखू तोंडांत टाकून सोपाना म्हणाला.

'न जुळायला काय झालं ? त्ये तर म्हनलं कीं एखादा गरीब मुलगा असला तरी चालंल, पन सोभावानं नाभांकित पायजे.'

'बरं !'

'आन् डोस्कानं लई हुशार पायजे.

'मग ?'

'आमच्या पाव्हन्याला मी सांगितलं कीं आमचं नानासाहेब डिट्टू तसं हायती आन् वर इनामदार हायतो. काय कमी न्हायी त्येस्नी.'

हें ऐकून अर्थातच नानाला मनांतून थोडेंसें फुरफुरल्यासारखें झालें.

'मग पाव्हणा काय म्हणाला ?'

'पावना म्हणाला कीं आधीं नानासाहेबास्नी सांगून त्येंची फर्मिशन घे आन् हिकडं कळव. म्हंजे लगी तीं माणसं आढळायला हिकडं येत्यालीच.'

सोपानानें अशा रीतीनें सगळी माहिती सांगून पूर्ण केली आणि तंबाखू चघळत तो थांबून राहिला. थोड्या वेळानें त्यानें विचारलें.

'मग कसं काय करायचं ? काय कळवूं द्या तिकडं ?'

नानाच्या मनांत उत्तर तयार होतें. पण विचार केल्यासारखें दाखवीत तो म्हणाला,

'आतां तूं म्हणतो आहेस एवढं चांगलं स्थळ आहे—'

'तर वो ! त्याची तुमी काय चौकशीच करूं नगा.'

'मग कळव तिकडं.'

नानाचें हें उत्तर ऐकल्यावर सोपानानें मांडा ठोकलेलें आसन बदललें. एकदम दोन पायावर बसून त्यानें डब्यांतली बचकभर तंबाखू उचलली आणि ती आपल्या रिकाम्या पिशवींत घातली. मग घाईघाईनें उठत तो म्हणाला,

'बराय्, जातो मग मी. लई वाडुळ झाला बसून.'

नानानें त्याचा हात धरून आग्रहानें त्याला खालीं बसवलें.

'बसरे, काय एवढी गडबड आहे?'

'तसं कसं? कामं पडल्याली हायेत न्.'

'पण चहाबिहा तर घेऊन जाशील?'

'आत्तां च्या म्हनल्यावर न्हायी म्हनतां येत न्हायी खरं, पन--'

सोपाना पुन्हां बसला. नाना आंत जाऊन चहा सांगून आला, तोंपर्यंत त्यानें पुन्हां एकदां पानाचा बार उडवला. तंबाखू तोंडांत घालून तो, उंदीर गिळालेल्या एखाद्या सर्पासारखा सुस्त बसून राहिला. तोंट मिटून बसून राहिला. एक अक्षर बोलला नाहीं. नानाच्या मनांत त्याला आणखी कांहीं विचारावयाचें होतें. पण त्यानें जबडा मिटवून ठेवल्यामुळें नानाला कांहींच विचारतां आलें नाहीं.

दहा मिनिटांनीं चहा आला. पाण्याचा तांब्या हातांत घेऊन सोपानानें अंगणांतल्या कोंपऱ्यांत चूळ भरली नि तोंड स्वच्छ केलें. नंतर चहा बशींत ओतून 'फुरफुर' करीत पिऊन टाकला.

मग धोतरानं ओठ पुशीत तो म्हणाला,

'चहा आईसाहेबांनीं केला असंल?'

नाना म्हणाला,

'होय.'

'तरीच टेसदार झालाया. आतां लगीन ठरल्यावर नुसत्या च्यानं भागायचं न्हायी आं नानासाहेब. अगदीं कनिष्ट म्हंजी लाडू पायजेच.'

नानाला गुदगुल्या झाल्या.

'देऊं रे. लाडूला काय तोटा!'

'न्हायी, आपलं एक सांगितलं.'

एवढा संवाद झाल्यावर सोपानानें घाईघाई नंच पण पुन्हां एकदां चार पानांचा गरगरीत बेत केला. तोंड विड्यानें गच्च भरलें. हातावर बचकभर तबाखू घेऊन तिला चुना लावीत तो उठला.

'बराय, जातु मग, लेट झाला.'

नानानें नुसती मान हलवली आणि त्याच्याकडे हंसून पाहिलें. तेव्हां तोहि हंसला आणि भराभरा पाय उचलीत दरवाज्याकडं गेला. दरवाजा-बाहेर पडून दिसेनासा झाला.

तो गेल्यावर नानानें एकदां आरशांत बघून भांग काढला आणि मग गादीवर लोळत तो पुन्हां वर्तमानपत्रांतल्या सिनेमाच्या जाहिराती वाचत पडला. खुषींत येऊन तोंडानें शीळ वाजवूं लागला.

तेवढ्यांत रानांतनं म्हातारे गोविंदराव दिवाणजी परत आले.

ओसरीवर नाना गादीवर लोळत पडलेला पाहून त्यांनीं रागानें मान हलवली. नंतर हाक मारून विचारलें,

'भले ! मला वाटलं तुमची तब्येत बरी नाहीं म्हणून तुम्हीं परत आलां. शाबास !'

म्हाताऱ्याच्या अति काळजी घेणाऱ्या वृत्तीचा नानाला नेहमींच राग येत असे. आतांहि त्याला राग आला, पण तो दाबून तो म्हणाला.

'हां. आला कंटाळा हिंडून हिंडून. आलों झालं परत.'

'अहो, पण कामं आहेत सुरू. देखरेख पाहिजे. तुम्हीं बघायची नाहीं व्यवस्था तर कोण बघणार ?'

'काय त्यांत विशेष बघायचंच ?'

'असं कसं ?...लोक महाइब्लिस असतात. फसवतात आपल्याला. आपली स्वत:ची नजर नको का ?'

नाना चिडून म्हणाला,

'आपण खंबीर असल्यावर कोण काय करणार आहे आपल्याला ? नुसतीं तोंडं बघून मी माणसं ओळखतों.'

हें उत्तर ऐकून तो अनुभवी म्हातारा कांहीं बोलला नाहीं. गप्प बसला. मग त्याचें लक्ष ओसरीवरच्या रिकाम्या कपबशीकडे गेलें.

'कुणी येऊन गेलं वाटतं इथं ?'

'हूं.'

'कोण ?'

'सोपाना चौरे.'

'सोपाना ?' म्हातारा चकित होऊन म्हणाला, 'तो लेकाचा इथं कशाला आला होता ?'

दिवाणजींनीं प्रश्न विचारल्यावर नाना उत्साहानें म्हणाला, 'मुलीचं स्थळ घेऊन आला होता माझ्यासाठीं. फार श्रीमंत—'

त्याच्या बोलण्याकडं दुर्लक्ष करून म्हातारा म्हणाला,

'किती वेळ बसला होता ?'

'होता तासभर. पण कां ?'

'तंबाखू खाल्ली का इथं त्यानं ?'

'हो, खाल्ली.'

'किती खाल्ली ?'

नानानं आत्तां पानाच्या तबकाकडं पाहिलं. तंबाखूची डबी सबंध रिकामीच होती.

तो म्हणाला, 'बरीच खाल्ली वाटतं. पण कशासाठीं विचारतांय तुम्हीं हें सगळं ?'

'अरे, तो निव्वळ टग्या आहे.'

'टग्या !'

दिवाणजी नानाकडं टक लावून पहात म्हणाले, 'टग्या नाहींतर काय !... तंबाखूची तलफ दांडगी. पण विकत घेऊन कधीं खायची नाहीं. कुणाकडंतरी जाऊन बसायचं. तोंडाला सुचेल तें बोलायचं. गप्पा हाणून दुसऱ्याला गार करायचं अन् पानतंबाखू खाऊन चालू लागायचं हा त्याचा रोजचा धंदाच आहे...हं, कसलं स्थळ आणलं होतं त्यानं तुझ्यासाठीं ?'

****

# ४ : शस्त्र

निवृत्ति पवाराचा मळा दोन ओढ्यांच्या बेचक्यांत होता. सगळ्या बाजूंनीं लोकांचीं रानें होतीं. ओढ्याकांठानें करंज गच्च माजला होता. कंजाळ वाढलें होतें. पंचवीसतीस एकरांचा काळाकरंद पट्टा एका तळावर असल्यामुळें पवाराचा मळा संबंध तालुक्यांत लोकांच्या ऐकण्यांत होता. तसा निवृत्तीहि कामाला जबरा गडी. नाहीं म्हटलें तरी मळ्यांत त्यानें आठदहा एकर ऊस कायम उभा केला होता. दोन विहिरींवर दोन इंजिनें लावून पाणी हातांत ठेवलेलें होतें. त्यामुळें हिरव्यागार कांकणासारखा त्याचा मळा एकसारखा शोभत असे. लगत दोन ओढे. एका बाजूनें उंच माळ. त्यामुळें पावसाचें पाणी मळ्यांत सहजासहजीं उभें राही. विहिरी बारमाही भरलेल्या असत.

एकूण निवृत्ति पवाराची शेतकी जोरदार होती. शेतीला शोभेल असाच त्याचा बारदाना होता. दहा–बारा बैलांची दावण, गाई, म्हशी, खोंड यांमुळें त्याची शेती सदैव हलतीझुलती, वाजतीगाजती असे. कडब्याची गंज रोज विस्कटली जाई. गुरांच्या चंगाळ्या एकसारख्या वाजत. दहापांच गडीमाणसांचा कालवा सारखा चालू असे. पैसा मिळत गेला तशी त्यानें वस्तीहि चांगली नीटनेटकी केली होती. स्वतःला रहायला चांगलें घर बांधलें होतें. त्याशिवाय गड्यांसाठीं घरें. धान्य सांठवायला लहानसें गुदाम, बसाउठायला एक लांबट पडवी. समोर लिंबापिंपळाचे पक्के पार. मधल्या प्रशस्त जागेंत वाळू...कुठें -कांहीं कमी नव्हतें.

अलीकडे वर्षा–दोन–वर्षांत गडी भलताच उबदारीला आला होता. पण तितकाच तो काळजीनें पोखरतहि होता.

निवृत्तीच्या काळजीचें कारण कांहीं खोटें नव्हतें. या वर्षा दोन वर्षांत चोऱ्यामाऱ्या, दरोडे हे प्रकार फार वाढले होते. तालुक्यांत पारध्यांची वस्ती होती. वाड्यावस्त्यांवर हमेशा धाड पडे. बारीकसारीक चोऱ्या तर एकसारख्या होत. पण क्वचित् मोठा दरोडाहि पडे. वस्त्यांवरचें असेल नसेल तें लुटून चोरटे पसार होत. कांहीं वेळां त्यांचा पत्ता लागे. कांहीं वेळां अजिबात लागत नसे. निवृत्तीच्या मळ्याच्या आसपास असलेल्या रानांत हे प्रकार अधूनमधून सारखे चालले होते. त्यामुळें सगळीकडे विलक्षण दहशत बसली होती. आज काय धाडग्यांच्या वस्तीवर धाड आली, उद्यां शेटच्यांच्या गडीमाणसांना बेदम मार बसला, परवां बामणाच्या मळ्यांतलीं दहा पोतीं हातोहात नाहींशीं झालीं, असा प्रकार रोज कानावर येत होता. अजून निवृत्तीच्या वस्तीला डंख नव्हता. त्याच्या वाटेला अजून तरी कोणी गेलें नव्हतें. पण त्यामुळेंच त्याची धाकधूक वाढली होती. आज ना उद्यां आपल्याहि मळ्यांत हें लोण येऊन पोंचणार याबद्दल त्याला खात्री होती. आणि आपल्याकडे भुरट्या चोऱ्या होणार नाहींत, दरोडाच पडेल वस्तीवर धान्यधुन्य, गुरेंढोरें पैसा-अडका एवढा आहे, कीं दरोडाच पडेल. पांच–पंचवीस मंडळी कुऱ्हाडी-फरशा घेऊन घुसतील; वस्तीवरच्या माणसांना बडवबडव बडवतील आणि हातीं लागेल तें घेऊन, घर स्वच्छ करून पसार होतील. असें झालें तर? त्याला कसें तोंड द्यायचें? कसा प्रतिकार करायचा? एकदां वहिवाट पडली तर हा त्रास आपल्या पाठीमागें जन्माचा लागला म्हणून समजावें. त्याच्या आधींच काहींतरी बंदोबस्त केला पाहिजे.

या काळजीनें निवृत्तीची अलीकडे झोप उडाली होती. तो मनाशीं एक-सारखा विचार करीत होता. पण कांहीं मार्ग दिसत नव्हता. त्याची काळजी वाढत होती.

तसा निवृत्ति कांहीं लेचापेचा गडी नव्हता. चांगला तारणाबांड उमे-दीचा होता. उंचापुरा, धष्टपुष्ट आणि ताकदवान् होता. त्याची छाती एखाद्या दगडी भिंतीसारखी होती. मनगट लोखंडी होतें. चिडला म्हणजे त्याच्या डोळ्याला डोळा भिडवण्याची गडीमाणसांची हिंमत नव्हती. पांचसात जणांना

तो एकटा भारी होता. पण तरी तेवढ्यानें भागण्याजोगें नव्हतें. कितीहि रग असलेला माणूस एकटा काय करणार ? दरोडा आलाच आणि पांचपंचवीस माणसांनीं हल्ला केलाच तर आपण एकटे किती पुरे पडणार ! शेवटीं एका माणसाचें बळ तें किती ?

निवृत्तीला हें मनांतून नीट कळत होतें. त्याचा जीव टांगणीला लागला होता. तो एकसारखा विचार करीत होता.

रात्र चांगली झाली. बाहेर काळाकुट्ट अंधार पडला. गार वारा सुटला. दिवसभराचीं कामें आटोपून, जेवणींखाणीं करून गडीमाणसें पडवीला येऊन टेकलीं. खांद्यापर्यंत घोंगडी पांघरून एकमेकांशीं बोलत राहिलीं. निवृत्तीहि जेऊन धोतराला हात पुशीतपुशीत येऊन बसला. तक्क्याला रेलला. उगीच इकडेतिकडे पहात राहिला. कंदिलाच्या तांबूस अपुऱ्या उजेडांत त्याचा चेहरा खंगलेला दिसला.

निवृत्ती येऊन बसल्यावर थोडा वेळ सगळेच गप्प झाले. कुणींच कांहीं बोललें नाहीं. बाहेर गुरांच्या गळ्यांतल्या घंटा वाजल्या, त्यांचीं शिंगें हललीं, बायकामाणसांपैकीं कुणीतरी कुणाशीं बोललें. भांडीं विसळल्याचा आवाज आला. वस्तीवरच्या कुत्र्यांनीं लांबून हांकेला मोठमोठ्यांदा साद दिली. मग पुन्हां सगळीकडे शांत शांत झालें.

बसल्याबसल्या मान पुढें करून कुंडलीकानें मालकाचा जरा अदमास घेतला. मग तो म्हणाला,

‘काल रातच्याला रोंग्याच्या वस्तीवरनं चार चुमडीं गेलीं.

निवृत्ति भानावर येऊन म्हणाला,

‘हां. समजलं मला सकाळच्यालाच.’

‘रातसार गोंधळ चालला हुता तकडं.’

‘चालनारच.’

दोन्ही हातांची मिठी उभ्या पायांना घालून आलेली झोप घालवीत एका उपाशे म्हणाला,

‘आयला, रोजच्याला कार झालाय ह्यो. झोपासुदीक लागंनात सुखानं माणसाला.’

कुंडलीकनें मान हलवली.

अनुक्रम 30८७५
विभाग
क्रमांक
ना. दि.

'झोपून कसं भागतंय ? आज रोंग्याच्या वस्तीवर धाड आली. उद्यां आपल्या वस्तीवर यील. त्याचा काय नेम ?'

खरी गोष्ट होती. रोंग्याची वस्ती ह्या मळेच्या वरच्या अंगाला लागूनच होती. मध्यें ओढाच काय तो होता. चोरटे त्या वस्तीपर्यंत येऊन पोंचले. या मळ्यांत येणें त्यांना कांहींच विशेष अवघड नव्हतें. आतां कांहीं-तरी बंदोबस्त, व्यवस्था करणें आवश्यक होतें.

निवृत्तीनें मनाशीं विचार केला. पण नवीन कांहीं सुचलें नाहीं.

'हे आसं बसून भागायचं न्हाई मालक. कांहींतरी येवस्ता करायला पायजे.'

कुंडलीकचें हें बोलणें ऐकून निवृत्तीनें त्रासल्यासारखें तोंड केलें.

'लेका, तें मलाबी कळतंय. कायतरी कराय पाहिजे हें सांगायला तूं कशाला पायजेस ? काय करायचं बोल. उगी तसलं मोघमांत बोललेलं मला न्हाई आवडत.'

एकाला हें बोलणें एकदम पसंत पडलें.

'हे खरं हाये मालक. कायतरी एक म्हंजे एक सांगाय पायजे, की बाबा, आमुक ह्ये करावं–'

कुणीतरी आपसांत बोललें,

'तशी काय भ्या न्हाई आपल्याला. धा–पंधरा माणसं हायेत. चार दोन कुत्रीं हायेत–'

निवृत्तीनें उपरोधानें मान हलवली.

'हा ! तेवढ्यावर भागत आसतं तर कुटंच धाड आली नसती आन् चोऱ्याबी झाल्या नसत्या.'

कुंडलीक म्हणाला, 'कुत्रीं तरी काय आपलीं मर्दानू ! आपल्यालाबी वळखत्यात आन् चोरालाबी वळखत्यात. समद्या गावास्नी वळखत्यात लेकाचीं. एकाला कुणाला चावत्याल तर आई मरंल त्येंची,'

'हें हाय हां. नुसती केकाटत्यात सारखी लांबनंलांबनंच. दगूड उचला कीं शेपूट आंत. धुम् वस्तीकडं.'

'परवां आमच्या पाव्हण्याकडं गेलतो बेरडवाडीला. काय तितलीं कुत्रीं बारागंड्याचीं–

'आसं ?'

'तर! काशीकापडयाची हायेत. यील त्याला फाडत्यात. धर लचका की तोड, धर लचका की तोड. नुसत्या कुऱ्यांच्या जिवावर वस्ती हाये आमच्या पाव्हण्याची.'

निवृत्ति चिडून म्हणाला,

'ये, पुरं कौतिक तुझ्या पाव्हण्याचं. आपलं काय करायचं ते बगा आधी. रिक्कामं भारूड नगं.'

एका उपाशानें मनाशीं किंचित् विचार केला. म्हणजे थोडा वेळ डोळे मिटले. मग ते उघडले. कांहींतरी फार महत्त्वाची गोष्ट सुचल्याप्रमाणें तो म्हणाला,

'ह्यापरीस आसं केलं तर ?'

'कसं ?'

'रातसार पहारा करायचा. समद्यांनीं हिंडायचं बांधाबांधावरनं. म्हंजे काई हुयाचं न्हाई. चोरटं भिऊन पळत्याल.'

'आन् एकट्यादुकट्याला धरून ठोकलं म्हंजे मग ?'

'हां, एवडा तिढा हाये खरा.'

अशीं कांहीं बोलणीं झालीं. कुणी कांहीं, कुणी कांहीं उपाय सुचवले. पण त्यामुळें निवृत्तीचें मुळींच समाधान झालें नाहीं. एकहि गोष्ट त्याच्या मनाला आली नाहीं. प्रश्न तसाच राहिला.

शेवटीं कुंडलीक म्हणाला,

'आमच्या बिबेवाडीलाबी मागं आसंच याचं. रोजच्याला देशमुखाच्या मळयांत चोरट्यांचा कार. मग देशमुखानं लई मजाच केली'—

एकानें नुसत्या डोळयांनीं विचारलें,

'काय ?'

'घरांत हुती तोडयाची बंदूक. दसऱ्याच्या दिवशीं पूजा करायची. तीं घेऊन लागला हिंडायला. धडाधड् रातच्याला बार काडायचा ठोः ठोः ठोः—'

'आन् मग ?'

'मग काय ? चोरटं घाबरलं. धुमाट पळालं. पुन्हां काय न्हाई. गप् जिकडंतिकडं.'

'ही बरी आडी केली देचमुखानं. बंदूक आजून आसंल की त्येच्याकडं?'

'तर ! कुटंबी गावांत लग्नाची वरात निघाली की आमी मागून आणतोच त्येच्याकडनं.'

'मग हितंबी आणावी चार दिसं. रातच्याला रोज पेटवावी ठोः ठो : ठो : –'

बंदूक ?–

निवृत्तीच्या डोक्यांत एकदम प्रकाश पडला. इतके दिवस पडलेलें कोडें एकदम सुटलें. तोडच्याची बंदूक नाहीं, खरीखुरी बंदूक आणावी. सरकारकडे अर्ज करून बंदूक आणावी. नेमबाजी शिकावी आणि द्यावा धडाका उडवून. आपल्या वस्तीवर बंदूक आहे एवढा जरी बोभाटा झाला तरीसुद्धां चोरटे दचकतील. आपल्या वस्तीचें नांव टाकतील. त्यांतून कुणी हिंमत केलीच तर द्यायचा धडाका ठेवून. एकदोन गडी जायबंदी केले म्हणजे सगळ्यांना पुरी दहशत बसेल. जन्माची अद्दल घडेल. पुन्हा कांहीं आपल्या वस्तीवर कुणाची धाड येणार नाहीं.

'बास ठरलं. बंदूक पायजे गड्या.'

कुंडलीक उत्साहानें पुढें सरकून बोलला,

'मग त्यांत काय आवघड न्हाई. जाऊं का बिबेवाडीला? घेऊन घेतों देसमुखाकडनं बंदूक. होऊन जाऊं दे तिच्यामारी !'

'ती तोडच्याची बंदूक ? छ्याः छ्याः ! काय लगीन काडलंय का लेकानु घरांत ? त्येनं काय हुयाचंय चोरट्यांस्नी ?'

मालकाच्या तोंडावरची नापसंती एकानें नीट न्याहाळली, मग त्यानेंहि नाक उडवलें.

'हुंः ! निवळ फुकणी ती ! त्येचा काय उपेग ?'

'मग ?'

'खरी बंदूक पायजे मर्दा.'

'आन् ती कशी मिळती ?'

'अर्ज करावा लागतो सरकारकडं, मग मिळती.'

'मग तर काय ! नंन्नी काम होईलन् काय.'

सगळ्या गड्यांनी माना हलवल्या. अस्सल बंदूक वस्तीवर असावी ही कल्पना सर्वांनींच उचलून धरली. ही साधी गोष्ट आधींच आपल्याला कशी सुचली नाहीं याचें ज्याला त्याला आश्चर्य वाटूं लागलें. बंदूक हातांत घेऊन हिंडणारा निवृत्ति त्यांच्या डोळ्यांसमोर दिसूं लागलादेखील.

निवृत्तीला तर भलताच उत्साह चढला.

दुसऱ्या दिवशीं पाटलाला बरोबर घेऊन तो जिल्ह्याच्या गांवीं गेला. संरक्षणासाठीं बंदुकीची परवानगी मिळावी म्हणून त्यानें रीतसर अर्ज केला. कलेक्टरला कुणाच्या तरी पुढाऱ्याच्या मध्यस्तीनें समक्ष भेटला. आहे ही परिस्थिति त्याच्या कानावर घातली. पुन्हां पुन्हां विनंती करून, चार ओळखीच्या लोकांना खटपट करायला सांगून गडी वस्तीवर परत आला. अर्जाचा केव्हां निकाल लागतो याची वाट पाहत राहिला.

मध्यें पुष्कळ दिवस गेले.

सरकारी पद्धतीप्रमाणें निवृत्तीचा अर्ज वरून खालीं आणि खालून वर असा बराच हिंडला मग मामलेदार, पोलिस पाटील यांच्याकडे चौकशीचे हुकूम आले. तालुक्याहून फौजदार चारदोन वेळां येऊन तपास करून गेला. त्याचे रिपोर्ट गेले. त्याबद्दलचीं स्पष्टीकरणें पुन्हां खालीं आलीं आणि पुन्हां चौकशा झाल्या. बारा भानगडी मध्येंच उपटल्या. चार-दोन महिने लोटले आणि मग निवृत्ति पवाराला बंदूक बाळगण्याचें लायसेन्स अखेरीस मिळालें. चारदोन महिन्यांनी तो महत्त्वाचा कागद त्याच्या हातांत आला.

मध्यंतरीं कितीतरी गोष्टी घडल्या होत्या. पाऊसकाळ संपला होता. पेरण्या झाल्या होत्या. हळूहळू हिरवें पीक पोटऱ्यांत आलें होतें. हें पोपटी जग आपलें रूप एकसारखें बदलत होतें. खुरपण झालेलीं, पोटभर पाणी प्यालेलीं, काळीभोर रानें या पिकांना पोसत होतीं. हलकेहलके थंडीचा कडाका पडला. उभ्या ताटांना कणसें आलीं. दाणा निवसला. टपोरा झाला. थंडगार वाऱ्यावर उभें पीक डोलत राहिलें. भोरड्या-चिवळांनी सकाळ-संध्याकाळ गोंधळ उडवला. आटोळ्यावरून गोफणींतले गुंडे भिरीरी उडूं लागले. राखणीच्या माणसांच्या हाकांनीं रानें गजबजलीं. जागोजाग हुरड्या-साठीं आगट्या पडल्या. त्यांचे धूर आभाळांत फिरूं लागले. सुगी आली आणि ऐन वेळीं निवृत्तीच्या हातांत बंदुकीचा परवाना आला.

लायसेन्स हातांत आल्यावर मग निवृत्ति थांबलाच नाहीं.

नोटांचीं पुडकीं खिशांत घालून तो सरळ मुंबईला गेला. ओळखीचीं माणसें बरोबर घेऊन त्यानें चांगल्यापैकीं बंदूक घेतली. काडतुसें घेतलीं. आणखीन बारीक सारीक सामान घेतलें आणि मग मोठ्या ऐटींत नवी बंदूक हातांत वाळगीत चार दिवसांनी तो वस्तीवर परत आला.

हे चार–दोन महिने देवानें मोठीच खैर केली होती. आसपास भुरट्या चोऱ्या होतच होत्या. क्वचित कोठें दरोडा पडल्याचीहि बातमी येत होती. रोज कांहीं ना कांहीं नवें घडत होतें. पण अजूनहि पवाराची वस्ती सुरक्षित होती. दरोडा तर सोडाच, पण भुरट्यांचीसुद्धां वर्दी कधीं आली नव्हती. आतां तर कांहीं प्रश्नच नव्हता. आतां घरांत शस्त्र होतें. लांब अंतरावरून सुद्धां पोरचिलटांचा थरकांप होईल असें शस्त्र होतें. नवीकोरी बंदूक कोपऱ्यांत दिमाखानें उभी होती. लोखंडाच्या पेटींत मोजून ठेवलेलीं काडतुसें वळवळत होतीं. एकेक काडतूस म्हणजे एकेक विश्वासू गडीच. त्यांत कांहीं दगाबाजी नव्हती, फसवणूक नव्हती. सरळ रोखठोक काम होतें. आतां कांहीं कुणाची मळ्यांत चोरटा पाय टाकायची छाती नव्हती. आतां वस्ती सुरक्षित होती, पूर्ण सुरक्षित.

निवृत्तीच्या मनांत हे विचार एकसारखे येत होते. खुषींत येऊन तो हंसत होता. दिवसभर आल्यागेल्यांना बंदूक दाखवीत होता. मोठ्या ऐटीनें तिला मिरवीत होता.

तो आल्या दिवशीं रात्रीं नेहमींप्रमाणें गडी माणसें पडवींत जमलीं. जाड घोंगड्या गुंडाळून विसाव्याला टेकलीं. हा हूं करून थंडीनें काकडूं लागलीं. कुणी ऊब येण्यासाठीं विडी पेटवली, कुणी चिलीम उभी केली, कुणी कमरेच्या तंबाखूच्या पिशव्या सैल केल्या आणि मग निवृत्तीनें नवी बंदूक सगळ्यांना दाखवली. सगळ्यांनी तिला हात लावून बघितलें. भरपूर कौतुक केलें.

एका उपाशे बंदुकीच्या नळीला एक डोळा लावून हातवारे करीत म्हणाला,

‘ अगागागंय ! सटकेबाज नळी हाये बायलीला. कसली गोळो बसत आसंल एकेक ! ही टिप्पेरी. ’

कुंडलीकनेंहि पुन्हां पुन्हां हात लावून बंदूक बघितली.

'ह्यें झकास काम झालं मालक ! आता कुनीबी आलं तरी भ्या न्हाई. पट्शिरी मुडदाच.'

'मुडदा ? आरं, तुकडं हुत्याल तुकडं. एक ह्या हिकडं, तर एक थ्या तिकडं.'

निवृत्ति खुषींत येऊन हंसला. म्हणाला,

'आता खरंच काय डर न्हाई. निवांत काम झालं.'

एकाला हें बोलणें फारच आवडलें.

'बास् ! आता रातसार जागाय नगं, काय नगं, डाराडूर झोपावं मानसानं. काय होत न्हाई.'

कुंडलिक उत्साहानें म्हणाला, 'बंदुकीचा एकदां तरी दाखला यावाच म्हनतों मी. म्हंजे लई मजा यील.'

'हां, हें खरं हाये.'

'एखांद्या बारीला जरी चोरटं आलं–'

'आलं– ? न्हवं न्हवं येयालाच पायजेत,' एकानें जोरजोरांत हातवारे केले.

'म्हंजे कळतोय् हिसका त्येनला. हाणबिगार नांव न्हाई घेयाचे पुना. हालकट जात.'

'हां, एकदा तरी मालकाच्या हातनं धूर निगाला पायजेच नळींतनं. आन् आवाज–'

'धडाडाडाडा ढम् ! ... '

'फाड् फाड् फाड् – फट् ! '

'बुडाला पाय लावून पळत्याल एकेक.'

'आपला मळा तर सोडाच. मी म्हंतों आता आसपासच्या रानांत-सुदिक न्हाई यायची जात ही.'

'मी म्हंतों, सबंद गावांत आपल्या.'

'तालुक्यांत.'

हें दोघांचें बोलणें आणखींहि पुष्कळ वेळ चाललें असतें. पण निवृत्तीनें चेहरा कंटाळल्यासारखा केलेला दिसला तेव्हां दोघांनींहि आवरतें घेतलें.

पण एक गोष्ट मात्र दोघांनी एकामतानें पुन्हां पुन्हां वजावली, ती ही कीं; बंदुकीचा धडाका हा उडालाच पाहिजे. तसं होण्याची शक्यता नाहीं, कारण चोरटे बंदुकीचं नांव ऐकूनच हादरतील. या वस्तीवर बंदूक आहे असा नुसता बोभाटा झाला तरी कुणी इकडे फिरकणार नाहीं. आणि हीच फार वाईट गोष्ट आहे या बंदुकीच्या नळीची चव त्यानी एकदां तरी चाखलीच पाहिजे. त्याशिवाय या बयाबाईचा हिसका त्यांना कसा समजणार ? म्हणून तेवढ्या-साठीं कां होईना, पण चोरट्यांनी एकदां या वस्तीकडे आपला मोहरा वळवावाच. निदान एकदां तरी यावंच. परमेश्वरानें त्यांच्या मनांत एवढी बुद्धि निर्माण करावी. असेल खरी छाती तर त्यांनी इथं येऊनच जावं, म्हणजे खरा चमत्कार पहायला मिळेल. लुंग्यासुंग्या वस्तीवर कसल्या धाडी घालतां ? हातांत काठी-खुरपें असलेल्या लोकांना कसली दमदाटी करतां ? या वस्तीवर या म्हणावं. तुमचा बाप इथं बंदूक घेऊन बसलेला आहे. बघितल्याबरोबर गोळी. दुसरी भाषाच नाहीं. आलांत तर तुमची माती इथल्या इथंच. एकदा याच. असली कांहीं रग, तर या. होऊन जाऊं दे, हां —

निवृत्तीला मनांतून मोठें बरें वाटलें. कित्येक महिन्यांनी तो त्या दिवशीं निश्चिंतपणें झोपला. पडवींतल्या खुंट्यांवर आडवी बंदूक टाकून शांतपणें झोपला. सगळीं गडीमाणसेंहि डाराडूर झोपलीं.

दुसऱ्या दवशीं आसपासच्या वाड्यावस्त्या, गांव सगळीकडे निवृत्ति पवारानें बंदूक आणल्याचा बोभाटा झाला. नवी बंदूक बघायला आणि तिचें कौतुक करायला बरींच माणसें येऊन गेलीं या कौतुकांत दोन दिवस बघतां बघतां गेले आणि जिकडे तिकडे पवाराच्या वस्तीवर बंदूक आल्याची बातमी पोंचली. आसपास पंचक्रोशींत पसरली. जो तो म्हणाला,

'हे मोटं नेवर्तीनं पहिल्या नंबरच काम केलं. आता पवाराच्या वस्तीला काय धोका न्हाई.'

चार-दोन दिवस लोक असें म्हणाले. पवाराची वस्ती पहिल्यासारखीच सुरक्षित राहिली. निवृत्ति पवार सुखानें झोपला. त्याचीं गडी माणसेंहि भरवशानें झोपलीं. सगळीकडे सामसूम झाला.

– आणि ध्यानींमनीं नसतांना एके दिवशीं मध्यरात्रीं पवाराच्या वस्तीवर एकाएकीं धाड आली !

मध्यानरात्र टळली होती. उशीरा उगवलेला चंद्र उतरणीला लागला होता. फिकट चांदणें पडलें होतें. अंधुक उजेडांत सगळें वातावरण गोठल्यासारखें दिसत होतें. थंडीचा कडाका भलताच पडला होता. वस्तीवरचीं घरेंदारें बंद झालीं होतीं. गोठ्यांतलीं जनावरेंहि निश्चल बसून राहिलीं होतीं. सगळीकडे विलक्षण स्तब्धता होती. बाहेर उघड्यावर एकहि माणूस नव्हतें.

पडवींतल्या खाटल्यावर निवृत्ति झोपला होता. बाहेर एकाएकीं कांहींतरी खसपस झाल्यासारखी वाटली म्हणून तो जागा झाला. डोळे चोळून त्यानें चाहूल घेतली.

कुणाचींतरी पावलें वाजत होतीं. दबतदबत येणारीं पावलें. निदान पांचसात माणसें तरी येत असावींत.

निवृत्ति ताडकन् जागा झाला. अंथरुणावर उठून बसून तो मोठ्यांदा म्हणाला,

'अरे, कोण हाये भायेर ?'

त्याबरोबर बाहेरचा आवाज एकदम थांबला. खसपस एकाएकीं नाहींशी झाली.

निवृत्तीला पहिल्यांदां वाटलें कीं आपल्याच गड्यामाणसांचा हा आवाज असेल. कुणीतरी बाहेर गेले असतील, त्यांचींच पावलें वाजत असतील. पण आपण बोलल्याबरोबर आवाज बंद झाला हें पाहिल्यावर त्याला शंका आली. गड्यामाणसांना त्यानें मोठ्यांदा हांका मारल्या.

'कुंडलीक, ए उपाशा, सोपाना... उठा उठा. भायेर चला.'

–आणि स्वत: घाईघाईनें बाहेर आला.

त्याबरोबर दोन–पांच काळ्याकभिन्न सांवल्या अंधारांत धुम् पळालेल्या दिसल्या' बघतांबघतां पडवीमागच्या उंसाच्या फडांत नाहींशा झाल्या. दोन मिनिटांत दिसेनाशा झाल्या.

चोर ?–

निवृत्तीचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. गड्यांना त्यानें पुन्हा पुन्हा हांका मारल्या मोठा आरडाओरडा केला. सबंध वस्ती जागी

झाली. जिकडे तिकडे गोंधळ उडाला. गडी पळत आले. उघड्या अंगांनीं धोतरं आवलीत ते पळत आले.

'काय मालक, काय झालं ?'

'चोरटे.'

'आं ? कुठाहेत ?'

'हे आत्ताच ह्या फडांत घुसले. चला, चला लवकर. आजून सांपडतील–'

असें म्हणून निवृत्ति पुढें धांवला. सपासपा रान कापीत पुढें गेला आणि त्याच्या मागोमाग सगळे गडी पळत गेले. हाताला येईल ती काठी, टिकारणें, खोरें–फावडें घेऊन धावत सुटले. फडांत घुसून लांबपर्यंत शोधाशोध केली. कसून कसून हुडकलें. पण चोरट्यांचा कांहीं पत्ता लागला नाहीं. अर्धा घंटा उसाच्या फडांत हा गोंधळ चालला. पण कांहीं हातीं लागलें नाहीं. तसल्या थंडींत सगळे घामाघूम होऊन गेले. शेवटीं फडाच्या दुसऱ्या टोकाला सगळे निघाले.

हाताच्या तळव्यानें कपाळावरचा घाम पुशीत कुंडलीक म्हणाला,

'छ्याः ? काय पत्या न्हाई, आन् मुद्या न्हाई.'

सोपाना गडी हाशहूश करीत एका जागींच उभा राहिला.

'दिली तुरी हातावर लेकाच्यांनीं. लई बिलंदर जात.'

एका उपाशाची झोप अजून गेली नव्हती. डोळे चोळत तो इतर गड्यांच्या मागून–मागून नुसता मांजरासारखा हिंडत होता. मोठ्ठी जांभई देऊन तो म्हणाला,

'कुठलं चोरटं आन् कुठलं काय ? तुमाला नुस्ता भास झाला आसंल मालक. चांदण्यांत डोळं चकत्यात कधीं कधीं. तसलंच कायतरी आसायचं.'

निवृत्ति चिडून बोलला,

'स्वतः डोळ्यांनीं बघितलंय. काळींकुट् पांचसात माणसं हुतीं. बघस्तांवर पळालीं. काय तरी शाहण्यासारखं इचारावं.'

'मग गेलीं कुटं म्हणावं ?'

'ह्यो उसाचा फडच लई सुयीचा त्येस्नी. घुसलं माणूस की गडप् आंत.

'व्हय व्हय. हें मातर् खरं.'

असें संभाषण दहापांच मिनिटें चाललें. माणसें एकमेकांशीं कांहींतरी इकडचें तिकडचें बोलत उभीं राहिलीं.

आणि तेवढ्यांत वस्तीकडच्या बाजूनें ओरडा उठला. बायकामाणसांचा आरडाओरडा मोठमोठ्यांद ऐकूं आला. कुणीतरी बोंबहि ठोकली.

त्यावरोबर सगळे वस्तीच्या दिशेनें धावले.

वस्तीवर पोचल्यावर बघतात तों मोठा गोंधळ उडाला होता. आठदहा बायका एका जागीं गोळा झाल्या होत्या. मोठमोठ्यांदा ओरडत होत्या. शिव्या घालीत होत्या. त्यांचे चेहरे विलक्षण भेदरलेले होते. पांढरेफटक पडले होते.

धावत धावत आलेला निवृत्ति बायकांसमोर येऊन उभा राहिला. घाईघाईनें ओरडून म्हणाला,

'आरं काय झालं ? का कालवा लावलाय ?'

निवृत्तीची बायको भीतीनें लटलटा कांपत होती. तिची बोबडी वळली होती. बोलायचा प्रयत्न करूनहिं तिला बोलतां येईना. शेवटीं कुंडलिकाची बायको घाबऱ्याघाबऱ्या बोलली,

'च-चोरटं.'

'चोरटं ? कुठाहेत ?'

'गेलं पळून.'

'कवा ?'

'ह्ये आत्तांच. ह्या इकडं गेलं. पडवीचं दार उघडून आंत घसत हुतं, तंवर आमी पाहिलं. आरडाओरडा केला तसं धुम् पळालं.'

कुंडलीकाच्या बायकोनं समोरच्या दिशेनं हात केला तसा निवृत्ति तिकडे धावला. त्याच्या पाठोपाठ आलेले गडीहि मागोमाग पळत गेले. वस्तीसमोरच्या उसांत घुसले. पुष्कळ हुडकलें, शोधाशोध केली, तरीपण चोरट्यांचा तपास कांहीं लागला नाहीं. फटफटेपर्यंत लोक हिंडले. बांधावरून पळापळ झाली. निवृत्तीनें काडतुसें भरून बंदूक बरोबर घेतली. नाहीं तेथें घुसून तपास केला, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. चोरटे पळाले ते पळालेच. त्यांचा कांहीं मागमूसहि लागला नाहीं.

पहाट संपली. पूर्वेला चांगलें तांवडें फुटलें. हळूहळू उजाडलें. लख्ख प्रकाश पडला. थंडीचा कडाकाहि कमी झाला. तसे चार ठिकाणीं पांगलेले लोक पुन्हां गोळा झाले. बाहेरच्या उघडचा अंगणांत दमूनभागून बसले. हुशहुश् करीत इकडेतिकडे एकमेकांशीं बोलूं लागले. जो तो स्वतःचा अंदाज सांगूं लागला.

सोपाना म्हणाला,

'चोरट्यांनी नुसती हूल दाखविली. आपल्याला तिकडं पळीवलं आन् इकडं धाड घातली.'

कुंडलीकानें मान हलवली.

'बायकांनी आरडा केला म्हून बरं झालं, न्हाईतर कायतरी जात हुतं आज.'

'कायतरी ? बंदूकच जात हुती मालकांची. खुंटीवर तशीच न्हायली ती.'

'आरं व्हय की.'

'कधी नव्हं तें झालं वस्तीवर आज. आजपत्तुर डंक नाहीं राव कधी, आन् कसं काय झालं कळंना.'

एका उपाशे जागरणानें तारवटलेले डोळे चोळत म्हणाला,

'लेकाच्यास्नी म्हाईत कुट हाये हितं बंदुक हाये म्हणून? न्हाईतर काय हिंमत हुती त्येंची? हचें : ! –'

'आता पुन्हा येयाचं न्हाई म्हनतोस काय ?'

'नांव नगं. हयेच चुकून आलं.'

'आन् पुन्यांदा आलं तर ?'

'मग गोळीच. धडाड् धुम्.'

गडीमाणसांचीं अशीं बोलणीं चाललीं होतीं आणि दमलाभागलेला निवृत्ति बाहेच्या बाजेवर बसून उगीच ऐकत होता. कांहीं न बोलतां ऐकत होता. मनांतल्या मनांत त्याला मोठें आश्चर्य वाटत होतें. हें असे कसें घडलें? आजपर्यंत आपल्या वस्तीवर चोरटे कधी आले नव्हते. आता नुकतीच आपण बंदूक आणली. आतां तर त्यांनी येण्याचें मुळींच कारण नव्हतें. त्यांना बंदुकीची भीति वाटायला पाहिजे होती. पण हें अगदीं उलटें घडलें. न

घडलेलें घडलें. चोरटयांनी नेमकी याच वेळीं वस्तीवर धाड घातली. हूल देऊन पडवींत घुसण्याचा प्रयत्न केला. कशासाठीं? त्यांना काय पाहिजे असावें? का गडी माणसें म्हणतात त्याप्रमाणें असावें? अजून त्यांना वस्तीवर बंदूक असल्याची माहिती नसावी? तसेंच असेल. त्याशिवाय असलें धाडस त्यांच्या हातून होणार नाहीं. ठीक आहे. आता गहाळ राहून उपयोगी नाहीं. रात्रीं बंदूक भरलेली ठेवली पाहिजे. अधून मधून हवेंत बार काढले पाहिजेत. म्हणजे चोरटयांना कळेल आणि धाकहि बसेल. पुन्हा असा प्रकार होणार नाहीं.

निवृत्तीनें मनांत असा विचार केला आणि मग त्यानें गडीमाणसांना ताकीद दिली. सगळयांना सावध रहायला बजावलें. आजच्या प्रकाराची पुन्हा आवृत्ति बहुधा होणारच नाहीं, तरी पण सगळयांनीं हुषारीनें राहिलें पाहिजे, हें फिरून फिरून त्यांच्या मनावर ठसवलें आणि स्वतः बंदूक उशाशीं ठेवूनच झोपण्याचा निर्धार जाहीर केला.

मग दोन दिवस अगदीं शांत गेले.

तिसऱ्या दिवशीं रात्रीं वस्तीजवळ अशींच चोरटीं पावलें वाजलीं आणि नाहींशीं झालीं. सकाळीं तपास केला तेव्हां उभ्या ज्वारींतलीं पोतंभर लुंगीं गेल्याचें कळलें. पुन्हा चार दोन दिवसांनी असाच गोंधळ झाला. चोरटे वस्तीवर आल्याची कुणीतरी आरोळी ठोकली आणि माणसें जमेपर्यंत, ते पसार झालेसुद्धां. बाहेर पडलेलीं लहान सहान अवजारें, खरकटीं भांडीं असलें किडूकमिडूकसुद्धां त्यांनी खुशाल उचलून नेलें.

आणि पुढें पुढें तर हा प्रकार नेहमींचा होऊन बसल्यासारखा झाला.

केव्हातरी अधूनमधून सतत ही धाड येऊं लागली. माणसें जेव्हा जागीं रहात, सावध रहात तेव्हा कांहींहि घडत नसे. पण चारदोन दिवस गेले, तारवटलेलीं, जाग्रणें झालेलीं माणसें जरा झोपलीं कीं लगेच कुठेंतरी कुणी येऊन जाई. वस्तीजवळ पावलें वाजत. निवृत्ति जिथें असेल तिथें खुडबुड होई. पण बंदूक हातांत घेऊन निवृत्ति बाहेर धांवला कीं हे चोरटे कोठल्याकोठें नाहींसे होऊन जात. जाताजातांना हातीं लागेल तें बरोबर घेऊन जात. एकटयादुकटयानें पाठलाग करायची सोय नसे. एकदा दोनदा गडयांनी त्यांच्या मागोमाग धांव घेतली तेव्हां चोरटयांनी त्यांच्या अंगावर भली मोठीं

दगडं घातलीं. हातांतल्या लोखंडी सळईनें बडवलें. त्यांचें रक्तच बाहेर काढलें. त्यामुळें एकटादुकटा गडी बाहेर पडायला, हिंडायला दचकूं लागला. पांच-सातजण बरोबर असल्याशिवाय रात्रीचें रानांतून हिंडायला कोणी तयार होईना. निवृत्तीनें पुष्कळ वेळां धाडसानें त्यांचा पाठलाग केला. हवेंतच नाहीं तर त्यांच्या अंगावरहि बार काढले. पण तरी चोरटयांना त्याची यत्किंचित् भीति वाटल्याचें दिसेना. त्यांची खेप काहीं चुकेना. तेव्हां मात्र निवृत्ति अगदीं हतबुद्ध होऊन गेला. बायकापोरं रोज रात्रीं दचकून उठूं लागलीं. रात्ररात्र केलेल्या जागरणामुळें गडी दिवसा काम करीतनासे झाले. रानांतलीं कामें खोळंबून पडूं लागलीं, तेव्हां तो अगदीं गोंधळून गेला. चिडून जाऊन एकटाच बंदूक घेऊन पिकांतनं बेलाशक रात्रीचा हिंडूं लागला.

आणि तरी हा त्रास चालूंच राहिला. अधून मधून चोरटयांच्या धाडी येतच राहिल्या !

एकदा रात्रीं अशीच चोरटे आल्याची आवई उठली वस्तीजवळ त्यांचा गोंधळ ऐकूं आला, तेव्हां बंदूक उचलून निवृत्ति त्यांच्या पाठोपाठ धांवला. लाजेकाजेनें त्याचे गडीहि इकडे तिकडे गेले. पण चिडलेला निवृत्ति चोरटयांच्या मागोमाग लांबपर्यंत फडांत घुसला. बंदूक हातांत तयार ठेवून एकटयानेंच तपास करूं लागला, तेव्हां चोरटयांना तो आयताच सांपडला. पाठीमागून येऊन कुणीतरी त्याच्या हातावर दणका घातला. बेलाशक बंदूक ओढली. निवृत्तीनें ती गच्च धरून ठेवली, सोडली नाहीं. तेव्हां एकाएकीं पांच-सात काळींकुट्ट माणसें त्याच्यावर तुटून पडलीं. सगळयांनी मिळून त्याला यथेच्छ बडवला. निवृत्तीनें पुष्कळ झटापट केली. बंदुकीच्या दस्त्यानें ठोकाठोकी केली. पण तरी इतक्या लोकांपुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं. कुणीतरी जडशीळ लोखंडी पट्टी त्याच्या डोक्यावर इमानानें हाणली. अशी हाणली कीं एवढा हत्तीसारखा हा गडी झाड तुटावें त्याप्रमाणें खालीं कोसळून पडला. हातांतली बंदूक घट्ट आवळून धरीत तो गुरासारखा ओरडला,

'मेलों, मेलों, मेलों ! '

—— पडतां पडतां त्यानें मोठयांदा हाका मारल्या,

'कुंडलीक, अरे सोपाना—!'

आणि मग त्याची शुद्धच गेली.

निवृत्तीच्या हाका आणि ओरडणें वस्तीपर्यंत एकूं गेलें. इकडेतिकडे हिंडणारीं गडीमाणसें एका ठिकाणीं गोळा होऊन तिकडे धांवलीं. फडांतल्या बांधावरनं आंत घुसलीं तेव्हां बेशुद्ध होऊन, खालीं तोंड करून पडलेला निवृत्ति त्यांना दिसला. त्याच्या डोक्यांतून रक्त वाहात होतें आणि अंगाखालीं छातीशीं घट्ट आवळून धरलेली बंदूक होती.

बाकी सगळीकडे सामसूम होतें. चोरट्यांचा कांहीं मागमूस नव्हता.

दोघाचौघांनीं निवृत्तीला उचललें. वस्तीवर आणलें. जखमेंत हळद भरली. रानांतला पालापाचोळा लावला. रात्रभर बायकांनीं रडून गोंधळ केला. आतां या वस्तीवर कांहीं सुरक्षित राहिलें नाहीं या कल्पनेनें सगळेच हादरले कुणी कुणी काम सोडायचीच भाषा काढली.

अशा गोंधळांत कशीबशी रात्र संपली.

सकाळ झाली. उन्हें चांगलीं पडलीं. पांखरांची कुलकुल सुरू झाली. झाडांचे माथे तांबूस पिवळ्या उजेडानें न्हाऊन निघाले. सगळीकडे सकाळचा कोवळा प्रकाश पडला आणि मग रात्रभर विव्हळणारा निवृत्ति शुद्धीवर आला. हळुहळू डोळे उघडून त्यानें सगळ्यांकडे पाहिलें. मग मोठ्या कष्टानें तो उठून बसला.

सगळ्यांना जरा धीर आला.

कण्हतकण्हत निवृत्ति इकडेतिकडे हातांनीं चांचपून सरकून म्हणाला.

'काय पायजे मालक ?'

डोळे मिटून डोक्यांतली कळ सोसत निवृत्ति हळूहळू म्हणाला,

'माझी बंदूक–'

'हाये, घाबरूं नका–'

'कुठाय् ?'

'ही नव्हं का हितं कोपऱ्यांत. ही बघा.'

'बंदूक सुखरूप असलेली बघून निवृत्तीला एकदम बरें वाटलें. त्याच्या तोंडावर समाधान पसरलें. त्यानें हात पुढें केला.

'तशीच ठिवूं नका. भरल्याली हाये. आणा हिकडं.'

हातांत बंदूक घेऊन त्यानें काडतुसें काढून ठेवलीं. बंदूक रिकामी केली. पुन्हां कोपऱ्यांत ठेवण्यासाठीं गड्याजवळ दिली.

घरांतून बायकोनें पितळीभर चहा करून आणला. तो प्यालावर निवृत्तीला जरा हुशारी आली. घडलेली सगळी हकीकत त्यानें सांगितली.

' मरायची निशाणी हुती आज. थोडक्यांत वांचलों, पर बंदूक न्हाई सोडली म्यां. '

कुणी कांहीं बोललें नाहीं. थोडा वेळ सगळीकडे शांतता पसरली. मग एका उपाशे बिडी हातांत धरून म्हणाला,

' सोडायची तुमी बंदूक मालक. म्हंजे इक्ता मार बसला नसता. काईच झालं नसतं. '

निवृत्तीला धक्का बसल्यासारखें वाटलें.

' म्हंजे ?'

' ह्या बंदुकीनंच मालक समदा घोटाळा केलाय्. '

' तें कसं काय ?'

' बंदूक नव्हती तवां काय झालं हुतं का हितं ?'

' नव्हतं. '

' मंग झालं तर ! तिच्यापायींच चोरटं येत्यात. बंदूक नसंल भडव्यास्नी ; ती पळवाय बघतेत. '

एकाचें हें बोलणें ऐकल्यावर कुंडलीकालाहि कांहींतरी आठवलें.

' व्हय मालक. तुमी बगा. जवां धाड येतीय तवां जिथं तुमी झोपत्यालं हाय, तितंच येतीय. कशापायीं ? बंदूक नेयापायींच. दुसरं काय कारण ? आठवन करून बगा. '

निवृत्तीनें मनाशीं विचार केला, आणि त्यालाहि ही गोष्ट पटली. चोरट्यांची धाड बंदूक पळवण्यासाठींच असावी ही गोष्ट त्यालाहि हळूहळू पटूं लागली. जोंपर्यंत ही बंदूक नव्हती तोंपर्यंत खरेंच कुठें कांहीं भानगड नव्हती. कोणाहि चोरट्याचें लक्ष आपल्या वस्तीकडे वळलें नव्हतें. दहावीस गड्यांचा पुठ्ठा असलेली आपली वस्ती चोर–चिलटांना अवघड वाटत होती. तोंपर्यंत इकडं येण्याची त्यांना हिंमत नव्हती. पण ह्या बंदुकीनं सगळा उलटा प्रकार केला. हल्ला करून पळवून न्यावी अशी एक वस्तु आपणहून इथं आणली. जणूं चोरट्यांना स्वतः निमंत्रणच धाडलें. खरें आहे. या बंदुकीनें सगळा अनर्थ उडवला आहे.–

दमूनभागून निवृत्ति पाठीमागें तक्क्याला रेलला. डोळे मिटून त्यानें थोडा वेळ विचार केला. पुन्हां डोळे उघडले. तो म्हणाला,

'खरं हारे गड्यानों तुमचं. ह्यो घोटाळा माझ्या ध्येनांतच आला न्हाई,'

आणि मान हलवीत, खालीं भुईकडे बघत तो स्वस्थ बसून राहिला.

सगळे गप्प झाले.

कष्टी तोंड करून कुंडलीकनें विचारलें, 'मग आतां कसं काय करावं ? ही रोजची पीडा कशी जावी ?'

'जाईल. काय घाबरूं नगा. चार आठ दिसांत ही भानगड बंद हुईल असं करतों मी. मग झालं ?'

कुणाला कांहीं कळलें नाहीं. निवृत्तीच्या मनांत नेमकें काय आहे याचा कांहीं पत्ता लागला नाहीं. सगळे त्याच्या तोंडाकडे बघत राहिले.

शेवटीं एका उपाशे विडीचा धूर सोडून तोंड मोकळें करून म्हणाला.

'म्हंजे कसं मालक ? आमाला काय कळलं न्हाई.'

निवृत्ति ताठ बसला. डोक्यावरच्या जखमेला एक हात लावून त्यानें कोपऱ्यांत उभ्या केलेल्या बंदुकीकडे टक लावली. मग कण्हतकुथत तो म्हणाला,

'आतां बरं वाटलं जरा कीं करतो येवस्ता, म्हंजे काय घोर न्हायाचा न्हाई. समदं पयल्यासारखं निर्मळ हुईल.'

'कसली येवस्ता ?'

'करतो. तुमाला काय ?'

निवृत्ति जास्तीं कांहीं बोलला नाहीं, मग पुढें आणखी विचारण्याची कुणाला हिंमत झाली नाहीं. तो विषय तिथेंच संपला.

चारआठ दिवस गेले. निवृत्ति चांगला हिंडूफिरूं लागला. त्याच्या अंगांत ताकद आली. मग एके दिवशीं तो ताडकन् उठला व त्यानें डोक्याला पटका गुंडाळला. हातांत बंदूक घेतली आणि तो निघून गेला बंदूक परत करून, लायसेन्स परत करूनच माघारीं आला. सगळीकडं बोभाटा करून आला.

'मी बंदूक परत केल्याली हाये. आता वस्तीवर कायसुदीक न्हाई.'

आणि काय असेल तें असो, तेव्हांपासून चोरट्यांच्या धाडी पुन्हा बंद झाल्या.

— आता पवाराची वस्ती पहिल्यासारखी सुरक्षित आहे.

० ० ०

# ५ : म्हातारा वकील

धुरळा उडवीत, आवाज करीत मोटार स्टँडवर येऊन पोंचली; तेव्हां दुपारीं चार साडेचारचा सुमार झाला होता. ऊन जरा उतरलें होतें. तापलेले रस्ते निवत होते. स्टँडवरचीं माणसें दाटीवाटी करून पत्र्याच्या शेडमध्यें सांवलीला बसलीं होतीं.

गाडी थांबल्याबरोबर त्यांतलीं बरींचशीं गाडीकडे धांवलीं. दारापाशीं सांचून राहिलीं. उतरणारे लोक धडपडत, हिसके खात खालीं उतरले आणि हाश् हुश्श करीत उनांतच उभे राहिले. या सगळ्या घोळक्यांतून खालीं उतरून कंडक्टर स्टँडवरच्या खोलींत पिशवी सांवरीत निघून गेला. मग दाराशीं एकच कालवा झाला. वर जाणाऱ्यांची दार धरून ठेवायची घाई आणि खालीं येणारांची उतरण्याची घाई. दोन पांच मिनिटें नुसता गोंधळ माजला.

या गोंधळांतून कशीबशी सुटका करून घेऊन म्हातारा तात्या आणि पांडुरंग खालीं उतरले. स्टँडवरून बाहेरच्या रस्त्याला लागले.

चालतां चालतां तात्यानें कपाळाचा घाम पुसला. तोंडानें वारा सोडीत तो म्हणाला,

'अजून तापतंच हाये ऊन की, आं?'

पांडुरंगनें नुसतीच मान हलवली.

'हूं! उनाचंच निगाल्यावर त्येनं तावूं ने तर काय करावं? चल, चा मारू हाटेलांत जरा.'

'उनाला चाचा उतारा व्हय? भले! तूं तर मर्दा शाहणाच दिसतूस.'

'तसं न्हवं. जरा घटकाभर टेकायला निमित्त हुईल. बांकावर हाटेलांत जरा गार वाटतं. बसूं थोडा वेळ. मग हालूं.'

तात्या कांहीं बोलला नाहीं. पण रस्त्यालगतच्या एका हॉटेलाकडे पांडुरंग वळला तसा आपोआप तोहि वळला. त्याच्या पाठोपाठ गेला. दोघेहि 'हुश्शऽ' करून बांकड्यावर बसले. टेबलावर आधींच ठेवलेल्या ग्लासांतील पाणी गटागट पिऊन पांडुरंग जरा हुश्शार झाला. तात्यानें आपली पडशी टेबलावर ठेवली. तो नुसताच थकलाभागला होऊन बसून राहिला. मधूनमधून तोंडानें उकाड्याचा वारा फुंकीत राहिला.

आलेला चहा कपानेंच पितां पितां पांडुरंग म्हणाला.

'मग तात्या, कसंकसं ठरलं?'

तात्यानें बराच वेळ कांहींच उत्तर दिलें नाहीं. कपांतला चहा बशींत ओतून तो फुंकून फुंकून प्याला. संपल्यावर हातानें धोतराचा सोगा धरून त्यानें ओठ पुसले. मिशा पुसल्या.

पांडुरंग पुन्हां बोलला,

'व्हय्?...मग?

तात्यानें आपल्या सुरकतलेल्या चेहऱ्यावर जास्ती सुरकत्या पडल्या.

'काय मग?'

'काय ठरलं?'

'कुटल्या वकिलाकडं जायाचं?'

'तूं तुज्या वकिलाकडं जा. मी माज्या वकिलाकडं जातों. त्यांत एवडा तिढा पाहिजे कशाला?'

पांडुरंग समजावणीच्या सुरांत म्हणाला,

'तसं न्हवं. ह्यो वकील चांगला हाये म्हणून तरी माजं सांगणं. लई पक्का हाये. हां.'

'व्हय का?'

तात्या जरा उपरोधानें बोलला. पण पांडुरंगाच्या तें नीट लक्षांत आलें नाहीं. तो उत्साहानें म्हणाला.

संध्याकाळ झाली. उनें उतरलीं. सावल्या खालीं उतरूं लागल्या, तशीं माणसें कामधंदे आटोपून पाटलाच्या वाड्याकडे घोळामेळानें येऊं लागलीं.

'तर! आन् तरणाबांड आहे पुन्हा. म्हातारा न्हवं. लई हुषार. दोन कपाटं भरून पुस्तकं हायेत. कायद्याची बरं का. तूं म्हनशील दुसऱ्या कशाची!'

'आसंल आसंल हां.'

'मग?'

'मग काय?'

'माजा आपला वकील ठरल्याला हाये. तूच चल आन् अनुभव घे एकवार. त्याच्या डोस्क्यांत तीन कपाटं भरल्यात, तीन. हे बघ, काय झालं तरी माज्या वकिलाची सर येणार न्हाई कुणाला!'

पांडुरंग हें आपलें सहज बोलला होता. तो कांहीं कुणा वकिलाचा पित्त्या नव्हता कीं कुणाकडून त्याला कमिशन मिळायचें नव्हतें. त्याचीं एकदोन कामें त्याच्या वकिलानें चांगली केलीं होतीं. म्हणून त्याचा आपल्या वकिलावर विश्वास बसला होता. भक्तीहि बसली होती. म्हणून तो म्हाताऱ्या तात्याला आग्रह करीत होता, इतकेंच. आलाच म्हातारा बरोबर आणि दिलेंच त्यानें काम, तर तेवढेंच वकिलाचें आपल्याबद्दल चांगलें मत होईल इतकाच त्याचा हेतू होता. त्यामुळें तात्या जरा चिडल्यासारखा दिसला तेव्हां तो दबकला. माघार घेऊन म्हणाला.

'बरं बाबा, न्हाऊं दे. माज्या काय गाडग्यातले गहूं जायाचेत? आपलं एका गांवचं दोघं आपण म्हून मी एवढं बोललों. नसलं तुज्या मनांत तर न्हाऊं दे.'

'नसलं म्हंजे न्हाईच.'

'बरं, नसूं दे.'

'नसूं दे नव्हं, न्हाईच.'

असा शुष्क वाद थोडा वेळ झाला. मग पांडुरंग आपोआप गप्प बसला. तात्याहि जरा शांत झाला. थोड्या वेळानें इकडचीतिकडचीं बोलणीं झालीं. घटकाभर गप्पा झाल्या. उन्हेंहि पुष्कळच उतरलीं. संध्याकाळ झाली. जरासा वारा सुटला. तलखी किंचित् कमी झाली.

मग पांडुरंग म्हणाला,

'मग तात्या, आतां एवढं तरी कर.'

तात्यानें नुसताच प्रश्नार्थक चेहरा केला.

'आपण दोघं मिळून जाऊं–'

'कुठं ?'

'आमच्या वकिलाकडं.'

'मला नगं.' तात्या पुन्हा उसळला.

पांडुरंग चिडून बोलला,

'आरं, माजं नीट ऐक तर खरं!'

'काय ऐकायचं त्यांत ?'

'हो हो. जरा ऐक. तूं मी मिळून आमच्या वकिलाकडं जाऊं. माजं काम करून टाकतों. तूं निस्ता बग तर खरं माजा वकील. का त्याला बी तिकिट पडतंय ?'

'आन फुडं ?'

'पुढं तुज्या वकिलाकडं जाऊं. तुजं काम कर. मग जेऊंखाऊं कुठंतरी आन् ठेसनावर जाऊन पडूं. मिळूनच परत जायाचं हुईल कसं ?'

तात्याला ही योजना पटली. तरीपण विचारांत पडल्यासारखा चेहरा करून तो थांबला. थोड्या वेळानें म्हणाला,

'बरं, तसं का हुईना शेवट. आसं तर आसं.'

'आतां आला आसंल वकील घरी. चला निगा.'

'चला.'

असं बोलत बोलत आणखी कांहीं वेळ गेला. गांवच्या कांहीं भानगडी निघाल्या. त्यांत दोघेहि रंगले. शेवटीं अंधार पडायची वेळ झाली. हॉटेलांतले दिवे लागले. गर्दीहि वाढली तेव्हां दोघेहि हलले. पांडुरंगानें आपली पिशवी हातांत घेतली. तात्यानें पडशी खांद्यावर टाकली.

दोघेहि हळूहळू चालत रस्त्यानें निघाले.

पांडुरंगच्या वकिलाचें घर मोठ्या रस्त्यावरच होतें. खालीं बिऱ्हाड आणि वर माडीवर बैठक होती. बाहेरून रस्त्यावरून माडीवर जायला परस्पर जिना होता.

माडीवर उजेड लखलखतांना दिसला तेव्हां पांडुरंग थांबला.

'हायती बरं का वकिलसायेब घरीं. हें बरं झालं.'

तात्यानें वर माडीकडे पाहिलें. आंतल्या झगमगणाऱ्या उजेडाची झळ त्याच्या डोळ्यांना लागली. डोळ्यांवर आडवा हात घेऊन तो नाखुषीनें म्हणाला.

'काय भसभस उजेड हाये रं ह्यो ?'

'नळी हाये ती. तिचा लाइट आसाच आसतो.'

'आसं व्हय ?' तात्यानें मान हलवली.

'व्हय बाबा, व्हय. हां, चल वर.'

पांडुरंग पुढें झाला. भराभर जिना चढला. तात्या सावकाश चालत-चालत, दमानें पायऱ्या चढत त्याच्या मागोमाग आला. तो दरवाजा-जवळ येईपर्यंत पाडुरंगानें वकीलसाहेबांना हांकहि मारली होती आणि वकील-साहेबांनीं 'या या' असें आंतून उत्तरहि दिलें होतें. तरी पण तात्या वर येईपर्यंत पांडुरंग थांबला. मग दोघेहि मिळून आंत शिरले. रामराम करून पांडुरंग सतरंजीवर बसला. तात्या मुकाटयानें त्याच्या मागें अर्धा सतरंजीवर, अर्धा जमिनीवर बसला. भिंतीला टेकला.

वकीलसाहेब खरेंच तरुण होते. तीसपस्तीस वर्षांचे असतील. अंगांत पांढरा परीटघडीचा सदरा घालून ते आरामखुर्चीवर रेलले होते. त्यांच्या स्वच्छ धोतराचा सोगा खालीं जमिनीवर लोळत होता. हातांत कसलेंसें एक पुस्तक होतें. बहुधा कायद्याचें असावें. खुणेसाठीं त्यांनीं त्यांत बोट घातलें होतें.

म्हातारा तात्या अर्धा फरशीवरच बसला आहे हें पाहून त्यांना संकोच वाटला. हात पुढें करून गोड आवाजांत ते म्हणाले,

'का हो, वर बसा सतरंजीवर.'

तात्या अदबीनें म्हणाला,

'हाये, बरं हाये.'

पांडुरंग जरा सलगीच्या सुरांत बोलला,

'आरं, बस कीं वर सरकून. एवडं सांगतेत–'

'हाय की वरच मी–'

असें म्हणत तात्या जरा वर सरकला. त्यानें उगीचच अंगाची जास्ती चाळवाचाळव केली. त्याच्याकडे हात करून पांडुरंग म्हणाला,

'आमच्या गांवचाच हाये म्हातारा. कोष्टयाचा हाये. दोन बांध मधी टाकून जिमीन हाये पलिकडे आमच्या.'

वकीलसाहेब मान हलवून निर्विकारपणें म्हणाले, 'असं का ? अरे वा !'

मग त्या दोघांच्या इकडच्यातिकडच्या गप्पा, बोलणीं सुरू झालीं. थोडया वेळानें कोर्टातल्या कामाचा विषय निघाला. वकिलांनीं कुठल्या बारा भानगडी सांगितल्या. नव्यानव्या कायद्याच्या गोष्टी सांगितल्या आणि पांडुरंग तोंडाचा 'आ' करून मान हलवीत राहिला. डोळे विस्फारून ऐकत राहिला. तात्या मात्र कांहीं बोलला नाहीं. तो उगीचच भिरीभिरी डोळ्यांनीं पहात राहिला. नजरेनें सगळें टिपत राहीन.

माडी चांगली प्रशस्त होती. खालीं सफेत फरशी आणि वर कडेपाट. पुस्तकांनीं भरलेलीं स्वच्छ काचेचीं कपाटें, खुर्च्या, टेबलें, पान-सुपारीचें तबक. कारकुनाचें डेस्क. व्यवस्थित रचलेले कामाचे कागद. सगळें कांहीं नीटनेटकें आणि टापटिपीनें मांडलेलें. आणि या सगळ्यांवर पडलेला झगझगीत नळीचा उजेड......

तात्याचे डोळे त्या उजेडानें दिपले. कपाळाखालीं हात धरून उजेड चुकवीत तो इकडेतिकडे बघत राहिला. वेळ घालवूं लागला.

पहिलीं बोलणीं संपल्यावर वकीलसाहेब जांभई देत म्हणाले,

'हं, काय पांडुरंगराव, काय काम काढलंय आज ?'

पांडुरंग जरा हंसल्यासारखें करून बोलला,

'काम म्हंजे आपलं हेंच. पुरशीस भरायची होती म्हणाला हुता तुमी. ती भरली का इचारायला आलों होतों.'

'भले ! मी कशी भरणार ? तुम्हीं पैसे दिलेत का माझ्याजवळ ?'

'न्हाई, पैशे न्हाई दिले खरं–'

'मग ?'

'देतो की. आतां पुढच्या तारखेला आलो म्हंजे कायम देतो. सध्यांच्याला तुम्ही भरून टाका. मी चुकते करतो सगळे मागनं. आं ?'

वकीलसाहेब मान हलवून जरा रागानें म्हणाले,

'हा बरा धंदा आहे हां पदरमोडीचा. म्हणजे आम्हींच लग्न करा, आम्हींच बाळंतपण करा, आम्हींच बारसं करा. वा !—'

पांडुरंग गरिबीचा भाव तोंडावर आणून बोलला,

'आसं कसं ? ह्या टायमाला सवड झाली न्हाई. पुढंच्या खेपेला समदा हिशेब चुकता करतो. मग तर काय हाये का तक्रार ?'

असें बोलणें कांहीं वेळ चाललें. पांडुरंगानें थोडीं आर्जवें केलीं. अखेर वकीलसाहेब कंटाळले. 'बरं, ठीक आहे.' वकीलसाहेब एवढेंच बोलले. मग त्यांनीं बोलणें संपवसारखें करून जे डोळे मिटले ते बराच वेळ उघडलेच नाहींत. पांडुरंगनें ओळखलें कीं आपलें काम झालें; वकील आपले पैसे भरणार हें आतां नक्की. देऊं ते मागाहून संवडीनें. अगदींच ऐकलें नसतें तर द्यावे लागले असते थोडेफार तेवढे आपण आणलेहि आहेत. पण ते काढावे लागले नाहींत हें उत्तम झालें. सध्यां बारीकसारीक खर्च आहेत. त्याला उपयोगी पडतील. छान झालें ! आतां उठायला हरकत नाहीं.

मग तो घाईघाईनें म्हणाला,

'बरं, मग निगूं का आमी ? चलतो.'

डोळे मिटल्यामिटल्याच वकील म्हणाले,

'बराय बराय् ! तेवढं पुढच्या खेपेला—'

'अगदीं कायम.'

एवढें बोलून पांडुरंग उठलाच. त्याच्या पाठोपाठ तात्याहि उठला. दोघांनींहि रामराम केला. वकिलांनीं डोळे उघडून नमस्कार घेतल्यासारखी मान हलवली. मग इतका वेळ बाजूला धरून ठेवलेलें पुस्तक त्यांनीं पुन्हा समोर धरलें. त्यांत डोकें खुपसलें.

खालीं आल्यावर दोघेहि मुकाट्यानें रस्त्यावरून चालत निघाले. दहापांच पावलें टाकल्यावर पांडुरंग उत्साहाच्या सुरांत म्हणाला,

'काय तात्या, कसा काय हाये वकील आमचा ?'

तात्या कोरड्या रुक्ष सुरांत म्हणाला,

'बरा हाये की.'

'बरा न्हवं नुस्ता. फस्कलास हाये. सारखा बुकांत डोकं खुपसून बसल्याला आसतो. हां.'

'येड्या, बुकांत डोस्कं न्हाई लागत. डोस्क्यांत बुकं लागत्यात. समजलं ? का न्हाई !'

पांडुरंग रुष्ट होऊन म्हणाला,

‘ तुजा आपला धोसरा सोडू नगंस. ’

‘ मग खोटं हाये का ? आर, तिथं काय तरी गर्दी, चार माणसं असायची हुती ! आपण दोघंच. ’

‘ मग ? ह्या वक्ताला गर्दी कशी आसंल ? सकाळच्या पारीं आसती. ’

‘ आरं, आमच्या ह्या म्हाताऱ्याकडं सकाळ न्हाई, आन रात न्हाई. चोवीस काळ माणसं बसल्याली असःयात नंबर लावून. हाय कुटं तूं ? ’

पांडुरंग गप्प बसला. कांहीं बोलला नाहीं एकतर सकाळच्या वेळींसुद्धां आपल्या वकिलाकडे फार गर्दी असल्याचें त्यानें कधीं पाहिलें नव्हतें. आणि ज्याच्याकडे माणसें जास्ती तो जास्त हुशार हें समीकरण सोपें होतें. खरेंहि होतें; नाहीं म्हणतां येण्यासारखें नव्हतें.

तरी पण त्याला चैन पडेना. थोड्या वेळानें तो म्हणाला, ‘ काय तसल्या गर्दीला चाटायचंय ? निष्कारण येळ जायाचं काम. कवां वकिलाचं बाबाचं लक्ष जायाचं आन कवां आपलं काम हुयाचं ! ... हें आमचं काम कसं बग. दोन मिटांत मोकळं. पुन्हां पैशाची तकतक न्हाई. ’

‘ तें बघितलं मी. ‘ तात्या उपरोधानें म्हणाला, ‘ पैसं आसून दिलं न्हायीस व्हय ? ’

‘ मग आतां कसं करतूस ? आपलीबी नड हायेच. चार दिवस निभले. तेवढंच. देऊ पुन्हा सवडीनं. ’

‘ आमच्या वकिलाकडं ह्ये चालायचं न्हाईच, त्यो दिल कागद फेंकूनच. ’

‘ म्हणून तुजा वकील चांगला, न्हाई ? ’

तात्या कांहीं बोलला नाहीं. या माणसाला कसें समजावून द्यावें हें त्याला कळेना. अरे बाबा, याचा अर्थ असा होतो कीं तो माणूस व्यवहाराला हुषार आहे; त्याच्याकडे भरपूर कामें आहेत. पैसे न घेतां, पदरमोड करून दुसऱ्याचीं कामें करायची त्याला गरजच काय मुळीं ? असाच याचा अर्थ होतो ना ? मग आपल्या कामाला कोणता माणूस जास्ती उपयोगी ? पण या आठमुठ्या माणसाला हें आतां कसें पटवून द्यावें ?

मुकाट्यानें चालतां चालतां एकाएकीं तात्याच्या डोक्यांत एक विचार आला. त्याचे डोळे लकाकले. पांडुरंगकडे तोंड करून तो म्हणाला,

'हे बग. मीबी तुज्यासारखंच करतो आज. बगूं काय हुतंय. ?'

पांडुरंगला कांहीं कळलें नाहीं. तो भिवया मोडून म्हणाला,

'काय म्हणालास ?'

'मीबी माज्या वकिलाला सांगतो, पैसं न्हायती आणलं. दीन मागनं पाठवून. तुमी ल्ह्या तशीच नोटीस. आं ? बगू काय म्हनतोय. ?'

हें ऐकून पांडुरंगलाहि कुतूहल वाटलें.

'बगूं, कर गंमत. काय हुतंय तें तर दिसंल' तात्याचें नाक अभिमानानें फुगलें. डोळे लकाकले.

'आरं तूं बगच. लई बारा टिकल्याचा हाये. काय तरी हुशारी करनारच.'

'काय करील ?'

'काय तरी करनारच ! तूं बगंच. नांव बदलीन न्हाई काय केलं त्येनं तर. हां.'

'बगू की.'

'बगच.'

साध्या बोलण्याला हळुहळू इरेसरीचें रूप आलें. तात्यानें पुन्हा पुन्हा खात्री दिली आणि पांडुरंगनें पुन्हा पुन्हा संशय व्यक्त केला. अशीं बोलणीं करीत दोघेहि हळूहळू चालत राहिले., रस्ता संपला. बोळ लागला आणि बोलण्याच्या नादांत तात्या एकाएकीं एका घरापाशीं थांबला. जरा इकडे-तिकडे बघून त्यानें खात्री करून घेतली.

पांडुरंगहि आपोआप थांबलाच होता. त्यानें विचारलें.

'हेंच का घर ?'

'हां, हेंच.'

मग घराच्या आंत शिरून तात्यानें मोठ्या सुरांत हांक मारली,

'हायति का काका घरांत ?'

घरांतल्या अंगणाकडेला मोठें जोतें होतें, एका बाजूला स्वयंपाकघर होतें.

मध्यें प्रशस्त दगडी अंगण आणि दुसऱ्या बाजूला बैठक होती. दोन्हीकडे दोन कंदील ठेवले होते. त्यांचा फिकट उजेड बाहेर पडला होता.

हांक मारल्यावर एक बाई घरांतून पदराला हात पुशीतच बाहेर आली. म्हणाली,

'बसा तिकडं. येताहेत जेवून.'

जोड्यांच्या खचांतून वाट काढून दोघेहि बैठकींत जाऊन बसले. बाहेरून मोकळी दिसलेली बैठक आंतून भरलेली होती. दहापंधरा माणसें बसून राहिलीं होतीं. एका हातांत चंची धरून कुणी हलक्या सुरांत एकमेकांशीं बोलत होते. कुणी खालीं पडलेलें शिळे वर्तमानपत्र घेऊन र–ट–फ करीत वाचीत होते. एक दोघे भिंतीला टेकून तसेच पेंगले होते. एकजण म्हातारा उशाला पटका घेऊन बाजूला आडवा झाला होता. तात्या जोत्याच्या कडेला बसला. पांडुरंग त्या दाटींतच जरा सतरंजीवर टेकला. इकडेतिकडे बघूं लागला. कंदिलाच्या अधुक उजेडांत त्याला मोकळी गादी दिसली. समोर जुनें डेस्क, एकदोन तक्क्ये. भिंतीच्या कडेला लहानसें टेबल आणि साधी खुर्ची. लांबवर जुनें आलमारीचें कपाट, पाहण्यासारखें असें फारसें कांहीं नव्हतेंच.

थोडा वेळ असाच गेला. मग मांडी घालून दोन्ही हात जोडून उगीच बसलेल्या एका पाव्हण्यानें पांडुरंगला हलक्या आवाजांत विचारलें,

'कुटले ?'

पांडुरंग म्हणाला, 'बिबेवाडीचें.'

'म्हंजे ठेशन हाये–'

'तेंच.'

विचारणारा थोडा वेळ गप्प बसला. मग पुन्हा म्हणाला,

'काय खटलं काढलं ?'

पांडुरंगनें नकारार्थी मान हलवली. मग कडेला बसलेल्या तात्याकडे बोट केलें.

'मी आपला संगट आलोय नुस्ता.'

विचारणाऱ्यानें समजल्यासारखी मान हलवली. मग असेंच कांहीं कांहीं बोलणें झालें. थोडीशी ओळखपाळख झाली. तास अर्धातास कसा गेला हें कळलेंच नाहीं.

---आणि मग कमरेंत वांकलेले, दोन्ही हात पाठीमागें घेतलेले, म्हातारे वकील हळूहळू चालत, बैठकींत आले. गादीवर येऊन बसले.

त्यांना बघितल्यावर माणसें एकदम सावध झालीं. सगळेजण नीट सरसावून बसले. प्रत्येकानें थोडें मागें सरकल्यासारखें करून आपला आदर व्यक्त केला. नकळत पांडुरंगहि थोडा मागें सरकला.

अंगांत गुंड्या नसलेला साधा सदरा, साधें धोतर, अंगांची किडकिडीत काठी. पण गोऱ्यापान देहाला शोभणारें मोठें कपाळ आणि दरदरीत नाक. तीक्ष्ण भेदक डोळे.

त्यांना बघून पांडुरंगालाहि मनांतून धाक वाटला. तो बावचळून त्यांच्याकडे बघतच राहिला.

मग वकीलसाहेब संथपणानें म्हणाले,

'हूं, काय पाटील मग ? काय करायचं ?'

पाटील म्हणणारा जरा पुढें सरकला. भित्र्या आवाजांत म्हणाला,

'काय काका तुम्ही म्हणाल तसं !'--

त्याबरोबर एकदम कडाडल्यासारखा आवाज आला,

'हे आसलं गुळमट बोलणं नको मला. अपीलाचं काम आहे. खर्च होणारच. पट्‌दिशीं ठरवायचं अन् सांगायचं.'

पाटील हादरलाच. गरीबपणानें म्हणाला,

'तुमच्या शब्दाभायेर हाये का कधीं मी ?'

'ठीक आहे मग. चला. मी पाहीन पुढचं. पैशाची व्यवस्था करून या. म्हणजे झालं.'

काकांनीं लगेच पायऱ्यांकडे बोटच दाखवलें. पाटील लगेच जागचा उठला नाहीं. थोडा वेळ उगीच बसला. पण मग केव्हांतरी उठून निघून गेला. तोंपर्यंत वकिलांनीं दुसऱ्या कुणाचें तरी काम संपवलेंहि होतें.

एकामागोमाग एक अशीं तडातड कामें संपलीं, भराभरा माणसें उठलीं आणि गेलींहि. जोड्यांचे, चपलांचे सटकपटक आवाज एकसारखे होत राहिले. पण म्हातारबुवांचें तिकडे लक्ष नव्हतें. त्यांचा आपला तडाखा सुरू होता. मध्येंच एखादें दुसरें नवीन काम निघालें त्यांत ते रंगून गेले. नाना प्रश्न विचारून त्यांनीं सांगणाऱ्याला बेजार केलें. कुठल्या कुठल्या गोष्टी

बरोबर अदमासानें सांगितल्या. मध्येंच चिडून ओरडले. पुन्हा कांहींतरी ऐकतां ऐकतां हंसूं लागले. त्यांच्या पोटाच्या वळकटया एकसारख्या वर-खालीं झाल्या.

हां सगळा प्रकार पाहतांपाहतां पांडुरंगहि त्यांत गुंगून गेला. किती वेळ गेला हें त्यालाहि कळलें नाहीं. मध्येंच त्यानें एकदोनदां तात्याकडे नजर टाकली. 'काय, कसा आहे आमच्या वकिलाचा हिसका ?' असें तात्यानें डोळ्यांनींच त्याला विचारलें, तेव्हां तो गप्प बसला. मग हाताच्या बोटांनीं त्यानें पैसे उडवल्याची खूण केली आणि मघांच्या गोष्टीची तात्याला आठवण करून दिली.

बराच उशीर झाला. अखेर सगळे पक्षकार हलले. एकटा तात्या आणि पांडुरंग उरले. तेव्हां मग वकिलांचें लक्ष तात्याकडे गेलें. तोंडानें जांभई देऊन वकील म्हणाले,

'काय तात्याबा, फारा दिवसांनीं आलांत ?'

तात्याबा जरा पुढें सरकला. भोळेपणानें मान हलवीत म्हणाला,

'व्हय व्हय. कामच पडलं न्हाई कांई.'

'बरं, आतां काय काढलंय् ?'

'नोटीस आलीय मालकाची—

'जमीन सोडा. आम्हांला घरीं करायचीय अशीच ना ?'

'आं ? तुमाला काय म्हाईत ?'

वकील हंसून म्हणाले,

'अरे, सगळीकडं तोच दणका आहे ना सध्यां. मग दुसरी नोटीस कसली असणार ?'

'ही बगा. वाचा–'

असें म्हणून तात्यानें जवळ ठेवलेल्या पडशींतून एक मळकट लखोटा बाहेर काढला आणि तो वकिलापुढं धरला.

'कांहीं जरूर नाहीं वाचायची. ठेवून दे इथं तो कागद. बघीन मी सावकास.'

'आन् मग ?'

'मग काय? मी पाठवीन उत्तर. तुम्हीं नुसता वकीलपत्रावर एक आंगठा उठवून जा माघारी.'

म्हाताऱ्या वकिलांनीं अशा कांहीं सुरांत हे शब्द उच्चारले कीं जास्ती कांहीं बोलायची तात्याची हिंमत झाली नाहीं. त्यानें मुकाटयानें अंगठा उठवून दिला. पांडुरंगची ओळख करून दिली. मग तो गप्प बसला. थोडया वेळानें म्हणाला,

'काका, ह्येला किती पैसं लागतील?'

काका संथपणें म्हणाले,

'नोटिशीच्या उत्तराचे दहा. लिहिणावळ दोन. रुपये बारा लागतील.

'व्हय का?–'

एवढे म्हणून तात्यानें मान खालीं घातली. तो पुढें कांहीं बोलला नाहीं. दोन मिनिटें अगदीं शांत गेलीं.

मग काका कपाळाला आंठया घालून त्रासिक सुरांत म्हणाले,

'आतां का चिकटपणा लावलाय्? देऊन टाका पैसे अन् उठा. उशीर होतोय् मला. चला आटपा.'

हें ऐकल्यावर पांडुरंगकडे नकळत तात्याकडे पाहिलें. दोघेहि मनांत काय समजायचे तें समजले.

तात्या मान खालीं घालून, वरून जरा बाचकतबिचकत बोलला,

'काका, पैसं न्हाईत आणलं. मागनं लावून देतो.'

आणि त्यानें भित्र्या नजरेनें आपल्या वकिलाकडे पाहिलें. पांडुरंगहि कुतूहलानें टक लावून पाहूं लागला. त्यांनें कान टवकारले.

काकांनीं एकदां त्याच्याकडे रोखून बघितलें. चेहरा निर्विकार केला.

'पैसे आणले नाहींत म्हणतोस, तात्याबा?'

'व्हय!'

'मग काय चालत गांवीं जाणार आतां?'

'न्हाई न्हाई,!' तात्या ओशाळला, 'तसं भाडयापुरतं ठेवल्यात की.'

'हां, मग हरकत नाहीं. नसले तर माझ्याकडून घेऊन जा. उगीच जिवाची आबदा करून घेऊं नकोस रे.'

'नगं नगं. हाये रुपयाभर माज्यापाशीं.'

'मग ठीक आहे. बरं, चुरमुरे, डाळेबत्तासे कांहीं घेतलंस का नाहीं नातवंडाला ? जायच्या आधीं आठवणीनं घेऊन जावं. पोरं वाट बघत असतात माणूस गांवाहून यायचं असल म्हणजे.'

तात्या गैरसावधपणानें बोलला,

'हा हां ! आतां भायेर पडल्यावर घेणारच कीं. मगच ठेसनावर जाऊन पडणार.'

'म्हणजे आणखी एक रुपयाभर वर आहे म्हण की ?' वकीलसाहेबांनीं मान हलवली. चेहरा मिस्किल केला.

तात्या एकदम ओशाळून हंसला. एखाद्या खोडकर लहान पोराला खोडी करतांना धरल्यावर तें जसें अवखळपणें हंसतें, तसा तो हंसला. पुन्हां ओशाळला. त्यानें मान हलवली.

'हा हा. तसा हाये एक रुपया वर.'

'का देऊं मी तुला ?'

'नगं नगं.'

काकांनीं पुन्हा मग तात्याला नजरेच्या टप्प्यांत धरलें.

'एकूण दोन रुपये जवळ आहेत म्हणतोस मग ?'

'व्हय.'

'काढ बरं तेवढे तरी बाहेर.'

एकाएकीं काकांनीं असें सांगितल्यावर तात्या त्यांच्याकडे आ करून बघतच राहिला.

'द–दोन रुपये काका ?'

'असूं दे. काढ तर खरं बाहेर. ठेव इथं.'

संवयीनें तात्याचा हात झटक्यानें आंतल्या खिशाकडे गेला. पण तो बाहेर निघालाच नाहीं. आंतच वळवळत राहिला.

काका किंचित् हंसत म्हणाले,

'मला माहीत आहे तुझ्याजवळ पांच रुपयाची नोट आहे. हं, काढ बरं लवकर बाहेर.'

तात्यानें डोळे विस्फारले. 'आं ? तुम्हांला काय म्हाईत ?'

'आहे मला माहीत. माझ्याजवळ कर्णपिशाच्च आहे. हं, काढ काढ बाहेर.'

तात्यानें मग फारशी गडबड केलीच नाहीं. मुकाट्यानें खिशांतली पांच रुपयांची चुरगळलेली नोट काढली. सतरंजीवर ठेवली.

काका पुन्हा मिस्किलपणानें म्हणाले,

'आतां असं कर. त्या डोस्क्यावरच्या पटक्यांत बांधलेली एक नोट काढ बाहेर. हं, काढ काढ.'

तात्या कावराबावरा झाला.

'आं ? तुम्हांला कसं कळलं तिथं म्यां ठिवली म्हणून ?'

'कळलं मला. काढ, आटप.'

तात्यानें मुकाट्यानें पटक्याचें आंत खोंचलेलें टोंक बाहेर काढलें. त्याची गांठ सोडली. आंत ठेवलेल्या दोन दोन रुपयांच्या दोन नोटा न बोलतां पुढें टाकल्या. हात झाडले.

'झालं काका आतां. माझ्याजवळ काय ठिवलं नाहीं तुमी.'

म्हाताऱ्या काकांनीं उगीचच मान हलविली. थोडा वेळ इकडे तिकडे पाहिलें. पांडुरंगला कांहींतरी मध्येंच विचारलें. मग एकदम आठवण झाल्यासारखा चेहरा करून एकाएकीं विचारलें, 'अरे, चंची आहे का चंची तात्याबा ?'

तात्याबाला वाटलें काकांना पान खायचें असावें. निदान सुपारी हवी असावी. तो उत्साहानें म्हणाला.

'हाय कीं. सुपारी देऊं का कातरून ?'

पडशींतलीं चंची बाहेर निघेपर्यंत काका कांहीं बोलले नाहींत. तात्यानें कातरून दिलेली सुपारी त्यानीं मुकाट्यानें तोंडांत टाकली. थोडा वेळ तोंड बंद करून चघळली.

'आतां असं करा. ती चंची चांचपून बघा बरं जरा. आहेत एकदोन रुपये तात्या.'

तात्या एकदम दचकला.

'आं ?'

काकानीं हातांनीं चुटक्या वाजवल्या.

'हं, आटप लौकर. काढ काढ.'

'आवो, एवढं न्हाईत त्यांत काका. चारदोन आणे निघतील लई झालं तर.'

'बघूं कीं. तूं काढ तर खरं.'

तात्यानें मुकाट्यानें चंची पालथी केली. नाना वस्तु त्यांतून बाहेर पडल्या. खळखळ करून सुटे पैसेहि खालीं पडले. सुपारीच्या, काताच्या चुन्यांतून पैसे वेंचन तात्यानें तो ढीग मोजला. काकापुढें ठेवला. सगळे संपले अशा अर्थानें हात हलवले.

'आतां खरंच खलास हां काका.'

'किती निघाले तात्याबा ?' काकांनीं हंसत विचारलें.

'निगाला दीड रुपया.'

'म्हणजे झाले साडेदहा रुपये, दहा रुपये त्यांतले राहूं दे. माझे. फीचे दोन रुपये दे मागून आणून अं ? अन् हे आठ आणे राहूं दे वाटलं तर तुझ्याजवळ भाडेखर्चाला.'

तात्या शरमला. पराभव झाल्यासारखा चेहरा करून म्हणाला, 'नगं-नगं. हायेती माझ्याजवळ तेवढं पैसं.'

'तरी पण असूं दे. चारआठ आणे जास्त असावेत माणसाजवळ, बाबा.'

काकांनीं आठ आणे त्याच्याकडे सरकवले. राहिलेले दहा रुपये डेस्कांत ठेवून कुलूप लावलें.

'बरं, मग या आतां. मी करतों काय करायचं तें.'

असें म्हणून ते सावकाश उठले. नेहमीच्या संवयीनें त्यांनीं दोन्ही हात पाठीमागें घेऊन जुळवले. मग कमरेंत वाकलेले हे म्हातारबुवा हळूहळू चालत आंतल्या खोलींत गेले.

त्याच्याकडे बघत तात्या भक्तिभावानें मान हलवीत राहिला. शेवटीं गहिंवरून स्वतःशींच म्हणाला, 'तरीच माझा वकील !'

—मग, इतका वेळ गप्प राहून हा प्रकार पाहणाऱ्या पांडुरंगकडे नजर टाकून जोरांत बोलला.

'काय ? कसा आहे माझा म्हातारा वकील ?'

० ० ०

## ६ : प्रदर्शन

पाटील गांवाहून परत आले ही बातमी ताबडतोब झाली. वाड्या-वस्त्यापर्यंत गेली.

वास्तविक कुणी माणूस गांवाहून परत येणें ही गोष्ट अशी कांहीं मुलखावेगळी नव्हे. गांवांत रोज कुणीतरी परगांवाहून येत होतें आणि जात होतें. गांवचा पाटील तरी काय, पूर्वीं कधीं गांवाला गेला नव्हता आणि आतांच अगदीं नव्यानें गेला होता असेंहि कांहीं नव्हतें. तरी पण पाटील परत आले ही बातमी ऐकल्यावर लोकांनीं कान टवकारले. सांगणाऱ्या माणसापाशीं नाना चौकशा केल्या.

'कवां आले?'

'हे आतांच! अजून बैल तशीच आसत्याल गाडीला.'

'बरी हाये का तब्ब्येत?'

'त्याला काय धाड झालीय? झाक्!'

'आयला, आलं पायजे वाड्यावर मग.'

'या की सांजच्याला. लई मज्जा मज्जा सांगतुया.'

'अगंगंगं! मग आलंच पायजे.'

अशा प्रकारचीं बोलणीं ठिकठिकाणीं झालीं. ज्याला त्याला मोठी उत्सुकता वाटली. पाटील परत आले ही बातमी महत्वाची वाटली. याचें कारण इतकेंच होतें कीं पाटील मोठा गमत्या माणूस होता. तो गांवांत असला म्हणजे लोकांना वेळ घालवायला दुसरें कांहीं निराळें साधन लागत नसे.

बैठकींत बसावें, तिथलीच पानतंबाखू खावी आणि मांडीला रग लागेपर्यंत गप्पा हाणाव्या. फार वेळ झाला, रात्र झाली तर तिथेंच आडवें व्हावें. अंगावरच्या धोतराच्या निऱ्या सोडून त्याचें पांघरूण करावें आणि लवंडावें. मग सकाळीं तिथला पितळीभर चहा पिऊनच घरीं परत यावें. असा हा मोठा सुरेख कार्यक्रम असे. पण पाटील नसल्यामुळें तो बुडाला होता. गेले कित्येक दिवस बुडाला होता आणि त्यामुळें लोकांना फार चुटपुट लागून राहिली होती. पाटील आतां परत आले. पूर्वीचा कार्यक्रम सुरू व्हायला हरकत नाहीं.

लोकांना ही बातमी महत्वाची वाटायला आणखी एक कारण होतें.

पाटलाचें या वेळचें जाणें कांहीं साधेसुधें नव्हतें. एरवीसारखा तो कांहीं कोर्टाच्या कामाला तालुक्याच्या गांवीं गेला नव्हता किंवा लग्नकार्याला पाव्हण्याकडे गेला नव्हता. फार निराळचाच कामासाठीं गेला होता. फार फार लांब गेला होता. दिल्लीला कसलें तरी एक शेतकीचें प्रचंड प्रदर्शन भरलें होतें आणि कुणातरी पाव्हण्याची सोबत साधून तें प्रदर्शन पहायला पाटील गेला होता. दिल्लीचें नांव गांवच्या दहापांचजणांना माहीत होतें. पण ती कुठें आहे, काय आहे याचा पत्ता गांवांतल्या शाळामास्तरखेरीज कुणाला नव्हता. सगळ्या गांवांत शिकलेले लोक आधीं बोटावर मोजण्याएवढे होते. एकटा पाटीलच फायनल नापास होण्यापर्यंत पुढें गेला होता. त्यामुळें तो वर्तमानपत्र अधूनमधून वाचीत असे. कुठून तरी त्याच्या डोक्यांत शिरलें कीं दिल्लीचें शेतकी प्रदर्शन आपण पाहिलें पाहिजे. शेतीची खूप माहिती होईल आणि दाबून पैसा मिळेल. म्हणून आयत्या वेळीं चार ठिकाणचे पैसे गोळा करून सगळ्यांना सांगून तो गेला होता. मुंबईपर्यंत गाडीनें जाऊन तिथून विमानानें दिल्लीला जाणार होता. तसें त्यानें बोलून दाखवलें होतें आणि बोलल्याप्रमाणें करणारा गडी तो आहे या विषयीं लोकांची खात्री होती. एकंदर त्याच्या मळ्यांत पंधरावीस एकर ऊंस हमेशा उभा होता. पैशाला कांहीं कमी नव्हतें. चांगल्यापैकीं बागाईतदार असलेला हा माणूस पुन्हां हौशी होता. वेळप्रसंगीं लागेल तेवढा पैसा खर्च करायला तो कधीं मागेंपुढें पहात नव्हता. त्यामुळें त्यानें काय काय पाहिलें, शेतकींतल्या कोणकोणत्या गोष्टी बरोबर आणल्या याबद्दल लोकांना भयंकर उत्सुकता होती.

जे रिकामटेकडे होते ते तास दोनतास आधींच येऊन जागा अडवून बसले होते. पान चघळत होते. सगळ्यांच्या आधीं आपण पाटलाशीं गप्पा हाणायची पर्वणी घ्यावी असा त्यांचा हेतु होता. पण आल्याआल्या पाटील जो झोंपला होता, तें संध्याकाळ झाली तरी उठला नव्हता. माजघरांतून त्याच्या घोरण्याचा आवाज लांब बाहेर ऐकूं येत होता. त्याच्या उठण्याची वाट बघत लोक चुळबुळत होते. इकडे तिकडे करीत वेळ काढीत होते.

सतरंजीवरनं तरातरा चालणारा एक गलेलठ्ठ ढेकूण हाताच्या बोटानें चिरडीत बेकार पांडा म्हणाला,

'आयला, हा जिन्नस हिथंबी हायेच का! लई कार उडविलाय घराघरातनं.'

नारायण चेंगटाचें तिकडे लक्ष नव्हतें. तो मान वर करून आढ्याला टांगलेल्या मकेच्या कणसाच्या वाळल्या पाचुंद्याकडे बघत होता. रात्रीच्याला हीं कणसें काढावीत कीं काय, आणि काढून घरीं नेलीं तर त्याचा नेमका काय उपयोग होण्यासारखा आहे याचे विचार त्याच्या डोक्यांत घोळत होते. त्यामुळें पांडानें कांहींतरी उद्गार काढल्यावर तो दचकला. मान खालीं करून इकडे तिकडे बघूं लागला.

'काय म्हणालास पांडा?'

बोटाला लागलेली तांबडी रेघ तिथंच सतरंजीवर उमटवीत पांडा म्हणाला,

'ह्यो ढेकूणच्या बायली!'

'हां हां.'

'लई सुळसुळाट!...कशी काय पाटलाला झोंप येत आसंल म्हंतो मी.'

'रगातच कडू आसतं एकेकाचं. त्येस्नी न्हाई चावत.'

'तरीच उठंनात आजून. दोपार झाली मी बसलोय असा. धापांच ढेकणं मारलीं.'

रामा खरात इतका वेळ चिलमीचा धूर काढीत उगीच बसला होता. पांडाचें हें बोलणें ऐकून त्यानें चिलीम बाजूला धरली. धूर सोडून तो म्हणाला,

'आं? आन तुमच्या आधी मी आलोय की रं. बसून बसून बुडाला वारूळ लागलं माज्या—मग मी किती वेळ बसलो आसंल तूंच सांग.'

'आगंगं ! ... मग पाटील लई म्हंजे लईच वेळ झोपल्यात.

'मग ! दिल्लीहून आल्यात मर्दानु. हालकंसलकं काम हाय का? त्यातनं जाताना इमानानं गेल्यात. दमनारच माणूस.'

'हां, हे खरं हाय.'

अशा त्यांच्या गप्पा बऱ्याच वेळ चालल्या. हळूहळू चाराचे पांच, दहा होतां होतां बरीच मंडळी जमली. संबंध बैठक गच्च भरून गेली. पाटला-कडून शेतकीची, प्रदर्शनाची माहिती मिळेल म्हणून वाड्यावस्त्यावरनंसुद्धां माणसं आलीं होतीं. त्यामुळें बरीच गर्दी झाली. एकमेकांना रेटूनखेटून बसण्याची पाळी आली. हळु आवाजांत सगळे एकमेकांशीं बोलतां बोलतां गोंगाट करूं लागले आणि त्यामुळें पाटील जागे झाले. डोळे चोळीतचोळीत बाहेर आले.

'बसा बसा, आलोंच चूळ भरून.'

असें म्हणून पुन्हां पाटील आंत गेले. चूळबीळ भरून धोतराच्या सोग्यानें तोंड पुशीत बाहेर आले. मिशांतलें पाणी बोटांनीं निपटून काढीत तक्क्याला रेलले. सगळ्यांनीं रामराम केला. कौतुकानें, उत्सुकतेनें त्यांच्या-कडे पाहिलें. त्यांतल्या त्यांत पुढें सरकून बसायची घाई केली.

'हं काय मंडळी, कसा काय बेत ?' पाटलांनीं पुन्हां मिशा निपटल्या.

पाटलांचा देह चांगलाच प्रशस्त होता, त्याला शोभेल असाच भरडा आवाजहि होता. खणखणीत सुरांत हा प्रश्न त्यांनीं विचारल्यावर सगळ्यांना बरें वाटलें. बैठक रंगणार याची खात्री पटली. नकळत सगळ्यांच्या तोंडावर हंसू उमटलें.

'हाये बरं.'

'चाललंय पयल्यापरमानं.'

'परवांच बांधाचा सायेब येऊन गेला. कायबाय इचारत हुता. आमी सांगटलं त्येला. पाटील आलं म्हंजी ये. त्याबिगार काय आमाला नीट्ट सुधरायचं न्हाई. हां-'

पाटील खुषींत येऊन हंसले. धान्य न घालता नुसतें जातें फिरवलें

म्हणजे जसा आवाज येतो तसा आवाज निघाला. पाटील सुखरूप परत आले आहेत याविषयीं लोकांची पुन्हां एकदां खात्री पटली.

चव्हाणाच्या गणपतला शेतीचा चांगला नाद होता. पाटलाकडून चार नव्या गोष्टी ऐकायला मिळतील म्हणून तो मुद्दाम आला होता. घरची गाडी गुंतली होती म्हणून दुसऱ्याची गाडी करून, चारदोन माणसं घेऊन वस्तीवरून आला होता तो उत्सुकतेनें म्हणाला,

'पाटील, परदर्शनात लई मजा बगितली आसंल न्हाई ? काय काय एकेक सांगा तर खरं '

पाटलांच्या मिशा मोरपंखासारख्या विस्तारल्या. त्यांनीं आपला जबडा उघडून. ते कांहीं बोलणार तेवढ्यांत बेकार पांडा मान हालवून म्हणाला,

'छ्या: छ्या. ! तसं न्हाई चालायंच हां. एकदम न्हाई सांगायचं. हिथून निघाल्यापासनं वळीनं सांगत जायाचं. कसं कसं झालं, काय काय झालं –'

पाटील म्हणाले,

'म्हंजे समदं ? डिटेलवार ? '

उजव्या हाताच्या बोटांची चिमूट करून तिनें हवेंत उभी रेघ मारीत पांडा बोलला,

'हां. आगदी डिटेलवार. म्हंजे मज्जा येतो.'

गणपतची इच्छा होती कीं पाटलांनीं प्रदर्शनाची माहिती आधीं सांगावी. भाजीपाला, धान्यधुन्य, गुरेंढोरें यांत कायकाय प्रकार दिसले, कोणकोणत्या नवीन गोष्टी आढळल्या, आपण शिकण्याजोगें काय आहे, हें सगळें ऐकायला मिळावें. तसें त्यानें सांगण्याचा प्रयत्न केला पण त्याच्या म्हणण्याला कुणीच पाठिंबा दिला नाहीं. उलट नारायण चेंगटानें त्याच्याकडे न्याहाळून पाहिलें. प्रदर्शनांतल्या खिलारी वळूकडे जसें बघावें तसें बघितलें. मग तो म्हणाला,

'ये गणपा, जरा गप् पड की मर्दा ! पाटलास्नी समदं सांगूं दे येत्र-स्थेशीर. मग हाये की परदर्शन. का कुटं पळून चाललंय का ? '

पांडा बोलला, 'तेंच मी म्हणत हुतो.'

गणपतनें माघार घेतली. यांच्या कलाकलानें का होईना शेवटीं ऐकूं माहिती आपण, असा विचार करून तो म्हणाला,

' बरं बाबा, जसं तुमी म्हणचाल तसं. मग झालं ? '

आपला फार मोठा विजय झाल्यासारखा चेहरा करून पांडानें पाटलाकडे मोहरा वळवला. पानाला चुना लावला.

' हूं, पाटील करा सुरू गाडी तुमची. '

सगळीकडे एकदम शांतता पसरली. जो तो डोळे पाटलाकडे लावून लक्षपूर्वक ऐकण्याच्या तयारीनें राहिला. आपसांतलें बोलणें अगदीं बंद झालें. सगळ्याच्या तोंडावर उत्सुकतेची परमावधि दिसली तेव्हां पाटलांनीं मांडी घातली. झकास चार पानांचा विडा तयार करून तो तोंडांत भराभर कोंबला. मग आपल्या कराल दाढांखालीं तो चिरडीत हातांत तंबाखूचा ढीग जमा केला. रस गिळून घसा स्वच्छ केला. दोन्हीं मांड्यांवरून हात फिरवीत सगळ्यांकडे एकवार निरखून पाहिलें.

' म्हंजे कसं कसं झालं बरं का. बरेच दिवस माजी आपली विच्छा की लांब कुटंतरी जावं. परदर्शनंविरदर्शन आसलं काय तरी बगावं. चार गोष्टी म्हाईत करून घ्याव्यात. म्हणून म्यां शेवटाला ठरीवलं कीं–दिल्लीला जायाचं—– '

पाटलाचें हें गुऱ्हाळ सगळ्यांना चांगलें माहीत होतें. कुठलीहि गोष्ट सांगायची झाली कीं अगदीं अथपासून इतिपर्यंत सांगायची. प्रत्येक तपशील रंगवून रंगवून सांगायचा. मागें कोर्टांत त्यांनीं एका खूनखटल्यांत साक्ष दिली तेव्हां स्वतःच्या जन्मापासूनची कथा सांगून सगळ्या कोर्टाला अगदीं जेरीला आणून सोडलें होतें. कोर्टानें मधूनमधून तंबी दिली तेव्हां सूत्र तुटल्यामुळें पुन्हां त्यांनीं पहिल्यापासून प्रारंभ केला. त्याचा परिणाम इतकाच झाला, कीं साक्षीदार म्हणून त्यांची पिंजऱ्यांतून हाकलपट्टी झाली आणि पुन्हां त्यांना साक्षीला बोलविण्याच्या फंदांत कुणीं पडलें नाहीं. लोकांना हें माहीत होतें. त्यामुळें त्यांनीं त्यांचें सगळें बोलणें निमूटपणें ऐकून घेतलें. शेवटीं अर्ध्या तासानें गाडी मुंबईच्या गाडींत बसेपर्यंत येऊन ठपली, तेव्हां रामा खरात म्हणाला,

' मुंबैची गाडी विलेक्ट्रिकची आसती म्हनत्यात– '

'तर ! ' पाटील ठाम सुरांत बोलले, 'विलेक्ट्रिक म्हंजे काय ? समद्या बाजूंनीं नुसत्या ताराच तारा. गाढव वराडल्यावानी इंजिन वरडतंय. भ्वां ऽऽ ! भ्वां ऽऽ !'

सगळीकडे हंशा पिकला. वातावरणांत थोडासा मोकळेपणा आला. पाटीलहि पोट धरधरून हंसले. पुन्हां एकदां जातें खराखराखरा करून मोठमोठ्यांदां वाजलें.

पांडा डोळे विस्फारून सगळी माहिती ऐकत होता. हंशा ओसरल्यावर त्यानें विचारलें,

'आन् मधी बोगदं हायती म्हनं.'

'लई बोगदं.'

'किती ?'

'लई, आपरंपार बोगदं. आंधारगुडुप आंत.'

'कसं काय पाडलं आसतील बोगदं म्हंतो मी.'

नारायण चेंगट बोलला, 'कसं काय म्हंजे ?...आतां इक्ती वर्सं गाडी मुंबईला जातीय ती काय उगं ? दर बारीला गाडी डोंगराला धडक देत आसंल. थोडा थोडा भोकसा दर बारीला पाडायचाच आपला. हुतोय बोगदा आपसूक. कसं पाटील ?'

पाटलांनीं हात हवेंत उडवले.

'काय आसंल ते आसंल तिच्या मारी. सापासारखी गाडी जातीय भोगद्यातनं एवढं खरं. सुळसुळसुळ...आन् मुंबईत गेल्यावर तर काय ? मायंदाळ गाड्या. हिकडनं एक गाडी, तिकडनं एक गाडी......'

तम्मा धनगर गांव सोडून संबंध जन्मांत कुठं गेला नव्हता. त्यामुळें त्याला प्रत्येक गोष्टीचें आकरीत वाटत होतें. तोंड आ करून आणि डोळे विस्फारून तो मुकाट्यानें ऐकत होता. आतां मात्र त्याला राहवेना. जागच्या जागींच सरकल्यासारखें करून तो म्हणाला,

'आगं आई गं ! इकत्या गाड्यांना रस्ता तरी कसा घावत आसंल म्हंतो मी ? चुकत बी आसंल एखादी.'

पाटलांनीं त्याच्याकडे कींव केल्याप्रमाणें पाहिलें.

'गाडी म्हंजे लेका मेंढरू हाय व्हय ?'

'न्हाई न्हाई.'

'आरं, तिथं तर दोन्ही बाजूनं बिल्डिगा. आन् मधनं गाडी पळतीय. आतां बोल–'

'आग बाबौ.'

पाटलांनीं मुंबईचें पुराण बराच वेळ चालवलें. त्यावरून लोकांना बरीच नवीन हकीकत कळली. मुंबई हें फार मोठें गांव आहे, तिथें लाखों माणसें राहातात, मोठमोठ्या प्रचंड इमारती आहेत आणि समुद्र आहे इत्यादि माहिती पुष्कळांना होतीच पण पाटलांनीं सांगितलेली माहिती याहिपेक्षां अद्‌भुत होती. मुंबईचे लोक एकसारखे पळत असतात. ते का पळत असतात तें कांहीं कळत नाहीं. बहुधा त्यांच्या पाठीमागें पोलिस लागले असावेत. कारण मुंबईत डांबीस माणसें फार. मुंबईला समुद्र आहे ही तर गोष्ट खरीच, पण त्याचें वैशिष्टच म्हणजे त्यांत भयंकर पाणी आहे. जिकडे बघावें तिकडे पाणीचपाणी वहात असतें. मुंबईतल्या पोलिसाच्या हातांत फार ताकद असते. त्यानें हात आडवा केल्याबरोबर माणसें, वाहनें, मोटारीफिटारी तर थांबतातच, पण कुत्रीं आणि गाढवेंसुद्धां निथल्या तिथें उभीं राहतात. कुणाची पुढें जाण्याची हिंमत होत नाहीं. सिनेमाच्या थिएटरांत गार वारा सोडण्याची सोय केलेली असते. इतका गार वारा कुठून आणतात हें कांहीं कळत नाहीं. तो बहुधा यंत्रानें तयार करतात. खुर्चीत बसला माणूस की डाराडूर झोप येते. तिथल्या बायका तर ड्रेस घालण्यांत फार नटारंगी आहेत. एकीहून एकीची कडी असते. आपल्याकडे बघून त्या उगीच हंसतात. किंबहुना जिकडे जिकडे आपण जावें तिकडे तिकडे लोक हंसून आपलें स्वागत करतात.

पाटलांनीं अशी निरनिराळी माहिती सांगितली. त्यावर बरीच प्रश्नोत्तरेंहि झालीं आणि लोकांना पुष्कळ ज्ञान मिळालें. या सगळ्या प्रकारांत फक्त आणखी एक तास गेला. बाहेर अंधार गुडुप पडला. बैठकींत गड्यानें दोन कंदील लावून आणले. त्यांचा उजेड पाटलाच्या तोंडावर बरोबर पडेल अशा बेतानें पांडानें ते ठेवले. दोन समयांच्या उजेडांत शेंदूर लावलेला देव जसा दिसावा तसा पाटील दिसूं लागला. त्याच्या सांगण्याला आणखीन् मजा चढली.

गणपतनेंहि इतका वेळ मोठ्या गोडीनें सगळी कथा ऐकली होती. मुंबई–पुराण संपल्यावर तो म्हणाला.

'मग दिल्लीच्या परदर्शनांत तर मायंदाळ बघाय मिळालं आसंल–'

पांडान त्याच्याकडे निषेधाच्या सुरांत पाहिलें. 'झालं, आलं का तुजं परदर्शन? जरा दमानं घे मर्दा. आजून कुठं इमानांत बसत्यात पाटील तंवर तू दिल्हीला पोंचलासुदीक व्हय?'

विमान–प्रवासाची हकीकत ऐकायची गणपतलाहि उत्सुकता होती. सगळ्यांनाच होती. म्हणून तो म्हणाला,

'बरं बुवा राह्यलं परदर्शन. झालं?'

नारायण चेंगटानें दिव्याची वात आणखी जरा वर चढवली. पाटलाच्या तोंडावर बरोबर उजेड पडेल अशी व्यवस्था केली.

'हां, आतां बोला पाटील—'

पाटलांनीं मग मुंबईंत आपले कोण कोण पाहुणे आहेत, त्यांचीं नांवें, त्यांचे पत्ते काय, त्यांनीं आपल्या विमानप्रवासाची कशीकशी व्यवस्था केली याचें सुरस वर्णन केलें. तिखटमीठ लावून केलें. त्यांत आणखी अर्धा घंटा गेल्यावर मग एकदाचें विमान सुटलें.

'इमान सुटलं अन् मग लई पचिताप झाला. जसं उच् उच् चाललं वर तसातसा पोटात गोळा माज्या. म्हनलं आतां खालीं येतूय का न्हाई आपुन कुणाला ठावं.'

'मग? आला का न्हाई शेवट?' तम्मानें तोंड उघडें ठेऊनच विचारलें.

पांडानें त्याला डोळ्यांनीं दाबलें.

'ए, गप बैस. कायतरी अडाण्यावानी इचारू नकंस.'

'मला काय न्हावलं न्हाई. मी इचारलं तिथल्या मानसास्नी. पर त्यांची भाषा मला समजंना, आन् माजी त्येन्ला समजना'–पाटील पुढें म्हणाले, 'मग मी नादच सोडला. म्हनलं, जे हुयाचं ते हुईल. जिवाच्या करारावरच बसलोय आपुन. आतां काय भेयाचं?'

'पाटील पयल्यापासनं धाडशी लई.' चेंगटानें मान हलवली.

'धाडशी म्हंजे ?' पांडा कौतुकानं बोलला. 'नुसतं इमान आभाळातनं जातंय तर मला हिकडं धडक भरतीय ! मग पाटील कसं बसलं आसत्याल आंत, त्येंचं त्येना ठाऊक. काय गणपत ?'

गणपतनें त्या दोघांकडे लक्ष न देतां विचारलें,

'मग पोंचला कवां दिल्लींत ?'

'आरं, ऐक तर खरं मज्जा,' पाटील पुन्हां एकादं हंसले. इतक्या मोठ्यांदा हंसले कीं चेंगट आणि पांडाहि मोठमोठ्यादा हंसूं लागले.

'मला लागल्या वकाऱ्या व्हायला. जसं इमान वर जाया लागलं तसं तसं वकाऱ्या व्हाया लागल्या. पर तोंड मोकळं करावं कुटं ?'

'व्हय की. इमानांत कुठली आलीय मोरी आन् पायखाना ?

'मी बसलों तोंड हातानी दाबून धरून तसाच.'

'ते बरं केलं बगा.'

चेंगट म्हणाला, 'नाहींतर खिडकींतनं मोकळं करायचं तोंड. मोटारींत न्हाई का बायामानसं करत्यात ?

'लेका, इमान म्हंजे मोटार न्हवं.' रामा खरात बोलला. 'त्याला कुठल्या आल्यात खिडक्या आन् फिडक्या ? धक्का लागून पडलं म्हणंजे हाड-सुदीक लागायचं न्हाई हाताला. कसं पाटील ?'

पाटलांनीं मान हालवली.

'छ्या. छ्या ! खिडक्या आसत्यात हं. दोन्ही बाजूला बक्कळ खिडक्या. पर त्याला कांचा हुत्या.'

'आं ? मग हो ? '

'म्या केला हुता इचार. म्हणलं, द्यावी एक गुच्ची ठेऊन आन् फोडावी काच. करावं तोंड मोकळं. काय चारदोन रुपयं लुकसान झालं तर दिलं भरून.

'तरी काय वाईट न्हवतं. मग ?'

'व्हय की ! आपल्याला काय पैशाला तोटा आहे ? ...मग पुढं काय झालं ?'

पाटलांनीं सगळ्यांकडे एकदां निरखून पाहिलें. एखादी महत्त्वाची गोष्ट सांगायची असली म्हणजे माणूस जसा थोडासा थांबतो, ऐकणाऱ्याची उत्सु-

कता अजमावून पहातो, आणि मग बोलतो, त्याप्रमाणें पाटील दोन मिनिटें थांबले. मग सगळ्याकडे बारकाईनें पहात पहात म्हणाले,

'लई गंमत उडली. इमानांत हुती एक बाई. काम करनार हां. आमच्यासारखी शीट नव्हे.'

'आं ?'

'व्हय. पांढरा सफेत ड्रेस घातल्याली. ती आली की माझ्याजवळ.'

'आता इच्या आयला ! कशी काय हुती दिसायला !'

पाटलांनीं गणपतीच्या हातासारखा पुढें हात करून दोन बोटांची ठाम चिमट धरली.

'नंबर वन् हुती राव.'

'आन मग ?'

'माज्याजवळ आली. मला मुसलमानी भाषेंत म्हणतीय काय, 'घबराव नही, घबराव नही' अन् कसल्यातरी चिकट गोळ्या दिल्या खायाला.'

'ते कशापायी ?'

'कुणाला ठावं ? मला तोंड धुवायला सांगितलं. धुतलं. मग गोळ्या खाल्या. तरी बी डोकं काय गरगरायचं ऱ्हाईना.'

'बोलूनचालून बाईच ती !' पांडानें बारीक सुरांत शेरा मारला. 'आन् नंबर वन् पुन्हां. कसं डोस्कं ऱ्हायाचं नीट ?'

'लेका, लईच चावट हायेस पांडा तूं--'

पाटील गदगदून हंसला. त्याचें पुढें आलेलें पोटदेखील जोरजोरांत हंसलें. एकदम चारदोन जातीं वाजलीं. बाकीची सगळी मंडळी हंसूं लागली. एकमेकांत कुजबुजूं लागली. थोडा वेळ जिकडेतिकडे गलका झाला.

गणपत म्हणाला, 'इमानांत इतकी मजा तर परदर्शनात किती दिसली आसंल ? ऱ्हाई का पाटील ?'

पाटील अजून विमानांतच होता. त्या वेळच्या आठवणीनें त्याला अजून हंसूं येत होतें. त्यांतून पांडानें केलेली चेष्टा त्याच्या अंगीं लागली होती. त्यामुळें तर त्याला फारच हंसूं फुटत होतें. गणपतचें बोलणें ऐकून हंसतांहंसतां तो म्हणाला,

'आरं हये काईच ऱ्हाई. फुडची मजा ऐक जरा. फुडं तर लई भार उडाली.'

हें ऐकल्यावर पुढची मंडळी एकदम शांत झाली. गलका थांबला. मागचे दोन पायावरच पुढें सरकले. सगळ्यांनीं कान टवकारले.

'फुड काय झालं पाटील ?'

'फुडं काय ?—आमच्या खुर्चीला हुता योक पट्टा. त्या लेडीनं बांधला कीं माझ्या पोटाला.'

'पोटाला पट्टा ? आतां हिच्या मी—' तम्माला आश्चर्य वाटलें.

'माज्या पोटाला सारखा तिचा हात लागायचा. मला अशा गुदगुल्या झाल्या म्हणताय ! अरारारा !...काय इचारू नगा. लागलो सारखं हंसायला. तशी ती लेडीबी हंसाय लागली. आमी दोघं एकमेकाकडं बघतोय आन् हंसतोय......हंसतोय आन् बघतोय्—'

बेकार पांडा, नारायण चेंगट, खरात सगळ्यांच्या डोळ्यांसमोर कल्पनेनें तें चित्र उभें राहिलें. खराताला पाटील आणि ती बाई हंसत आहेत असें दिसलें. पांडाला पाटलाबरोबर आपणहि त्या विमानांत होतों आणि आपण प्रत्यक्ष हा देखावा पाहिला असें वाटलें. नारायण चेंगटाचें लग्न झालें. नव्हतें त्यामुळें त्या बाईनें आपल्यालाच गुदगुल्या केल्या असें त्याला वाटूं लागलें. आपण आणि ती बाई एकमेकांकडे बघून हंसतों आहोंत असें स्वप्न त्याला तिथल्या तिथें पडलें आणि तो मनाशीं हंसूं लागला. जणूं कांहीं त्याला खरोखरच गुदगुल्या होत होत्या अशा थाटांत पोट आवळूनआवळून हंसूं लागला.

गणपत म्हणाला, 'तर आशी बहार उडाली म्हणता ? आन् अशा रीतीनं तुम्ही दिल्लीला गेला. मग परदर्शनांत—'

'आरं तिच्या परदर्शनाच्या मी—' पांडा रागारागानें बोलला, 'जरा पाटलाच्या सोयीसवडीनं घे कीं...हां, मग फुडं काय झालं ?'

पाटलानें आपल्या मोरपंखी मिशावरनं हात चोळला.

'फुडं काय ? सारखा माजा पट्टा सुटायचा आन् सारखा ती बांधायची दोन तासांत संघम्टन वाढलं. मला चोरून तिनं कायबाय खायालाबी दिलं.'

'चोरून ?'

'व्हय. समद्यानी डोळं मिटलं होतं. झोपलं हुते. तेवढ्यांत दिलं.'

'दाब चान्स मारला पाटील तुमी.'

'मग सांगतो काय ! मला तिनं इचारलंबी—'

'काय ?'

'कोन, कुठले, कुठं चालला म्हणून. म्या सांगितलं, आसं आसं प्रदर्शन बघाय चाललोय. मला म्हनली, तुम्ही तिथंच जायोला पायजे. तुमच्या लई उपेग हायं थितं.'

पुन्हां पाटलानें बराच वेळ बडबड केली. तिच्यांत आणि आपल्यांत काय संभाषण झालें हें फिरूनफिरून सांगितलें. त्यावरून लोकांना कळलें कीं पाटलाचें नांव, घराणें, पैसाअडका याची तिच्या मनावर बरीच छाप पडली असावी. दोनअडीच तासांत जातां येता आपल्याकडे बघण्याइतकें सूत जुळलें. तिच्या मनांत कांहींतरी आणखी बोलावें असें दिसत होतें. पण इतर शिटा जवळपास असल्यामुळें तिला तें करतां आलें नसावें. पण एवढी गोष्ट खरी कीं ती कोवळ्या दृष्टीनें पाटलाकडे पहात होती. त्यांत काडीमात्र संशय नव्हता.

ही कथा सांगायला पाटलाला आणखी एक तास लागला. पुढचेपुढचे लोक चवीनें ऐकत राहिले. मागच्यांच्या डोळ्यांवर चांगली पेंग आली. कुणी बसल्याबसल्या डुलक्या घेतल्या. कांहींजण जागा बघून तिथंच लवंडले.

वेळ बराच गेला. बाहेर रात्र वाढली. अंधार दाट झाला. जिकडे-तिकडे सामसूम झाली.

गणपतला चांगल्याच जांभया यायला लागल्या होत्या. डोळे चुरचुरत होते. प्रदर्शनाची हकीकत ऐकायची त्याला फार उत्सुकता होती. म्हणूनच, झोंप येत होती तरीसुद्धां तो ऐकत बसला होता. पण मध्यरात्र झाली तरी पाटील विमानांतून कांहीं खालीं उतरत नव्हता. आतां काय करावें ?

शेवटीं मोठी जांभई देऊन त्यानें डोळ्यांतलें पाणी पुसलें.

'मग प्रदर्शनांत—'

चेंगट त्याला मध्येंच अडवून म्हणाला,

'तूं ऐक ए ऐक. आत्तांशीक कुटं रंगलंय कामा मधी बिबा घालूं नगंस.'

'व्हय, पन दिल्ली आली का न्हाई शेवटाला ?'

'आली रं ! त्योच समदा घोटाळा झाला—'

एवढें बोलून पाटलानें एक मोठा सुस्कारा सोडला. भिंतीकडे बघत तो क्षणभर गप्प राहिला. त्याचा इतका वेळ खुललेला चेहरा उतरलेला दिसला.

पांडाला मोठें आश्चर्य वाटलें. वाळलेल्या ओठावरून जीभ फिरवीत त्यानें हावरेपणानें विचारलें.

'मग ? दोन तासांत संघस्टन जुळलं. फुडं ?'

ज्या बाईवर पाटलाचें मन बसलें ती बाई घरीं आणल्याशिवाय पाटील रहात नाहीं याबद्दल चेंगटाची खात्री होती. बहुधा पाटलाचें लक्ष बोडक्या बाईकडेच जातें असा अनुभव होता. तेव्हां विमानांतली ही बाईसुद्धां बोडक्या बायांपैकींच असली पाहिजे. तसें असलें तर मग काम जुळल्यासारखें होतें. कांहीं कठीण नव्हतें. म्हणून त्यानें विचारलें.

'कुकू हुतं का तिच्या कपाळावर ?'

पाटलानें नकारार्थी मान हलवली.

'काय दिसलं तर न्हाई. पर आपल्या जातीपैकीं काय दिसली न्हाई.'

'मग काय बिघडलं ?'

'कांहीं असलें तरी या बाईला पाटलानें बगलेंत मारलें असलेंच पाहिजे याविषयी चेंगट निःशंक होता. न जाणो, तिला पाटलानें घरींसुद्धां आणली असेल या कल्पनेनें त्यानें बैठकींतूनच वाड्याकडे सर्वत्र दृष्टि टाकली. बैठकी-जवळच्या अंधाऱ्या माजघराकडहि मान उंचउंच करून बसल्या जागेवरून पाहिलें. पण कांहीं दिसलें नाहीं. तरीसुद्धां ठाम सुरांत तो म्हणाला.

'फुडं काय आसनार ? ठरल्यालंच हाय—'

'काय ?'

'पाटील हिंडलं आसत्याल तिला घेऊन संगट चैनीनं. पेशल बैलगाडी करून समद्या दिलीतनं फिरलं आसत्याल. दुसरं काय ?'

'व्हय पाटील ?'

पाटलानें मान खालीं घातली. चेहरा फार कसनुसा केला. निराशेनें मान हालवीत तो म्हणाला.

'हाड् तिच्या मारी—'

'कां वं ?'

'समदा इस्कूट झाला रं.'

'कां वं ?'

'घंटाभरात दिल्ली आली रं.'

'अरारारा—'

'आणखीन् दोन घंटे पायजे' हुते पाटलानें आपलीं दोन जाडजूड बोटें हवेंत उभीं केलीं 'म्हंजे कांडकंच तोंडत हुतो. बराबर गारद केलं आसतं तिला.'

हळुहळू पाटलानें राहिलेली हकीकत सांगून संपवली. विमान दिल्लींत पोंचलें आणि सगळे बाहेर पडले. त्या बाईनें पाटलाची चौकशी करून निरोप दिला. हात हालवला. मग पुन्हां कांहीं ती दिसली नाहीं. इकडेतिकडे खूप चौकशा केल्या. पण कांहीं पत्ता लागला नाहीं.

शेवट ऐकून चेंगटाची आणि पांडाची फार निराशा झाली. पांडा म्हणाला,

'तरी काय हरकत नव्हती. पुन्हां सुटायचं इमानानं. म्हंजे पडली आसती गांठ.'

पाटील कांहींच बोलला नाहीं. मान खालीं घालून तो तसाच बसून राहिला. मग त्यानेंहि मोठी जांभई दिली.

आतां जरा गणपतला बरें वाटलें. संपली एकदाची ही हकीकत. आतां प्रदर्शनाची माहिती विचारायला हरकत नाहीं. आतां कांहीं कुणी अडविणार नाहीं.

डोळे चोळून पाठ ताठ करीत गणपतनें पाठीचीं हाडें कडाकड मोडलीं. थोडासा पाटलाच्या बाजूला सरकून तो उत्साहानें म्हणाला,

'हां, आतां सांगा—'

पाटलानें त्याच्याकडे त्रासिक दृष्टीनें पाहिलें.

'काय ?'

'प्रदर्शनातलं.'

'कसलं लेका प्रदर्शन घेऊन बसलास अन् काय ? ह्ये !'

गणपत आश्चर्यानें बोलला,

'म्हंजे ?'

पाटलानें पुन्हां मान वर केली. त्याचा चेहरा पुन्हां उतरला. भरड्या आवाजाला दुःखाची झार आली.

'ती लेडी काय पुन्हां भेटली न्हाई. मन उदासच झालं माजं. इचार करकर केला आन् पुन्यांदा इमानाचं टिकीट काडलं.'

पांडा पुन्हां उत्सुकतेनें पुढें सरकला.

'आन् मग ?'

'काय उपेग झाला न्हाई. दुसरंच काय भेटलं. निवळ बाप्या तिच्या मारी. ह्ये मिशा एकेक. बगितल्यावर नुसतं सा महिनं दुखणं यायचं. आलो तसाच मागारी मुंबैला. जे आलो ते मग हिकडंच आलो ! --'

****

# ७ : दत्तु पैलवान

जेवणखाण आणि झोप याशिवाय दत्तूला दोनच गोष्टी माहीत होत्या. एक म्हणजे सकाळसंध्याकाळ तालमींत जाऊन मेहनत करणें, मधूनमधून फडांत कुस्ती करणें आणि दुसरी म्हणजे गांवांत कुणाशीं ना कुणाशीं तरी बखेडा करणें. ज्या वेळीं तो मेहनत करीत नसेल त्यावेळीं तो कुणाशीं तरी भांडणतंटा करण्यांत गुंतलेला आहे, असें नक्की समजावें. आणि कुठें बाचाबाची सुरू नसेल तर पैलवान दत्तु ढोबळे हा यावेळीं व्यायाम करण्यांत गुंगला असावा, हा अगदीं साधा तर्क असे. लावलेल्या दुकानाच्या मोकळ्या फळीवर बसून दत्तु येणाराजाणाराला उगीच दमदाटी देई, आवाज वाढवी आणि स्वतःची करमणूक करून घेई.

‘काय दत्तु, निवांत कां बसलाहेस ?’

असा सहज जरी कुणी प्रश्न विचारला तरी दत्तु ढोबळेच्या भुजा फुरफुरत. डोळे मोठे होत.

‘का लेका, लई आवाज करायला लागलास ? हात औट करून टाकीन, हां–’

असें तो सहज म्हणत असे. मग एखादा कमीजास्त बोलणारा गडी भेटला तर मग काय विचारावें ? माकडाच्या हातीं कोलीत द्यावें, त्याप्रमाणें दत्तु लगेच नाचायलाच सुरुवात करी. मग कुणाला खडसाव, कुणाचा हात धरून धपाटे दे, कुणाच्या उगीचच मागें लागून त्याला चिडव, असा प्रकार चाले. ह्याला टरकोबा म्हण, त्याला हेकण्या म्हण, याच्या धोतरींत लगाव,

त्याच्या पायांत पाय घालून पाड अशा त्याच्या बारीकबारीक खोड्या असत. लोक दत्तूच्या या उपद्व्यापानं फार कंटाळले. त्याच्या तालमींतील वस्तादापर्यंत कांहींनीं तक्रारी नेल्या तेव्हां वस्तादानें त्यांची समजूत घातली. सांगितलें, 'पोऱ्या जरा वांडच हाये; आतां मोठ्या कुस्तींत गुंतवून टाकतों त्याला. म्हणजे त्याचं डोस्कं आसं चालायचं न्हाई.' आणि त्यानें खरोखरच दत्तूची कुस्ती ठरवली. सोनगांवच्या देशमुखाच्या पोराबरोबर कुस्ती ठरवून तो माघारीं आला.

सोनगांवच्या देशमुखाच्या पोराबरोबर आपली कुस्ती ठरली तेव्हां दत्तु ढोबळ्याला फार इरेसरी चढली. देशमुखाचा हा पोरगा गेली पांचसहा वर्षं फडांत लढत होता. आतां अलीकडे त्यानें चांगलें नांव कमावलें होतें आणि त्याची इनामी कुस्तीहि होऊं लागली होती. गोऱ्यापान रंगाच्या या पोराचें शरीर लोखंडाच्या कांबीसारखें टणक आणि रबरासारखें लवचिक होतें. दत्तुसुद्धां असाच तयार गडी झाला होता. गेलीं कित्येक वर्षं त्याची मेहनत नेमानें चालूं होती. लहानमोठ्या कुस्त्यांत तो उजवा ठरला होता. आतां देशमुखांच्या पोराबरोबर लढत करावी आणि सबंध जिल्ह्यांत वाड व्हावें, अशी त्याची इच्छा होती. यामुळें त्याच्याबरोबर आपली कुस्ती ठरली हें कळल्यावर दत्तु तरारून उठला. यापुढें जबरदस्त मेहनत करायची. लढती करायच्या. रोज हजारपांचशें जोरबैठका मारायच्या. अशी ताकद मिळवायची कीं आपली नुसती मूर्ति बघूनच गडी हादरला पाहिजे. कुस्ती खेळायची त्याची निम्मी हिंमत आधींच खलास झाली पाहिजे.

पण हें सगळें व्हायचें म्हणजे पैसा पाहिजे. मेहनतीच्या जोडीला चांगला खुराक असला तरच मजा. आणि खुराकाला पैसा पाहिजे. तो नसेल तर आपण एवढा खुराक कुठून खाणार ?

मग दत्तु गांवांतून हिंडूं लागला. जो भेटेल त्याला सांगूं लागला, 'मालक, कुस्ती ठरली कीं आपली.'

कुणाला माहीत असे. कुणाला नसे. माहीत नसणारा माणूस विचारी, 'आसं ? कुणाबरोबर ?'

'सोनगांवच्या देशमुखाच्या पोराबरोबर.'

'फार तयार पोऱ्या हाये म्हणत्यात त्यो ?'

'आसंना- मी काय कमी हाये का ?'

'तूबी हायेस म्हणा. पण–'

'आं ? दोन महिन्यांत कसा हुतो बगा कीं. मग बोला.'

लढतीचा पैलवान दोन महिन्यांत दुप्पट होतो हें बोलणाराला अर्थातच माहीत असे. त्यामुळें दत्तूच्या बोलण्यांत त्याला कांहीं अतिशयोक्ति वाटत नसे. तो पुढें विचारी,

'बरं मग ? म्हणतोस काय ?'

मान खालीं घालून अंगठ्यानें जमीन उकरतां उकरतां दत्तू नम्रपणें म्हणे, 'आतां दूधबीध लावायचं. बदामपाणी घ्यायचं–'

'बरं मग ?'

'तुमी समद्यांनी मनावर घेतलं तर हुणार ते. मी गरीब माणूस एवडा पैका कुटुन आनूं ?'

'होय, तेंहि खरंच. बघूं कायतरी.'

दत्तूनं गांवांत ज्याला त्याला ही गोष्ट नेहमींप्रमाणें सांगितली. दोन महिन्यांत आपण तयार व्हायलाच पाहिजे, त्यासाठीं दूध बदामपाणी यांचा रतीब लावायलाच पाहिजे, ही गोष्ट त्यानें सर्वांच्या मनावर ठसवली. त्याचें हें बोलणें लोकांना मोठें नवीन वाटलें अशांतला कांहीं भाग नव्हता. कुस्ती एकदां ठरली म्हटल्यावर पैलवानानें दोनतीन महिने कसून मेहनत केलीच पाहिजे. घामानें थबथबून निघेपर्यंत आखाडा घुमवलाच पाहिजे. सकाळ–संध्याकाळ दोनदोन शेराची चरवी रिकामी केली पाहिजे. बदामपाणी घेतलें पाहिजे. लोकांना या सगळ्या गोष्टी माहीत होत्या. या भानगडीला दोन-चारशें रुपये कमींतकमी लागतात. तेवढी रक्कम पैलवानाजवळ असत नाहीं. ती गांववाल्यांनीच गोळा करून दिली पाहिजे. हें सगळें खरें होतें, पण दत्तूविषयीं लोकांची पहिल्यापासून तक्रार होती. एरवीं हा पोरगा गांवांतून नुसता कुटाळक्या करीत हिंडतो हें लोकांनीं पाहिलें होतें. हा पैलवान भेटेल त्याच्याशीं भांडणतंटा करतो, शिवीगाळ करतो आणि उद्धटपणानें वागतो. अशी बऱ्याच लोकांची तक्रार होती.

कांहीं लोक तर म्हणालेच, 'मरूं द्या लेकाच्याला ह्या टायमाला. रिक्कामा ताप नगं.'

‘ लई मस्तवाल पोऱ्या हाये. जवां बघावं तवां मिशी गड्याची वरच. आतां हिच्या बायली !’

‘ आहो, परवां आमचं पोरगं साळंला चाललं हुतं. तर त्यंचं टोपडच उडवलं ह्येनं.’

‘ व्हय व्हय, आसंल. मागं रस्त्यांत त्याची–माझी टक्कर झाली. आतां चुकून झाली, तर मला म्हनतोय कसा, ‘ का, हेकण्या, नीट दिसंना का तुला?’ –आतां मी हेकणा हाये व्हय ?’

‘ छ्याः छ्याः !’

‘ काय देऊं नगा पैसा च्या मारी पेटूं द्या कुस्ती.’

लोक असे नाना प्रकारानीं बोलले. बऱ्याच जणांनीं त्याला शिव्या घातल्या. ही कुणकुण दत्तूच्या वस्तादापर्यंत गेली. तो धांवतपळत आला आणि त्या लोकांना भेटला. विनवणीच्या सुरांत म्हणाला,

‘ आरं, आसं करूं नगा. त्याची पयलीच मोठी कुस्ती हाये. ह्या येळे-लाच लगी नाट लावूं नगा. तुमी शाणी माणसंच आसं येड्यावानी कराय लागल्यावर कसं हुयाचं ?’

‘ काय हुतंय ? काय जग बुडतंय काय ?’

‘ तसं न्हवं.’

‘ मग कसं ?’

‘ गांवचा टिळा हाये त्यो. उद्यां कुस्ती मोडली तर आपल्या सबंध गांवाची अब्रू जाईल.’

‘ जाऊं द्या गेली तर. आमचं पैसं घेऊन पुन्हां आमालाच कार का ?’

वस्तादानें मग लोकांची पुष्कळ समजूत घातली. शेवटीं समजावणीच्या सुरांत म्हणाला,

‘ लेकराची जात हाये. चुकलं आसंल. मी न्हाई म्हणत न्हाई. आतां पुन्हां आसं करायचा न्हाई त्यो. तेवड्यासाठीं तर कुस्ती धरली म्यां.’

‘ तुमी खात्री देतां का ?’

‘ त्यालाच तुमच्या पायावर घालतो कीं. मग झालं ?’

असं म्हणून वस्ताद तिथून उठला. चार लोक बरोबर घेऊनच दत्तू-कडे गेला. त्याच्या देखत त्याला चांगला राग भरला.

'गाढवा, तुझ्यापायीं मी शिव्या खाल्ल्या. ह्यो पालथा धंदा सांगितलाय कुणी मला ? तुझी कुस्ती कॅन्शलच करतो. बस बोंबलत.'

मोठ्या प्रयासानें आलेली ही संधि हातची जाणार हें बघून दत्तू हबकला. देशमुखाच्या पोराबरोबर कुस्ती खेळावी ही त्याची फार दिवसाची महत्वाकांक्षा होती. ती या खेपेस नक्की पुरी होणार होती. पण हें अवचित विघ्न निघाल्याबरोबर तो भ्याला. मनांत गडबडला. मान खालीं घालून तो तक्रारीच्या आवाजांत म्हणाला, 'आतां मी काय केलं ?'

वस्ताद तांबडालाल होऊन ओरडला, 'चूप. थोबाड फोडीन बघ. लोकाशीं उद्धटपणानं बोलतोस का न्हाईस ? खरं सांग.'

दत्तूने आणखी खालीं मान केली. अगदीं हळूं आवाज काढून तो बोलला, 'बोललो आसंन एखाद्या टायमाला. न्हाई म्हणत न्हाई–'

'आस्सं. आसं सरळ बोल मर्दा !'

'कबूल हाये की.'

वस्ताद मग गंभीर झाला.

'लेका, पैलवानानं कस गांवाशीं लागून न्हायलं पायजे. गांवाच्या जिवावर जगायचं आन् वर मस्ती करायची ह्ये कोण खपवून घील ?'

'मी कुटं न्हाई म्हणतोय ?'

'आस्सं शेंण्या माणसावानी जरा बोल. आरे, समद्याशीं गोडपणानं न्हायला पायजे.'

'व्हय.' दत्तूने मान हलवली.

'अरेला कारे कधीं करूं ने. कुणी काय बोललं तर, 'चुकलं माजं' म्हणून उलट आपणच सारून घ्यावं. कसं ?'

'व्हय कीं पटलं.'

वस्तादानें दत्तूला असा बराच वेळ उपदेश केला. तो दत्तूला मनापासून पटला कीं नाहीं हें त्यानें नीट बघितलें. सर्वांसमक्ष धाक घातला, दम भरला आणि शेवटीं दत्तूला आपली चूक उमगली हें वळल्यावर तो खूष झाला. मग त्याच्या पाठीवर हात मारून त्याला चुचकारलें.

'जा, गांवातल्या चार लोकांना भेट. म्हणावं, चुकलंमाकलं संभाळून घ्या. पुन्हां आशी वर्तुणूक माझ्या हातनं कधीं हुणार नाई. काय ?'

‘ जातों. ’

‘ एवढ्या बार माफी करा म्हणावं. ’

‘ म्हणतो कीं. ’

असें म्हणून दत्तु गांवांतल्या सगळ्या लोकांना भेटला. सगळ्यांची विनवणी केली, पूर्वी जें कांहीं झालें तें विसरून जा म्हणून सांगितलें. कांहीं-जणांशीं तो नम्रतेनें बोलला आणि कांहींच्या पायावर तर त्यानें डोकेंच ठेवलें. इनामी कुस्तींत खेळायला आपल्याला मिळावें म्हणून तो ज्याच्या-त्याच्या पाया पडला. झाल्या गोष्टी आपल्या हातून चुकून झाल्या, आतां अशी वागणूक पुन्हां आपल्या हातून कधींहि घडणार नाहीं; याची त्यानें तीनतीनदां सगळ्यांची खातरजमा केली. डोळ्यांतून पाणी काढलें. तोंड केविलवाणें करून, कळवळून तो म्हणाला, ‘ पुन्हा चुकून कधीं मस्ती केली तर कान धरा माझा. पायताणानं मारा. मग झालं ?

तक्रार करणारे लोक म्हणाले, ‘ बघ, आगाऊपणा करणार न्हाईस ना ? ’

‘ न्हाई. ’

‘ शिवीगाळ बंद ? ’

‘ बंद ’

‘ कुणाची खोडी—’

‘ न्हाई न्हाई ! ’

मग लोकांचें समाधान झालें. वस्तादानें इतकी हमी दिली; खुद्द दत्तूनें तोंड वेंगाडून क्षमा मागितली; पुन्हां कधींहि उर्मटपणानें वागणार नाहीं अशी कबुली दिली; तेव्हां फेरविचार करायला हरकत नाहीं, असें सगळ्यांना वाटलें. नाहीं म्हटलें तरी गांवच्या अब्रूची चाड ही धरलीच पाहिजे. कुस्ती एकदां ठरल्यावर ऐन वेळीं आपल्या पठ्ठ्यानें माघार घेतली हें कळल्यावर दुसऱ्या गांवचे लोक काय म्हणतील ? आणि गांववाल्यांनी हातभार लावला नाहीं म्हणून पैलवानाने नांव काढून घेतलें असें समजल्यावर त्यांना काय वाटेल ? सगळें गांव आपल्या गांवाच्या नांवानें थुंकेल. नांवें ठेवील. छे : ! कांहीं झालें तरी असें होतां उपयोगी नाहीं. कुस्ती ही शेवटीं झालीच पाहिजे. त्यासाठीं पैलवानाला चांगला खुराक दिला पाहिजे. वर्गणी करून दिली पाहिजे. तें आपलें कर्तव्य आहे.

लोकांनीं शेवटीं असा विचार केला आणि दत्तूच्या पाठीवर शाबासकीचा हात टाकला. त्याची पाठ थोपटून धीर दिला. सांगितलें, 'काय हरकत न्हाई पठ्ठे ! जा, मेहनत धर तूं. खुराकाची येवस्ता लागली आमच्याकडं.'

मग दत्तु नाचतच गेला. मोठ्या हिंमतीनें मेहनतीला लागला आणि लोक कौतुकानें त्याच्यावर लक्ष ठेवून राहिले.

पहांटे तीनला उठावें. चूळ भरून लगेच व्यायामाला जी सुरुवात करावी ती चांगलें उजाडेपर्यंत. उदबत्ती पेटवून समोर ठेवायची आणि ती चांगली विझून जाईपर्यंत जोर बैठका हाणायच्या. इतक्या कीं सगळें शरीर घामानें वितळेल कीं काय असें वाटावें. मग अंगावर लाल माती घेऊन आखाड्यांतच घटकाभर विश्रांती घ्यावी. दोन अडीच शेर दुधाची चरवी तोंडाला लावावी आणि रिकामी झाल्यावरच खालीं ठेवावी. खोऱ्यानें आखाड्यांतील माती खणत बसावें, बदाम वाटून त्याचें पाणी प्यावें, दुपारीं जास्त झोप येऊन सुस्ती चढूं नये म्हणून तालमींतच पत्ते हाणावे. संध्याकाळच्या आधीं कधीं लढती खेळाव्यात, कधीं नदीवर वाळूंत आट्यापाट्यांचा हमामा मांडावा, आणि संध्याकाळीं परत जोरबैठका माराव्या. रात्रीं दुधाचा दुसरा हप्ता रिचवावा, आणि दमगीर होऊन थकल्या भागल्या देहानें भुईला आडवें व्हावें. पहांट होतांच पुन्हां भुजा थोपटाव्यात...... ..

दत्तूनें दोन महिने अशी कडक मेहनत केली. त्याचें मूळचें पीळदार शरीर आतां अगदीं घोटीव दिसूं लागलें. त्याची छाती भरली. गर्दन फुगली. दंडाचे गोळे बेटकुळीसारखे उडूं लागले. मांडीचा पेलान् पेला दिसूं लागला. अगदीं मोजून घ्यावा असा. आणि पुराच्या पाण्यांत लव्हाळीं बुडावीं तसे त्याचे नाकडोळे वर आलेल्या गालांत बुडाले. चालतांना कांखा छातीला लागेनाश्या झाल्या. तेल खाऊन खाऊन चमचमणाऱ्या एखाद्या प्रचंड शिसवीच्या खांबासारखा दत्तु पैलवान धिप्पाड आणि तेजःपुंज दिसूं लागला.

सकाळच्या वेळीं गांवांतल्या सगळ्या देवाना दंडवत घालून दत्तु परत यई. संध्याकाळीं नदीवर जातांना तो कणकेचा गोळा घेऊन जाई. डोहापाशीं बसून माशांना खाऊं घाली. जातायेतां गाईच्या शेपटाला तीनतीनदां हात लावून नमस्कार करी. अशा वेळीं कुणी ना कुणी तरी त्याला भेटतच असे. दत्तु त्याला मान वांकवून, हात जोडून नमस्कार करी, 'रामराम हो.'

'रामराम.'

असें म्हणून जाणारायेणारा त्याच्या भव्य देहाकडे कौतुकानें बघत उभा राही.

'काय दत्तु ?'

दत्तु नम्रतेनें उत्तर देई, 'बरं हाये कीं.'

'कुटपर्यंत आली गाडी ?'

'चालूं हाये.'

'जितली पायजे बरं का. गांवाचं नाक वर ऱ्हायलं पायजे.'

'तुमचा आशीर्वाद आसूं द्या म्हंजे झालं. मग बघा.'

'आरं, आमचा कसला आलाय आशीर्वाद ?'

'आसं कसं ? तुमी देणार म्हणून तर मी करणार. तुमी न्हाई म्हणाला आसतां तर मी कुठं गेलो आसतो ?'

दत्तूचें हें आर्जवी बोलणें ऐकणाराला फार आवडत असे. मान हलवून तो मनाशीं म्हणत असे, 'बायली, ह्ये पोरगं सुधरलं बरं का. आतां आशीच हयेची बुद्धि ऱ्हायली म्हंजे झालं.'

दोन अडीच महिने असे गेले. हां हां म्हणतां उलटले. कुस्ती दोन दिवसांवर आली तेव्हां दत्तु सबंध गांवांत फिरला. पुन्हां ज्याच्या त्याच्या पाया पडला. सगळ्यांची शाबासकी बरोबर घेऊन तो सगळीं देवळं हिंडला. एकूण एक दैवतं पुजलीं. मग वस्तादाबरोबर तो सोनगांवला गेला. बरोबर तालमींतलीं दहावीस पोरं गेलीं. गांवांतले दहापांच हौशी लोकहि ही कुस्ती बघायला गाड्या करून सोनगांवला गेले.

सोनगांवला कुस्तीची दंगल जोरांत उसळली होती. वाळूच्या ढिगाभोंवतालीं शेंकडों लोकांची गर्दी झाली होती. पाठीमागचे लोक माना उंच करकरून डोकावत होते. कांहीं माणसें जवळपासच्या लिंबाच्या फांट्यांवर आरामशीर बसलीं होतीं. पैलवान एकमेकाशीं भिडत होते, भुजा थोपटत होते; आणि वाळूंतून विजेसारखे फिरत होते. वाळू उडत होती, पंच मंडळी वांकवांकून बघत होती आणि लोकांचा आरडाओरडा वाढत होता.

पहिल्यांदां लहानसहान कुस्त्या झाल्या आणि मग देशमुखाचा गोरापान पोऱ्या उड्या मारीत रंगणांत आला. भुजा मारीत उभा राहिला.

दत्तूनेंहि मग लंगोट उगीचच आवळला, धूळ भरली आणि भुजा ठोकीत त्यानेंहि रंगणांत उडी घेतली.

आपापले दंड थोपटीत दोघेहि पैलवान समोरासमोर उभे राहिले.

एका हातानें खालची वाळू उचलून दोघांनीहि हाताला हात लावून सलामी दिली. मग मांड्यावर दोन्ही हात ठेवून दोघेहि वांकून एकमेकाकडे बघत थांबले. दुसरा काय पवित्रा घेतो याचा अदमास घेत थांबले. दत्तूनें हाताचा पहिला झटका देशमुखाच्या गर्दनवर टाकला पण त्यानेंहि तितक्याच चपळाईनें तो झिडकारला. मग त्यानें दत्तूच्या मांड्यांत घूस मारून बघितली. पण दत्तूनें बाजूला उडी घेऊन ती चुकवली. चार दोन हात उगीचच असे झाले आणि मग खऱ्या कुस्तीला झपाट्यानें तोंड लागलें.

नाहीं म्हटलें तरी देशमुखाचा पठ्ठ्या मुरलेला गडी होता. त्यानें फड बघितले होते. त्याच्या अंगांत रेड्यासारखी रग होती. उलट दत्तु मोठ्या फडाला नवीन होता. पण त्यानेंहि ताकद सपाटून मिळवली होती. राक्षसा-सारखी मेहनत केली होती, आणि दांतओठ खाऊन लढती खेळल्या होत्या. दोन अडीच महिने याच इर्षेनें त्याचें डोकें भरून गेलें होतें. त्यामुळें तोहि सावध होता. मनाशीं कांहीं आडाखे बांधून खेळत होता. आपला गडी खालीं गेला कीं भारी होतो, घोरपडीप्रमाणें भुईला चिटकून राहतो, हा त्याचा लौकिक त्याला माहीत होता. त्यामुळें तो पहिल्यापासून हुश्शार राहिला. देशमुखाच्या पोराला खालीं जाऊं न देतां वर घेतला कीं आपलें काम निम्में झालें हें त्यानें ओळखलें. आणि म्हणून त्यानें दत्तूला बाहेरून टांग बसवली तेव्हां दत्तूननें आपणहून तोल जाऊं दिला आणि स्वतःला खालीं घेतलें. देशमुखाला खुशाल अंगावर घेतला. त्याचा हा डाव विरुद्ध गड्याला कळला नाहीं. वर आल्या आल्या त्यानें दत्तूला वेशक कमरखोडा घातला आणि सवारी भरली. दामटून दामटून त्याचा कीस काढला; दत्तूनें बराच वेळ हा प्रकार चालूं दिला आपल्या गड्याची आतां दमछाक व्हायची वेळ आली हें बघि-तल्यावर त्यानें मग आपला एक हात उलटा करून त्याच्या लंगोटाला धरला. दुसऱ्या हातानें त्याचा हात पिरगाळून खालीं आपल्या छातीशीं घेतला आणि अंगांत असेल नसेल तेवढें बळ एकवटून असा झटका ठेवून दिला कीं देश-मुखाचा पठ्ठ्या उलटा होऊन उडाला आणि धाड्दिशीं पाठीवर आदळला!——

आणि दत्तूनें कुस्ती मारली !

काय झालें हें लोकांना क्षणभर कळलेंच नाहीं. पण दुसऱ्याच क्षणीं त्यांना दिसलें कीं, सोनगांवचा पोरगा पाठ लावून जमिनीवर आदळला आणि दत्तूनें त्याला चीतपट मारला !

त्याबरोबर सगळीकडे एकदम आरडाओरड़ा झाला. लोकांच्या शिट्ट्यांनीं, आरोळ्यांनी वातावरण दुमदुमून गेलें. पांचपंचवीस पटके हवेंत वर उडाले. जिकडे तिकडे उगीचच घुसाघुशी झाली.

आपला प्रतिस्पर्धी पाठ लावून लोळल्याबरोबर दत्तूनें टाणकन् वर उडी मारली. दोन्हीं हात वर करून तो नाचत नाचत ओरडला, 'देगांव गवळा तालीम की दो चारो धीन् !'

मग धांवत धांवत जाऊन गडबडीनें डोक्याला पटका गुंडाळून, पटक्याचा अर्धा सोगा भुईवरून तसाच फरफटत नेत तो वस्तादाच्या पायां पडला. पंचमंडळाच्या पायां पडला. गांवांतल्या मोठ्या माणसांच्या पायावर त्यानें भराभर डोकें ठेवलें.

वस्तादानें त्याची पाठ थोपडली. तोहि ओरडला,

'भले पठ्ठे ! गवळी तालमीचं नांव राखलंस–'

तेवढ्यांत दत्तूला लोकांनी उचललेंच. खांद्यावर बसवून आरडाओरडा करीत मिरवत नेलें. मारुतीला, गणपतीला सगळ्या देवांना दंडवत घालायला नेलें.

गांवीं परत आल्यावरहि दत्तु गांवांतल्या सगळ्या देवतांच्या पाया पडून आला. वडीलधाऱ्या माणसांना भेटून पुन्हां त्यांच्या पायावर त्यानें डोई ठेवली. मग लोक फार खुष झाले. म्हणाले, 'ढोबळ्यानं नांव राखलं गांवाचं. समदीकडं कमान उंच केली.'

'गडी आतां जिल्ह्यांत वाड झाला.'

'म्होरल्या सालाला पंजाब्याशीं खेळाला पायजे पठ्ठ्या.'

कुस्तीचा रंग संपला आणि आठपंधरा दिवस गेले. महिना गेला. दत्तूची मेहनत हळुहळू कमी झाली. गडी पुन्हां उतरला. त्याची इरेसरी गेली आणि डोकें पुन्हां रिकामें झालें. पण तरी एक अक्षर कुणाला वावगें बोलला नाहीं. आपणहून त्यानें कुणाची खोडी काढली नाहीं आणि शिवीगाळहि

केली नाहीं. भेटेल त्याच्याशीं तो गरिबीनें बोलला, आदबीनें वागला. गंभीरपणानें वागूं लागला.

लोकांना फार आनंद झाला. कांहींजण तर वस्तादाला म्हणालेच, 'पोरगं आसंच ऱ्हायलं तर चागलं सुधरेल, म्होरं यील.'

पण गंमत अशी कीं दत्तु म्होरं आला नाहीं आणि सुधारलाहि नाहीं. महिनादोनमहिन्यांतच तो खंगल्यासारखा दिसूं लागला. त्याची छाती, गर्दन उतरली. गाल किंचित आंत गेल्यासारखे दिसूं लागले. तोंड निस्तेज वाटूं लागलें. दत्तु चांगलाच वाळला.

पुढल्या वर्षीं दत्तूला पंजाब्याची जोड द्यायची असा विचार वस्ताद करीत होता त्या दृष्टीनें दत्तूवर तो नजर ठेवून होता. पण दिवसेंदिवस दत्तू चोपल्यासारखा दिसूं लागला. तेव्हां तो मनांत चरकला. काय झालें काय या गड्याला ? दोनतीन महिन्यांतच हा इतका हडकला कसा ? कांहीं भूतबाधा तर झाली नाहीं ?

बरेच दिवस बघितलें. शेवटीं वस्ताद उठला आणि दत्तूकडे गेला म्हणाला, 'दत्तु, गाढवा, आजारी बिजारी हायेस काय ?'

'न्हाईबा.' दत्तूनें मान हलवली.

'लेका, मग एवढा खराब कशानं झालास ?'

या प्रश्नाला दत्तूनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. मान खाली घालून तो गप्प बसून राहिला.

तें बघून वस्तादाला निराळाच संशय आला. दत्तूचा खांदा घुसळून तो कर्कश सुरांत म्हणाला,

'बाईबिई गांठ पडल्याली दिसती. आतां आलं माझ्या ध्यानांत.'

दत्तु शरमेनें लालबुंद झाला. नकारार्थी मान हलवून तीव्रपणाने तो बोलला, 'छयाः छयाः! आसली गोष्ट आजून माझ्या मनांतसुदिक आली न्हाई.'

मग वस्ताद विचारांत पडला.

'बरं भूतबाधा तर झाली न्हाई मग ?'

'न्हाई.'

दत्तूनें याहि प्रश्नाला नकारार्थी उत्तर दिलें तेव्हां वस्तादाला काहीं कळेनासें झालें. त्यानें नाना परीनें कारणें सांगितलीं आणि दत्तूनें तीं उडवून

लावलीं. शेवटीं वस्तादाचें डोकें अगदीं गोंधळून गेलें.

'मग गड्या, तुला झालं काय ? आतां तूं तरी सांग.'

'सांगू ?'

'सांग.'

'डोस्कं तापिवणार न्हाई ?

'न्हाई.'

वस्तादानें अशी खात्री दिली, रागावणार नाहीं असें आश्वासन दिलें तेव्हां दत्तूची कळी खुलली. बऱ्याच दिवसांनी त्यानें चेहरा हंसरा केला. मग पुन्हां गंभीर होऊन तो हळू आवाजांत म्हणाला, 'मला आसं मुकाट्यानं ऱ्हावत न्हाई .सारखी कुणाशीतरी दंगामस्ती करूं वाटती. फाडफाड काय तरी बोलावं वाटतं !'

'बरं मग ?' वस्ताद चकित झाला.

'तुमी तर म्हनतां कीं गाववाल्यांशीं गरिबीनं वागत जा. कुनाशीं भांटणतंटा करूं नगंस—'

'व्हय—'

'त्येनंच मला काय गोड वाटत न्हाई. करमत न्हाई. सारखं रगात तापतं. पन तुमाला भिऊन गप्प बसतों. जिवाला खातों.'

'म्हणून लेका खराब झालास ?'

'व्हय.'

'हात् तुझी केला !'

थोडा वेळ कुणीच कांहीं बोललं नाहीं. मग दत्तूनं एकाएकीं रडकुंडीला येऊन विचारलं, 'मी गांव सोडूं का ? मला हितं आतां ऱ्हावत न्हाई.'

दत्तूचा हा प्रश्न ऐकून वस्ताद थोडा वेळ गप्प बसला. कांहीं बोलला नाहीं. दत्तूकडं बघत बघत त्यानें कपाळाला आंठ्या घालून विचार केला. मग एकाएकीं दत्तूच्या पाठीवर थाप टाकीत तो म्हणाला, 'शाबास ! खरा पैलवान हायेस ! हें बग, बेशक तुला कसं करायचं तें कर. हान् गाडी ! हूं जाऊं दे च्या मायला. पुढची कुस्ती ठरल्यावर बघतां येईल त्यावेळचं त्यावेळीं.'

****

## ८ : भामटा

गुजराच्या वाड्यांत जिकडे तिकडे गडबड–गोंधळ चालला होता. माणसें येत होतीं, जात होतीं. कुणी मधल्या दिवाणखान्यांत बसून लोडाला रेलले होते. डोळे मिटून जेवणाच्या बोलावण्याची वाट पहात होते. कुणी अंगांतले कपडे बिपडे काढून प्रशस्त बसले होते. एकमेकांशीं गप्पा मारीत होते. जेवायच्या आधींच पानतंबाखूचा एक हप्ता रिचवीत होते. तबकांत देठांचा सडा पडला होता. हवेंत सिगारेटचा धूर पसरत होता आणि माफक हंशाचे फवारे मधून मधून उडत होते

दिवाणखान्याबाहेरच्या प्रशस्त जागेंत पंक्ती वाढल्या होत्या. आचारी-वाढपी भराभरा पानें वाढून पूर्ण करीत होते. नौकरांची धांवपळ उगीचच चालू होती. पानाभोंवतीं सुंदर रांगोळ्या काढल्या होत्या आणि उदबत्त्यांचा, पक्वान्नांचा, वाळ्याच्या पाण्याचा, सुरेख वास सगळीकडे पसरला होता. आलेल्या मंडळींच्या जिभा ओल्या करीत होता.

लग्नाची पंगत म्हणजे उशीर हा ठरलेलाच. पण आज नेहमींपेक्षां बराच उशीर झाला. टळटळीत दुपार झाली. एक वाजून गेला. बाहेरच्या कडक उन्हाकड नुसतें पाहिलें तरी डोळ्यांना त्रास होऊं लागला. उकाड्यानें माणसें नुसतीं शिजून निघालीं. हाशहुश करून वेळ काढूं लागलीं. आतां केव्हां एकदां बोलावणें येतें आणि केव्हां आपण पानावर बसतों, असें सगळ्यांना होऊन गेलें.

पण त्यांना फार वेळ वाट पहावी लागली नाहीं.

तेवढ्यांत यजमान बाहेर आलेच. हात जोडून सगळ्यांना नम्रपणें म्हणाले,

'चला मंडळी, झालंय सगळं, उठा.'

'कपडे काढायचे का?'

'अगदीं'

मग मंडळी भराभर उठली. कपडे आधींच काढून ठेवलेली मंडळी पाय धुवायला गेली. भराभरा पानावर बसली. बाकीचे लोक कपडे काढून त्यांच्या मागोमाग आलेच. पुन्हां थोडीशी गडबड, धांदल झाली आणि मग सगळेच पानावर बसले. दिवाणखान्यांत कोणीहि राहिलें नाहीं.

यजमान हातानं चुटकी वाजवून गडबड करीत म्हणाले,

'हं, सुरुवात करायची. थांबायचं कारण नाहीं.'

त्याबरोबर जेवायला सुरुवात झाली. भुकेलेली सगळी मंडळी माना खालीं घालून, मन लावून जेवूं लागली आणि एकदोन मिनिटांतच तेथें विलक्षण शांतता पसरली. वाढणाऱ्यांच्या बोलण्याशिवाय कुणाचाहि आवाज तेथें ऐकूं येईनासा झाला.

वाड्यांत हा कार्यक्रम चालू होता आणि बाहेर ऊन रणरणत होतें. वारें अजिबात नव्हतें. लांबवर रस्त्यांत एकहि माणूस दिसत नव्हतें. सगळीकडे सुन्न, निःस्तब्ध वातावरण पसरलें होतें.

आणि आंब्याच्या झाडावर एका फांदीला रेलून संभू निवांत पसरला होता. डोळे मिटून पडला होता. अधूनमधून डोळे उघडून कान टवकारत होता.

वाड्यांतला आरडाओरडा, हंशा, गोंधळ एकदम थांबला आणि सगळीकडे गप्पगार झालें. त्याबरोबर संभूनें टक्कन् डोळे उघडले. मोठ्या चपळाईनें तो उठून बसला. पुन्हां एकदां कानोसा घेऊन त्यानें नीट अदमास घेतला. आस्सं? गप्पागोष्टी, गोंधळ संपलेला दिसतो. म्हणजे मंडळी जेवायला बसली तर. आतां चांगला आडवा हात मारीत असतील. मग बाहेर दिवाणखान्यांत यांपैकीं कोण असणार? तो मोकळाच असेल. सगळे नोकर-चाकरहि जेवणाच्या पंक्तीकडेच कामाला असतील. काय पाहिजे नको तें बघत असतील. त्यांचें तरी आतां बाहेर लक्ष कुठून असणार? जमली वेळ बरोबर. आतां असेंच घुसून काम सफाईनें साधलें पाहिजे म्हणजे, कसलाहि धोका नाहीं...

संभूनें पटदिशीं झाडावरून खालीं उडी घेतली. आपले कपड नीटनेटके केले. टोपी व्यवस्थित बसवली. मग संथपणें चालत बेफिकीर मुद्रेनें तो वाड्यापाशीं आला. सरळ आंत शिरून दिवाणखान्यांत जाऊन पोंचला. त्याच्या त्या संथ चालण्याकडे आणि ऐटदार पोषाखाकडे कुणी पाहिलें असतें तर कुणाचीहि समजूत झाली असती कीं, हा कुणी निमंत्रण दिलेला प्रतिष्ठित पाहुणाच आहे. कामामुळें याला यायला जरा उशीर झाला असावा इतकेंच. मग त्याच्याकडे कोणाचें लक्ष जाणार ?

दिवाणखान्यांत शिरून संभू खालीं बैठकीवर बसला समोरच्या तबकांतलें पानसुपारीचें साहित्य त्यानें ओढून घेतलें. विडी तोंडांत टाकून तंबाखूची चिमटहि वर सोडली आणि सबंध दिवाणखान्यांत इकडे तिकडे शोधक दृष्टी टाकली.

जिकडे तिकड खुंटीला कपडे लटकविलेले होते. कुणाचे कोट होते, सदरे होते, जाकिटें होतीं. रुमाल, टोप्या होत्या. प्रत्येक खुंटी निरनिराळ्या प्रकारच्या कपड्यांनीं गच्च भरलेली होती. साधण्यासारखा लाट दिसत होता.

संभूनें पान खाल्लें न खाल्लें तेवढ्यांत एक नोकर घाईघाईनें एका खोलींतून बाहेर आला. मंडळी जेवायला बसली होती तिकडे लगबगीनें निघाला. त्याच्या हातांत कांहींतरी होतें.

तक्याला टेकून कुणीतरी बसून राहिलें आहे हें पाहिल्यावर तो एकदम थबकला. म्हणाला,

'अहो, मंडळी बसली ना जेवायला. चला उठा.'

'संभू शांतपणें मान हलवून म्हणाला,

'छेः छेः ! मी नाहीं इतक्यांत, मागाहून.'

'अहो, पानं आहेत अजून—'

'अरे, वेडा का काय तूं?' संभूने किंचित् रागावल्यासारखें केलें. 'पाहुणे मंडळी आधीं, घरचीं माणसं मागाहून.'

'बरं बरं.'

असें म्हणून तो नोकर घाईघाईनें दिवाणखान्यांतून बाहेर पडला.

तो गेल्याबरोबर संभू ताडकन् उठला. इकडे तिकडे पाहून त्यानें क्षणभर कानोसा घेतला. आतां कांहीं धोका नाहीं याची खात्री करून

घेतली. मग त्यानें झटक्यानें खालची एक चादर ओढून घेऊन पसरली. खुंटीवरचे कपडे नीट लक्षपूर्वक पाहिले आणि एकेक काढून त्यांची पद्धतशीर घडी केली. चादरीवर ठेवली. एकामागून एक अशा सगळ्या खुंट्या रिकाम्या केल्या.

दहापांच मिनिटांत सगळा दिवाणखाना स्वच्छ झाला. एकाहि खुंटीवर कपडा राहिला नाहीं.

चादरीवर घड्या घातलेल्या कपड्यांचा ढीग झाला. संभूनें सगळे कपडे नीटनेटके बसविले. चादर दोन्ही बाजूंनीं वर घेऊन गांठी मारल्या. त्या पक्क्या आहेत कीं नाहींत हें नीट ओढून पाहिलें. मग गांठोडें शिस्तींत हातांत धरून स्वारी बाहेर पडली वाड्याबाहेर येऊन तो वळला आणि दिसेनासा झाला.

सबंध वाड्यांत कुणाला पत्ता लागला नाहीं.

आणखी अर्धापाऊण तास गेला आणि मग जेवणखाण संपलें. पंक्ती उठल्या. माणसें भराभर उठलीं आणि हात धुवायला गेलीं. थोडा वेळ परत गजबज गजबज उडाली. नोकर लोकांची धांवपळ झाली आणि अखेरीला हात धुवून मंडळी ओले हात टॉवेलाला पुशीत, भरल्या पोटावरून प्रेमानें हात फिरवीत, सुस्त डोळ्यांनीं ढेकर देत दिवाणखान्यांत येऊन पोंचली.

आंत आल्याबरोबर त्यांना जरा चमत्कारिक वाटलें. एकजण जरा गोंधळला. चमत्कारिक तोंड करून दुसऱ्याला म्हणाला,

'बंडोबा मला वाटतं आपण जागा चुकलों.'

बंडोबा, ढेकर देण्यांत मग्न झाले होते. त्यामुळें त्यांना थोडेंसें अर्धवट ऐकूं आलें. घाईघाईनें मान हलवून ते म्हणाले,

'खरंच, चुकलं आपलं तात्या. सकाळीं खाऊन यायला नको होतं आपण—'

'म्हणजे ?'

'म्हणजे काय ? अरे, जेवण काय फस्स्कलास झालं होतं आज ! आहा ! सकाळीं खाल्लं नसतं ना, तर मरस्तंवर जेवलों असतों बुवा आपण.' बंडोबाचें हें बोलणें ऐकून तात्यानें वाकडें तोंड केलें.

'अहो, तें नाहीं म्हणत मी.'

'मग ?'

'अहो, कपडे कुठायत आपले ?'

'हे काय या खुंटीवर--'

असें म्हणून बंडोबांनीं हात वर करून खुंटीकडे बोट केलें.

पण खुंटी रिकामी होती. पलीकडची रिकामी होती आणि त्याहि पलीकडची मोकळीच होती. दिवाणखान्यांतल्या एकूण एक खुंट्या पूर्णपणें रिकाम्या होत्या. कुठेंहि एकसुद्धां कपडा दिसत नव्हता. बंडोबांनीं डोळे चोळले. पुन्हां मिटले आणि पुन्हां उघडले. मग म्हटलें,

'अरेच्या ! कपडे कुठं आहेत बुवा आपले ?'

'तेंच विचारतोंय मी—'

बाळू वाणी त्यांच्या तोंडाकडे पहात उभा राहिला. तो म्हणाला,

'मला वाटतं, आपण जागा चुकलों नक्की.'

'छट--'

'कशावरनं नाहीं म्हणतां ?'

'अहो, इथंच बसलों होतों ना मी. हे बघा फोटो. हेच होते मघाशीं. हा भिंतीचा गिलावा उडालेला.'

मंडळींनीं सबंध दिवाणखान्याची कसोशीनें पहाणी केली आणि त्यांची खात्री पटली कीं मघाशीं आपण याच दिवाणखान्यांत बसलों होतों. जेवायला बोलावण्याची वाट पहात याच ठिकाणीं थांबलों होतों. याच ठिकाणीं आपण कपडे काढले होते आणि याच खुंट्यांना अडकावले होते. अजून ही खोली आहे अशीच आहे. फक्त कपडा मात्र एकाचाहि जाग्यावर नाहीं. म्हणजे ? हा काय प्रकार आहे ? सगळ्यांचे कपडे एकदम गेले तरी कोठें ?

क्षणभर सगळेच गोंधळांत पडले. एकमेकांकडे वेड्यासारखे पहात उभे राहिले. मग कुळकर्णी वकिलांनीं एकदम मोठ्यांदा हांक मारली,

'मोतीभाई, अहो मोतीभाई !'

घराचे यजमान मोतीभाई हे अजून आंत होते. पानसुपारीच्या गोष्टीकडे लक्ष पुरवीत होते. त्यांच्या नांवानें आरडाओरड झाली तेव्हां ते लगबगीनें आले. आश्चर्यानें म्हणाले,

'काहो वकीलसाहेब, काय झालं ?

'जरा इकडं या.'

'पानसुपारी ना ? झालं, आणलींच तबकं भरून.'

'पानसुपारी राहूं द्या बाजूला. आम्हीं मघाशीं कुठं बसलों होतों तें सांगा आधीं.'

मोतीभाई गोंधळांत पडून म्हणाले,

'इथंच.'

'मग कपडे कुठाहेत आमचे ?'

'कपडे ?--'

असें म्हणून मोतीभाईंनीं खुंटचांकडे नजर टाकली. पण त्यांना सगळचा खुंटचा रिकाम्या दिसल्या. एकाहि खुंटीवर एकहि कपडा आढळला नाहीं. चकित होऊन त्यांनीं पुन्हां तोच प्रश्न विचारला,

'म्हणजे ? अहो, कपडे कुठाहेत तुमचे ?'

'भले ! आम्हीं तुम्हांला विचारतों अन् तुम्हीं आम्हांला विचारा.'

'मग काय भुताटकी झाली कीं काय ?'

'का भानामती-चेटुक केलं कुणी ?'

असा संवाद झाला आणि सगळीकडे नुसता गोंधळ उडाला. जो तो घाबरून गोंधळून एकमेकाकडे पहात उभा राहिला. नुसती धोतर नेसलेली ही सगळी मंडळी उघडचाबंब अंगांनीं वेडचासारखी एकमेकाकडे पहात उभी राहिली. आणि सबंध वाडचांत आरडाओरडा झाला कीं, पाहुण्या मंडळींचे कपडे एकाएकीं दिवाणखान्यांतून नाहींसे झाले. एकाचाहि कपडा जाग्यावर नाहीं. कुणाचा कोट, कुणाचे रुमाल, कुणाचीं जाकिटें, सदरे, टोप्या सगळेंच अदृश्य झालें.

मग मोतीभाईंच्या एका नोकराच्या डोक्यांत आलें. मघाशीं आपण कोठींतून साखर काढून नेत होतों त्यावेळीं कुणीतरी गृहस्थ या ठिकाणीं बसला होता खरा; आपण त्याला जेवायला चला म्हटलें पण तो आला नाहीं. मागाहून बसेन म्हणाला. तो कोण होता ? त्यानेंच तर कांहीं हा उद्योग केला नसेल ?

शंका आल्याबरोबर त्यानें ही हकीकत शेठजींना सांगितली. म्हणाला,

'मी त्यांना हांका मारल्या. पण ते म्हणाले- 'पाहुणे मंडळी आधीं. घरचीं माणसं मागाहून.'

'मग मी कांहीं विचारलं नाहीं. मला वाटलं—'

'घरचीं माणसं ?' शेठजींनीं मान हलवली.

'छट ! घरचं एक माणूस राहिलं नाहीं माझं मागें.'

'पण तो म्हणाला खरा तसं. मी कांहीं मग पुन्हां इकडं बघितलं नाहीं.'

'शाब्बास !'

शेठजी आणि त्यांचा नौकर यांच्यांतील हा संवाद सगळ्यांना ऐकूं गेला आणि बरेचजण मटकन खालीं बसले. इतका वेळ असें वाटत होतें कीं कांहीं गडबड–गोंधळ झाला असेल. इकडचे कपडे तिकडे नेऊन कुणीतरी टाकले असतील, कदाचित कोणी थट्टा केली असेल, आणि थोड्या वेळानें आपले कपडे आपल्याला परत मिळतील. पण आत्तांचा प्रकार ऐकल्या-बरोबर सगळ्यांची खात्रीच पटली कीं हा तशांतला कांहीं प्रकार नव्हे. कुणीतरी सराईत भामटा इथें आला असला पाहिजे आणि त्यानें हा डल्ला मारला असला पाहिजे. आतां आपलीं वस्त्रें आपल्याला परत मिळणें कठीण.

हा निष्कर्ष ध्यानांत आल्यावर अनेक लोक खरोखरीच खालीं बसले. कांहींच्या चेहऱ्यावर पांढरा रंग आला. कांहीं जणांचे हातपाय स्थिर न राहतां एकसारखे हलूं लागले. आणि कांहीं जणांनीं आपलें तोंड जें नकळत उघडलें तें मिटवलेंच नाहीं.

वकील साहेब घाबरून म्हणाले,

'अहो, माझा नवा कोट चांगला. त्यांत पैशाचं पाकीट तसंच.'

बाळू वाणी ततपप करीत बोलला,

'म–माझ्या जाकिटांत घ–घड्याळ—'

'अन् माझा जरीचा रुमाल होता हो !'

'मला घालायला दुसरा सदरा नाहीं.'

सगळेच घाबरून गेले. कुणाचा एकुलता एक सदरा गेला होता, कुणाचा कोट आणि त्यांतलें पाकीट गेलें होतें, कुणाच्या जाकिटांत चांगलें शेड्याचें घड्याळ होतें. एक ना दोन गोष्टी. सगळ्यांनाच जबरदस्त टोला बसला होता. हा प्रकार दिवसाढवळ्या केला तरी कुणी ? इतका धाडसी माणूस कोण असेल ?

तेवढ्यांत शेटजींच्या डोक्यांत एकदम प्रकाश पडला. ते हातपाय आपटून मोठ्यांदा ओरडले.

‘आत्तां आलं ध्यानांत. नक्कीच तो संभ्या भामटा असला पाहिजे.’

आणि त्यांनीं पुन्हां त्या नोकराला हांक मारली, त्या मघांच्या माणसाचें वर्णन विचारलें.

नोकर म्हणाला.

‘चांगले कपडे होते अंगावर. डोक्याला टोपी होती पांढरी. गोरापान, नाकेला आणि शिडशिडीत अंगाचा होता,’

‘मग तोच तो. संभ्याच लेकाचा.’

कांहीं लोकांना संभ्या भामट्याचें नांव ऐकून माहीत होतें. हा मोठा हुपार भामटा आहे. मोठ्या सफाईनें चोऱ्या करतो आणि कुणाला न सांपडतां निसटतो, हा त्याचा लौकिक त्यांना माहीत होता. आतां त्यानेंच हा उद्योग केला असेल तर मग प्रश्नच मिटला. आपले कपडें मिळण्याची या जन्मांत तरी आशा नाहीं. एकजण तसें शेटजींना म्हणालाहि. पण त्याबरोबर शेटजी संतापानें लाल होऊन म्हणले,

‘मिळत नाहींत म्हणजे? मिळालेच पाहिजेत. संभ्या असा कोण लागून गेला? त्याची पाळंमुळं खणून काढतों. थांबा.’

‘पण काय करणार काय तुम्हीं?’

‘काय करणार? आत्तांच्या आत्तां पोलिसांना बोलावीन. माझी चेष्टा करतो काय?’

‘पण पोलिस तरी आतां काय करणार? तो सांपडला तर पाहिजे!’

‘माझा हिसका त्याला अजून माहीत नाहीं. मग पायां पडत येईल.’

‘शेठजींच्या एकंदर बोलण्यावरून सगळ्यांची खात्री पटली कीं शेटजी संभ्याला चांगला हिसका दाखवल्याशिवाय राहणार नाहींत. शेटजी तसे हार जाणार नाहींत. आपल्या घरांत हा उद्योग केल्याबद्दल त्याला ते चांगलीच अद्दल घडवल्यावांचून सोडणार नाहींत. घडवतील तेव्हां घडवतील, पण सध्यां तरी आपले कपडे गेले एवढें खरें.

लोक असा विचार करीत थांबले, शेठजींकडे बघत राहिले आणि एवढ्यांत एक मोठा चमत्कार घडला!

समोरच्या दारांतून कपड्यांचें गांठोडें घेऊन संभू भामटा संथपणें आंत आला. गांठोडें खालीं ठेऊन मुकाट्यानें उभा राहिला.

त्याला पाहिल्याबरोबर तो मघांचा नोकर एकदम ओरडला,

'हाच तो. हाच तो मघांचा माणूस!'

त्याबरोबर सगळ्यांचें त्याच्याकडे लक्ष गेलें. पांढरे स्वच्छ कपडे, पांढरी टोपी, गोरापान रंग, सरळ नाक आणि किडकिडीत शरीरयष्टि.

सगळ्यांची पाहिल्याबरोबर खात्री पटली कीं मघाशीं सांगितलेला हाच तो इसम–संभ्या भामटा. सफाईनें उचलेगिरी करून लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकण्यांत पटाईत असलेली हीच ती स्वारी.

पण हा इथें कसा आला परत? शेटजींच्या दमदाटीला भिऊन कपडे परत करायला तर आला नाहीं? पण इतक्यांतच त्याला तें बोलणें समजलें कसें?

कुणाला कांहीं कळेना. सगळे थक्क होऊन त्याच्याकडे पहात राहिले.

मग मोतीभाईशेठजी पुढें सरसावले. त्याला पायापासून वरपर्यंत एकदां नीट न्याहळून म्हणाले,

'कोण रे तूं?'

संभू गालांतल्या गालांत हंसत म्हणाला,

'मी? संभू.'

'म्हणजे संभू भामटा तो तूंच ना?'

'मीच तो.'

त्याच्या या स्पष्ट खुलाशानें सगळे हादरले. शेटजीहि गोंधळले. आतां काय बोलावें हें त्यांनाहि कळेना.

थोड्या वेळानें रागावून त्यांनीं विचारलें.

'इथले कपडे कुणी नेले?'

'मीच.' संभूनें मान हालवली.

'कुठं आहेत ते?'

संभूनें गांठोड्याकडे बोट केलें. 'हे काय यांत आहेत!'

हें ऐकल्यावर सगळीकडे एकदम समाधानाची लाट पसरली. आपले गेलेले कपडे परत द्यायलाच तर हा आला नाहीं?

मग धिप्पाड अंगाचा बाळू वाणी पुढें सरसावला. कर्कश आवाजांत त्यानें विचारलें,

'कशासाठीं रे नेले होतेस आमचे कपडे ?'

संभू त्याच्या डोळ्याला डोळा लावून शांतपणें म्हणाला,

'उगी म्हटलं गंमत करावी तुमची. जरा माझं कसब दाखवावं. बाकी कांहीं नाहीं !'

संभूनें दिलेलें हें उत्तर ऐकून सगळ्यांचा जीव खालीं पडला. लोक असेंच समजत होते कीं, आपले कपडे गेले ते गेलेच; आतां ते परत मिळायची कांहींहि आशा नाहीं. आणि लोकांना हातोहात फसविण्यांत पटाईत असलेल्या संभ्या भामटयाचें नांव ऐकल्यावर तर त्यांनीं सगळी आशाच सोडून दिली होती. पण संभूच्या बोलण्यावरून त्यांना कळालें कीं असें कांहीं नव्हतें. आपल्या अंगांतलें कसब दाखवावें एवढाच त्याचा हेतू होता. प्रत्यक्ष उचलेगिरी करून लोकांचें नुकसान करावें असें कांहीं त्याच्या मनांत नव्हतें.

मग सगळेच खूष झाले. जिकडेतिकडे आनंदीआनंद पसरला. लोक हळूहळू हंसूं लागले. त्यांचें हंसणें पाहून संभूलाहि हंसूं येऊं लागलें. सगळेच थोडा वेळ झालेल्या गमतीबद्दल हंसत राहिले.

हंसतां हंसतां संभू म्हणाला,

'बघितलंत ना माझं कसब ? सांगा किती सफाईनं काम केलं असेल मी ? बोला.'

शेटजी हंसस हंसत म्हणाले,

'खरंच संभ्या, तूं मोठाच कसबी माणूस आहेस. इथं कुणाला पत्ता नाहीं लागला–'

'पत्ता कसा लागेल ? ती तर आमच्या धंद्याची खुबी आहे.'

'कमाल आहे बुवा !'

'संभू म्हणजे काय ! पहिल्यापासून नामांकित. सगळ्या भामटयांत त्याचं नांव आहे तें काय उगीच ?'

'आहे खरी मूर्ति अशी.'

'शाबास पठ्ठे ! भले बहाद्दर !'

लोकांनीं संभूच्या सफाईबद्दल फारच वाखाणणी केली. त्याच्यावर

स्तुतीचा भडिमार केला, तेव्हां संभूला अगदीं संकोचल्यासारखें झालें गोरा-मोरा होऊन, मान खालीं घालून तो गप्प उभा राहिला.

मग वकीलसाहेब पुढें सरसावले. त्यांनीं संभूच्या पाठीवर शाबासकीची थाप मारली. त्यांना तर संभूच्या कौशल्याचें फारच आश्चर्य वाटलें होतें. हंसतां हंसतां ते म्हणाले,

'गड्या कमाल आहे हां तुझी. अरे, हें सगळं केलंस तरी कसं ?'

आपल्या कौशल्याचा हा प्रश्न निघाल्याबरोबर संभूचा संकोच नाहींसा झाला. झट्दिशीं मान वर करून तो म्हणाला,

'अहो, भामटेगिरी हेंसुद्धां एक शास्त्र आहे.'

'आहे खरं बुवा. बेमालून काम अगदीं.' वकीलसाहेबांनीं मान डोलावली.

'पहिल्यांदां मी इथली माहिती काढली. शेटजींच्या घरीं मंडळी जेवायला येणार आहेत हें कळल्यावर सगळा तपास काढला. म्हटलं, इतकी मंडळी येणार निरनिराळी, यांना सगळ्यांनाच गंमत दाखवली एकदम तर मजा येईल—'

'वा ! मजा म्हणजे काय !' बंडोबा भरल्या पोटावरून हात फिरवून बोलले, 'भलतीच मजा. हंसून हंसून आमचीं पोटं दुखायची वेळ आली. हाः हाः'

'पण मघांशीं कसं झालं होतं ?'

'होय बुवा. मघांशीं मात्र आम्हीं अगदीं रडकुंडीला आलों होतों. वाटलं, भानामती, चेटूक नाहींतर भुताटकीच झाली असावी.'

हें ऐकून संभू हंसूं लागला. बाकीचेहि सगळे हंसूं लागले. थोडा वेळ पुन्हां जिकडे तिकडे हंशाच हंशा झाला.

मग शेठजींना संभूविषयीं फार कौतुक वाटलें. तें आश्चर्यानें म्हणाले,

'अरे, पण हें केलंस कसं हें तरी सांग.'

'अहो त्यांत अवघड तें काय ?' संभू हंसत हंसत बोलला, 'हा माझा पोषाख. कोण संशय घेईल माझा ? सांगा.'

'कबूल.'

'सरळ शिरलों आंत हा असा.' संभू दरवाजाजवळ जाऊन पुन्हां आंत येत म्हणाला. 'जरा इकडे तिकडे केलें. कानोसा घेतला. तुमच्या या नोकराला कांहींतरी बोलून पिटाळल. मग सरळ कपडे गोळा केले. थांबा–'

असें म्हणून त्यानें खालीं वाकून गांठोडें सोडलें. गांठोडयांत व्यवस्थित घडया करून ठेवलेले कपडे उचलले आणि ते जसेच्या तसे पुन्हां खुंटयांवर लटकावले. या सगळया गोष्टी त्यानें इतक्या चपळाईनें केल्या कीं सगळे लोक तोंडांत बोट घालून तटस्थपणें पहात उभे राहिले.

सगळे कपडे अडकावून झाल्यावर संभू निश्चयाच्या सुरांत म्हणाला,

'हे असेच आणि इथंच होते सगळयांचे कपडे. होते कीं नाहीं आठवून पहा.'

सगळयांनीं खुंटीवर ठेवलेले आपापले कपडे नीट पाहिले. ते आपण असेच ठेवले होते याची त्यांना खात्री पटली आणि संभूच्या विलक्षण स्मरणशक्तीबद्दल त्यांना खरोखर मनापासून आश्चर्य वाटलें. त्यांनीं पुन्हां त्याची प्रशंसा केली.

मग संभू म्हणाला,

'असेच होते ना सगळयांचे कपडे ? नक्की ?'

'होय. असेच होते.'

'मी इथंच असा बसलों होतों.' संभू एका ठिकाणीं बसून म्हणाला. मग त्या नोकराकडे वळून त्यानें विचारलें.

'कायरे, इथंच बसलों होतों ना ?'

त्या नोकरानें मान हलवली.

बाबू वाणी उत्सुकतेनें म्हणाला, 'मग पुढं कसंकसं केलंस ?'

'मग काय ? पुढचं काम फार सोपं. हे असे कपडे एकेक गोळा केले. त्यांच्या घडया घालन चादरीवर ठेवल्या. चटचट उरकलं काम–'

बोलतां बोलतां संभूनें पुन्हां सगळे कपडे गोळा करून दाखविले. त्यांच्या घडया केल्या. त्या व्यवस्थितपणें चादरीवर ठेवल्या. हें सगळें करीत असतांना त्यानें जी सफाई आणि चपळपणा दाखविला तो बघून सगळी मंडळी थक्क होऊन गेली. एखादा फोक जसा लवलवावा तसें त्याचें शरीर लवलवत होतें. मंडळी त्याकडे आश्चर्यानें, कुतूहलानें पहात राहिली. खरोखरच

त्याचें कसब कांहीं विलक्षण होतें अवघ्या दोनतीन मिनिटांत त्यानें पुन्हां सगळ्या घड्या चादरीवर घालून ठेवल्या.

तात्या शिंपी तोंडाचा आ करून या सगळ्या प्रकाराकडे मुकाट्यानें पहात होता. संभूनें सगळ्या घड्या केल्यावर त्यानें विचारलें,

'अन् मग ?'

'मग काय ? हें असं गांठोडं केलं मीं.'

संभूनें मोठ्या शिताफीनें खालच्या चादरीचीं टोकें वर उचललीं, त्यांच्या गांठी मारल्या. गांठोडें तयार करून दाखवलें.

'शाबास ! अन् मग ?'

'हें गांठोडं असं घेतलं हातांत–'

संभूनें अगदीं सहज तें गाठोडें उजव्या हातांत घेऊन दाखवलें. वर उचललें. चेहऱ्यावर आविर्भाव असा आणला कीं कुणी खणाळीं विकणारा एखादा व्यापारी गडबडीनें बाहेर निघाला आहे.

'आलं ध्यानांत ?'

त्याचा तो आविर्भाव आणि ऐट पाहून पुन्हां सगळ्यांना हंसूं आलें.

'भले पठ्ठे ! मग पुढें ?'

'पुढें काय ? हें गांठोडं असं हातांत धरलं–'

'हं'

'सावकाश हा असा निघालों–'

'हां—'

'अन् हा असा दरवाजाबाहेर पडलों.' दरवाजाच्या बाहेर पडण्याचा आविर्भाव करीत संभू गांठोडें घेऊन त्या बाजूला वळला. दिसेनाला झाला.

'भले वाघ !'

'कमाल आहे बुवा या भामट्याची !'

'शाब्बास ! बेमालूम काम.'

असे उद्‌गार काढीत माणसें माना डोलवीत राहिलीं. पोट धरधरून कितीतरी वेळ हंसत राहिलीं. संभूची वाट पहात थांबलीं. आतां संभू परत आला म्हणजे त्याला कांहींतरी बक्षीस द्यायचें, असा कांहींतरी विचार करीत थांबलीं.

– पण संभू भामटा पुन्हां परत आलाच नाहीं !

****

# ९ : गफलत

अंधार गुडुप पडला होता. कांहीं म्हणतां कांहीं दिसत नव्हतें. मध्यरात्र टळून गेली होती. संबंध गांव झोंपेंत बुडून गेलें होतें. दिवसभराच्या शिणानें पुरुष, बायका, पोरें, म्हातारेकोतारे सगळेच गाढ झोंपले होते. कुणीहि जागें नव्हतें. बोलण्याचालण्याचा थोडासासुद्धां आवाज कुठें ऐकूं येत नव्हता. सगळीकडे गाढ शांतता भरून राहिली होती.

उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळें कुणी बाहेर झोंपले होते. कुणीं खिडक्यादारें उघडून आंत पडले होते. पहांटेचें थंड वारें अजून सुटलें नव्हतें. पण झाडें मधूनमधून सळसळत होतीं आणि त्याच्या झुळका अंगाला लागून झोंपेंतच माणसें सुखावत होतीं. अंगावरचें पांघरूण ओढून, अंग मुरगाळून जास्तच झोंपीं जात होतीं.

असा कितीतरी वेळ गेला.

आणि मग एकाएकीं आरडाओरडा ऐकूं आला,

'चोर चोर ! — '

त्या शांत वातावरणांत हा आरडाओरडा अधिकच मोठ्यांदा घुमला आणि सगळे लोक खडबडून जागे झाले. डोळे चोळत चोळत ताडकन् उठून उभे राहिले. एकमेकांना विचारूं लागले,

'काय झालं रं ? '

तेवढ्यांत पुन्हां एकदां आरडाओरडा झाला.

" चोर चोर...गेला. गेला पळाला. '

ज्ञानू सुतारानें आवाज आला त्या दिशेनें कान टवकारले. अदमास घेतला. मग तो मोठ्यांदा म्हणाला,

'अरे, देशमुखाच्या घरांतनं आवाज येतोय. चला चला, पळा.'

आणि तो देशमुखाच्या घराकडे तसाच उघडा बोडका पळत गेला.

मग त्याच्या पाठोपाठ सगळेच धांवत आले.

हातांत जडशीळ काठी घेऊन दगडू कोष्टी आला. गवत तोडायची कुऱ्हाड घेऊन केराप्पा गवळी आला. सुटलेलें धोतर नीट नेसत नेसत उघडद्याबंब अंगानें सदा वाणी आला. तालमींत झोंपलेलीं तरणीताठीं पोरें आलीं. कट्ट्यावर निवांत पडलेले रिकामटेकडे आले. बायका आल्या. सगळेच आले.

घटकभरांत देशमुखाच्या वाड्याभोंवतीं पांच-पंचवीस माणसांची ही गर्दी जमली. चौकशी सुरू झाली.

तोंपर्यंत देशमुखाच्या घरचीं माणसें जागीं झालींच होतीं हातांत काठ्या, कंदील घेऊन हिंडत होतीं. गांवांतील माणसें गोळा झाल्यावर त्यांनांहि बळ आलें. त्यांनीं वाड्याचा मोठा दरवाजा उघडला.

लोकांना पाहिल्याबरोबर अण्णा देशमुख म्हणाला.

'हा असा खिडकींतून गडी घुसला बघा. खुडबूड खुडबूड झाली, म्हणून बायको उठली आणि बोंबलली. तोंवर पळालाच. कुठं गेला पत्त्या न्हाई.'

केराप्पा म्हणाला,

'पण अण्णा, तुमचं कांहीं गेलं बिलं का ?'

'व्हय.'

'काय गेलं ?'

'ट्रंकेंत जिनसाचा डबा हुता, त्याचा पत्त्या न्हाई.'

'किती येळ झाला ?'

'अवो, हे आत्तांच. तुमी यायच्या आधीं पंधरा मिटंच.'

'आं ?'

'मग सांगतुय काय ? आजून हितंच कुठं जवळपास आसंल.'

'अरे मग हुडका हुडका !'

हा प्रकार अगदीं नुकताच, कांहीं मिनिटांपूर्वीच घडला हें कळल्याबरोबर लोक भराभर पुढें सरसावले. देशमुखाच्या घरच्या लोकांच्या हातांत

दोन तीन कंदील होते. आलेल्या लोकांपैकींहि एका दोघांजवळ कंदील होते. सगळी मंडळी भराभर वाड्याच्या चारी अंगाला गेली. सगळीकडे पहात हिंडूं लागली.

देशमुखाचा वाडा तसा मोठा होता. जुन्या काळांत बांधलेल्या या वाड्याला पुढें प्रचंड दरवाजा होता, त्याला आंतून भरभक्कम अडसर होता. चारी बाजूंनीं चांगल्या चिरेबंदी उंच भिंती होत्या आणि मध्यें दगडी वाडा होता. वाडा आणि कडेची भिंत यांत पुष्कळच मोकळी जागा होती. त्यांत गवत माजलें होतें. बारीकसारीक झुडपें वाढलीं होतीं. न जाणो, यांतहि एकाद्या वेळीं चोर अजून दडी मारून बसला असेल लोकांना वाटलें. म्हणून मंडळी बाहेरून हिंडत राहिली तर कांहींनीं आंतून तपास सुरूं केला. जिकडे-तिकडे शोधाशोध सुरूं झाली.

थोडा वेळ ही शोधाशोध अशीच चालली आणि मग एकाएकीं सदा वाणी ओरडला,

'अरे, सांपडलं सांपडलं !'

त्याबरोबर आंत इकडे तिकडे हिंडणारे लोक तिकडे धांवले. बाहेरचेहि पळत आले. हातांत काठ्या, कंदील घेऊन पळत आले. म्हणाले,

'कुठाय, कुठाय ?'

'हाणा भडव्याला ?'

'मरस्तंवर ठोका.'

हातांतल्या काठ्या सरसावून लोक धांवले. कंदील धरणाऱ्यांनीं वाती मोठ्या केल्या. हात उंच केला. पण कुणीं कांहीं दिसलें नाहीं.

केराप्पानें ओरडून विचारलें,

'अरे कुठाय चोर ?'

सदा वाणी मान हलवून गडबडीनें बोलला,

'चोर कधीं म्हणालों ?'

'मग ? काय सांपडलं म्हणालास ?'

'दागिन्याचा डबा—'

'आं ? कुठाय ?'

'हा काय ?–'

असें म्हणून सदानें भिंतीच्या कोपराकडे हात केला.

लोकांनीं झटकन् पुढें सरकून पाहिलें.

खरोखरीच दागिन्यांचा डबा भिंतीला लागून वेडावांकडा खालीं पडला होता. त्याचें झांकण एका बाजूला गेलें होतें आणि डबा भिंतीजवळ उपडा झाला होता. त्यांतल्या जिनसा गवतांत इकडेतिकडे पडल्या होत्या. अण्णानें झट्दिशीं पुढें येऊन जिनसा गोळा केल्या. मोजल्या.

मग समाधानानें मान हलवून तो म्हणाला,

‘ हायेत हायेत. समद्या हायेत. ’

ज्ञानू सुतारानें विचारलें,

‘ काय सुदिक न्हायलं न्हाई ? ’

‘ काय न्हाई. ’

‘ बगा नीट.

‘ बघितलं, समदं घावलं. ’

डबा सांपडला, त्यांतल्या जिनसाहि सांपडल्या हें कळलें तसें लोकांना हायसें वाटलें. मग सगळ्यांच्याच मनावरील दडपण उतरलें. समाधानाचे सुस्कारे सुटले. कंदिलांच्या वाती बारीक झाल्या. वर उचललेल्या काठ्या परत भुईवर टेकल्या आणि ताठलेलीं शरीरें सैल झालीं.

हळूहळू गप्पा सुरू झाल्या.

लोकांच्या झोंपा उडाल्या होत्या. आतां परत झोंप येणें शक्य नव्हतें. पहांटहि व्हायला आली होती. तेव्हां आपोआपच गप्पा सुरू झाल्या. कोण चोर आला असेल, कसा आला असेल याविषयीं बोलणीं चाललीं.

डबा पडला होता त्या ठिकाणीं गवत दबलें होतें. पण ह्याशिवाय कुठेंहि, कसलीहि खूण ठेवून चोर गेला नव्हता. केराप्पा गवळ्यानें हें सर्व नीट पाहिलें होतें. म्हणून त्याला मघांपासून जरा आश्चर्य वाटत होतें. ओठ पुढें जुळवून, डोळे विस्फारीत तो म्हणाला,

‘ वायली, हें भडवं आंत आलं तरी कसं म्हणावं ? ’

ज्ञानू सुतार खिशांतली विडी काढीत बोलला,

‘ कां बरं ? त्यांत काय अवघड वाटलं एवढं तुला ? ’

‘ तूं तरी सांग मला. ’

'अरे, साधी गोष्ट हाये. दरवाजा उघडा ऱ्हायला आसंल चुकून. आला गडी आंत. हाये काय अन् ऱ्हाई काय !'

अण्णा देशमुखानें मान हलवली.

'छ्या: ! दरवाजा बंद हुता. म्यां स्वत: बंद केला. आडसर घातला. मगच झोंपलों. दरवाजांतनं कुनी आलं ऱ्हाई, मी सांगतों.'

'नक्की ?'

'अगदीं नक्की. एक डाव न्हवं हजार डाव.'

देशमुखानें इतकी खात्री दिल्यावर ज्ञानू सुताराला पुढें कांहीं बोलतां आलें नाहीं. तरी पण त्याची मनांत खात्री पटली होती कीं दरवाजाच चुकून उघडा राहिला असला पाहिजे आणि चोर तेथूनच शिरला असला पाहिजे. दुसरीकडून तो येणार कसा ? वाड्याच्या चारी बाजूच्या भिंती चांगल्या दीड दोन पुरुष उंचीच्या होत्या. चिरेबंदी दगडाच्या होत्या. त्यावर चढून आंत येणें अशक्य आहे असें डोळ्यांनींच दिसत होतें. पण देशमुखानें अशी खात्री दिल्यावर तो काय बोलणार ?

तेवढ्यांत देशमुखाला घरांतून बोलावणें आलें म्हणून तो उठला.

'वसा बरं का मंडळी. चा पानी घेऊनच जावा आतां.

असें म्हणून तो आंत गेला.

तो गेल्यावर ज्ञानू विडीचा धूर काढीत मोकळेपणानें म्हणाला,

'ह्यो अण्णा काय सांगतो ? मला नक्की वाटतंय, दरवाजाच लावायचा ऱ्हायला आन् चोर तिथनंच घुसला.'

सदा वाणी म्हणाला,

'हें तुजं कायतरीच बोलणं ज्ञानू. सांगणारा सांगतोय कीं मी लावला दरवाजा. आठवतंय चांगलं. आन तूं म्हणतोस त्याचं खरं ऱ्हाई !'

'व्हय.'

'भले ! म्हंजी लावणारा खोटा आन् तूं खरा व्हय ?'

'तसं न्हवं ?'

'मग कसं ?'

मग चोर आंत कसा आला आसंस, सांग. ऱ्हाई, तुमचं एकदां हूं जाऊं दे.'

ज्ञानूचा हा सवाल बिनतोड होता. कारण दुसरा कुठलाहि मार्ग अशक्य होता हें स्पष्ट दिसत होतें. चट्दिशीं डोळ्यापुढें यावें असें कांहींहि नव्हतें.

मंडळी थोडा वेळ गप्प बसली. मग इतका वेळ उगीच बसून ऐकणारा एकनाथ चवरे पुढं सरसावला. तो म्हणाला,

‘ लेकानो, त्यांत हायें काय आवघड ? मी सांगतों.’

‘ सांग.’

‘ ही भिंत चढून आला असनार चोर. नक्की.’

‘ तें कसं काय ? ’

‘ आवो, पाठीनं चढला असनार गडी. हां.’

‘ पाठीनं ? ’

‘ तर– ’

असें म्हणून एकनाथ चवऱ्यानें लोकांना पुढें बरीच माहिती पुरवली. त्याचें म्हणणें असें होतें कीं, ही चोर मंडळी फार हुषार असतात. त्यांनीं सगळ्या प्रकारचें शिक्षण घेतलेलें असतें. मोठमोठ्या भिंतींवरून सहज उड्या टाकून ते जाऊं शकतात. एखादी भिंत अवघडच असली तर ते पाठींनीं भिंत चढून जातात. आतां पाठीनें भिंत चढतात म्हणजे ते नेमकें काय करतात हें आपल्याला सांगतां येणार नाहीं. पण तसें कांहींतरी ते करतात हें आपण ऐकलेलें आहे, एवढी गोष्ट खरी. मग कुणी कांहीं म्हणो.

एकताथ चवऱ्याचा हा तर्क लोकांना मुळींच पटला नाहीं. दगडू कोष्टी निषेधपूर्वक मान हलवीत बोलला,

‘ काय लेका सांगतोस ? म्हणं, पाठीनं भिंत चढत्यात. उद्यां सांगत हिंडशील कीं कानानं न्हाई तर नाकानं चढत्यात म्हणून. भले !’

एकनाथ रागावून म्हणाला.

‘ मग तूं तरी सांग लेका ? तुझी चालव आक्कल.’

‘ हो हो. सांगतों कीं.’

‘ सांग कीं.’

‘ मला तर वाटतंय गड्या—’

‘ हां—’

‘ चोरानं उंच बांबू आणला आसंल आणि त्येच्यावरनं त्यो आद्दर उडी मारून आंत आला आसंल.’

‘ सांगून सांगून हें सांगितलंस व्हय ? अँहँ—’

अनुक्रम 30694 विभाग वा.वा. क्रमांक 2664 नों. दि. वाचनालय

'कां ? काय झालं ?'

'लेका, इतक्या उंच भितीवरनं कुनाची तरी उडी जाईल का ? आं ? रेकार्डी ब्रेक झालं म्हणावं लागंल मग !'

एवढं बोलून एकानाथ हंसला त्याच्याबरोबर बाकीचे लोकहि हंसले. आणि दगडूला कळून चुकलें कीं आपली ही कल्पना कुणालाच पटलेली नाहीं. या उंच दगडी भिंतीवरून बांबूनें उडी मारून यतां येईल ही गोष्ट कुणालाच मान्य नाहीं. मग त्यानें मनांतल्या मनांत एक मोठा बांब घेतला. पळत पळत येऊन मनांतल्या मनांतच त्याच्या आधारानें उंच उडी मारून बघितली. पण तरीहि उडी भितीपलीकडे गेली नाहीं. मनांतल्या मनांतदेखील गेली नाहीं. आणि त्यानें स्वत:शींच कबूल केलें कीं, आपल्या या कल्पनेंत कांहीं अर्थ नाहीं. एकादा बांबू घेऊन त्याच्या आधारानें उडी मारून आंत येणें हा प्रकार प्रत्यक्षांत घडण्यासारखा नाहीं.

मग तो गप्पच बसला. पुढें कांहीं बोलला नाहीं.

मग सदा वाणी डोकें खाजवीत म्हणाला.

'मंडळी, साधी गोष्ट हाये. इतकं कसं लक्षांत यी ना तुमच्या, मी म्हणतों.'

सगळ्यांनीं सदाकडे तोंड केलें.

'काय म्हणतोस ?'

'आसं आहे त्याचं,' सदा पुन्हां डोकें कराकरा खाजवीत बोलला, 'चोर आधींच घरांत घुसला असनार, माळवदावर लपून बसला असनार. रात झाल्यावर गडी सवन्यातनं खालीं उतरला. केली चोरी आन् पळाला. दुसरं काय ?'

सदाचें हें बोलणें कांहीं जणांना पटण्याच्या बेतांत होतें. ते मानाहि हलवणार होते. पण तेवढ्यांत एकनाथ चवन्याला शंका आली. त्यानें विचारलें,

'तें खरं. पन पळाला कसा तें सांग कीं.'

होय. ही शंक खरी होती चोर बाहेर गेला कसा ?

भिंतीवरून उडी मारून जाणें ही गोष्ट कठीण होती. दरवाजा लावलेला तसाच होता. लोक जमल्यावर देशमुखानें स्वत:च तो पुन्हां उघडला होता. तोंपर्यंत त्याचा अडसरसुद्धां निघालेला नव्हता. दिवसाढवळ्या चोर एखाद्या वेळीं माळवदावर लपून बसला असेल ही गोष्ट एक वेळ कबूल केली तरी तो बाहेर गेला कसा ?

सदा वाणी या प्रश्नावर निरुत्तर झाला. तोहि मग पुढें कांहीं बोलला नाहीं.

अशा बऱ्याच गप्पा झाल्या. निरनिराळ्या लोकांनीं निरनिराळे तर्क केले. पण इतरांनीं ते खोडून काढले आणि कुठलीच कल्पना शेवटीं लोकांना पटली नाहीं. प्रश्न तसाच लोंबकळत पडला. त्याचें उत्तर एकालाहि सांपडलें नाहीं.

शेवटीं ज्ञानू सुतार चिडला. त्राग्यानें म्हणाला, 'एकाच्या आपल्या डोक्यांत मेंदू आसंल तर शपत. समदा भुसा भरलाय भुसा. देवाशपत.'

इतका वेळ न्हाव्याचा तरुण पोरगा रंगा उगीच सगळ्यांचें बोलणें ऐकत होता. आत्तांपर्यंतच्या बोलण्यांत त्यानें भाग घेतला नव्हता. तो डोळे मिटून उगीच बसला होता. पण ज्ञानूचें बोलणें ऐकून त्याला सुरसुरी आली. घोगऱ्या आवाजांत तो म्हणाला,

'का रं ? आसं कां म्हणतोस ?'

'मग काय तर !' ज्ञानू चिडून बोलला, 'एक चोर वेनं येतंय काय, जातंय काय ! आन आपल्याला एवढंसुदिक सांगता यीना न्हय, कीं त्यो कसा आला आसंल आन् कसा गेला आसंल ?'

'बरं, आतां मी सांगतों.'

लोकांनीं उपरोधानें माना हलवल्या. मोठेमोठे थकले. आतां हा आणखी काय दिवे लावणार, अशा अर्थानें त्यांनीं माना हलवल्या. कुणीतरी बोललेंहि,

'सांग बाबा, सांग. तुजंच डोस्कं चालायचं ऱ्हायलं हुतं. चालीव आतां.'

'ऐका तर खरं. पटलं घ्या. न्हाई पटलं सोडून द्या.'

'सांग सांग.'

मग रंगा पुढें सरसावला. जाग्रणानें त्याचे डोळे चुरचुरत होते. कडेला पाणी सांचलें होतें. तें पुसून तो म्हणाला,

'मला नक्की वाटतं कीं चोर ह्या भिंतीवरनं चढून आला.'

'काय लेका नवीन सांगितलंस रे ?'

'ऐकून तर घ्या माजं—'

'बरं सांग कशावरनं ?'

हा प्रश्न विचारल्यावर रंगा उठला. उठून उभा राहून त्यानें वाड्याच्या पलीकडच्या भिंतीच्या बाजूला बाहेर एक लिंबाचें झाड अस्पष्ट दिसत होतें, त्याकडे बोट दाखवलें.

'हें झाड दिसतंय पलीकडचं ?'

लोकांनीं माना वळवून उंच करून पाहिलें. कुणाला नीट दिसलें. पहांटेच्या अस्पष्ट प्रकाशांतहि नीट दिसलें. कुणी अंदाजानें ओळखलें.

'बगितलं. बरं मग ?'

'ह्याचा एक फांटा भिंतीच्या वरनं आंत आलाय. हाय ठावं ? बगितलय तुमी ?'

रंगानें खणखणीत आवाजांत हा प्रश्न केला तेव्हां लोकांच्या ध्यानांत एकदम पुढल्या अनेक गोष्टी आल्या. त्या लिंबाच्या झाडाचा एक फांटा भिंतीवरून आंत आलेला होता, ही गोष्ट खरी होती. ज्यांना ती माहीत नव्हती, त्यांनींहि उभें राहून, चार पावलें पुढें जाऊन या गोष्टीची खात्री करून घेतली. फांटा भिंतीच्या वर खूप उंचावर होता, ही गोष्ट खरी. पण तो आंत आला होता. या फांट्यावरून खालीं उडी टाकणें ही गोष्ट शक्य होती. खरेंच कीं ! इतका वेळ ही गोष्ट आपल्या ध्यानांत कशी आली नाहीं ? इतका साधा विचार आपल्याला कसा सुचला नाहीं ? न्हाव्याच्या ह्या तरण्या पोराच्या हें बरें लक्षांत आलें !

ज्ञानू ओरडून म्हणाला,

'म्हंजे ? रंगा, ह्या फांट्यावरनं गडी चढून आला आन् आंत उडी टाकली म्हणतोस काय ?'

रंगानें मान हलवली.

'हंय. तेंच सांगतोंय न्हवं का ?'

लोकांना एकदम रंगाबद्दल कौतुक वाटूं लागलें. त्यांच्या दृष्टींत आश्चर्य आणि कौतुक, दोन्हीहि भरून राहिलीं. मघाशीं ज्यानें रंगाची थट्टा केली त्याला दुसऱ्यानें ढुसणी दिली.

'बघ, ऐक लेका.'

तेवढ्यांत केराप्पा ओरडून म्हणाला,

'ए, गपा रे. ऐका पुढं.'

रंगा पुढें म्हणाला,

'ह्या झाडावरनं ह्यो वर चढला आसंल. आन् ह्या फांट्याला हळूच लोंबकळला आसंल.'

'बरोबर सांगितलंस! फुडं?'

'पुढं त्यानं खालीं उडी ठोकली.'

'इतक्या वरनं?' कुणाला तरी शंका आली.

'त्याला काय हुतंय?'

'पायबिय मोडला नसंल का?'

'खालीं गवात हाये गच्च, दिसत न्हायी का? मग कसा पाय मोडंल?'

सगळ्यांनीं माना हलवल्या. होय, ही गोष्ट खरीच होती. खालीं भरपूर गवत, झुडपें माजलीं होतीं. वरून उडी टाकणाराला ती गोष्ट सोयीचीच होती. हेंहि अजूनपर्यंत कुणाच्या लक्षांत आलेंच नव्हतें. इतकें दाट गवत असल्यावर पाय मोडण्याचें काय कारण? फार तर पायाला मुंग्या येतील. थोडासा लचकेल. पण यापेक्षां अधिक कांहीं होण्याचें कारण नव्हतें.

सगळ्यांना पुन्हां रंगाचें बोलणें पटलें. त्याच्याबद्दलचें कौतुक वाढलें.

'शाबास गड्या! ही तुजी आयडियाची कल्पना आगदीं बरोबर.' सदा वाणी खूष होऊन म्हणाला.

'मग फुढं कसं कसं?'

रंगाचे डोळे चांगलेच चुरचुरत होते. खालीं बसून त्यानें जांभया दिल्या. डोळ्याचें पाणी पुसून काढलें.

'आतां काय आणखीन्? मुख्य म्हणजे कसा आला आसंल तो, एवढंच कीं न्हाई? त्ये मी साधारण सांगितलं. पुढचं कसं काय सांगावं बरं?'

'तसं न्हवं. पर चोरी तरी कशी केली आसंल म्हनतों मी. किती धाडशीपना म्हणावं.'

'धाडशी तर असलाच पाहिजे. त्याबिगर घुसतोय का आंत?'

'त्ये बी खरंच.'

अ॑ ून सदा गप्प झाला. रंगाच्या हुषारीवर खूष होऊन स्वतः-शींच मान डोलवीत राहिल

मग दगडू रंगाकडं आदरानें बघत म्हणाला.

'रंगा, हें तुजं पटलं गड्या मला. आगदीं कायम पटलं. पर मी म्हनतों--'

रंगा खूष होऊन म्हणाला,

'काय ?'

'पर ह्यो गडी बाहेर कसा काय पडला आसंल ?'

बाकीच्या लोकांनींहि हां हां करून माना डोलवल्या. आपले कान टव-कारले. उत्सुकतेनें रंगाकडे पाहिलें. या पठ्ठयानें एक गोष्ट तर अगदीं बरोबर सांगितली. चोर झाडावरून आंत आला असला पाहिजे ही कुणाच्याच लक्षांत न आलेली गोष्ट रंगानें बरोबर सगळ्यांच्या ध्यानांत आणून दिली. आतां यानें हीहि गोष्ट सांगितली तर बरें होईल. हेंहि कोडें उलगडेल. ज्याचा एक अंदाज खरा ठरला त्याचा दुसरा अंदाजहि खरा ठरण्याची शक्यता आहे. निदान इतरांसारखें कांहीं निरर्थक तरी तो बोलणार नाहीं, एवढें खास.

लोकांच्या मनांत असे विचार आले. मग सगळयांनींच त्याला विचारून अंडावलें. तुझें डोकें चालव म्हणून सांगितलें. तेव्हां झोपेला आलेल्या रंगाला मोठें अवघड झालें. कंटाळून, मोठी जांभई देऊन तो म्हणाला,

'आरं, हाय काय त्यांत तरी अवघड ?'

'मग सांग.'

'थांबा आशीक--'

असें म्हणून रंगा उठला. ज्या ठिकाणीं मघांशीं दागिन्यांचा डबा उलथा पालथा होऊन पडला होता, तिथं जाऊन उभा राहिला. बारकाईनें न्याहाळत राहिला.

आतां उजाडत आलें होतें. फटफटत होतें आणि अंधुक पांढरा उजेड सगळीकडे पसरला होता. नीट दिसत होतें.

चार दोन मिनिटें रंगा उगीच बघत उभा राहिला. त्यानें खालीं गव-तांत पाहिलें. वर भिंतीकडे सर्वत्र नजर फिरवली, थोडासा विचार केला मग तो म्हणाला,

'डबा हितंच पडला हुता ना मघां ?'

'व्हय. हितंच.'

'म्हंजे मग हितनंच गडी पळाला. दुस ?'

'तें कसं काय ?'

रंगानें कपाळाला घातल्या. जागरणानें त्याचा घसा बसला होता. आवाजाला दशा ल्या होत्या. तशाच अर्ध घोगऱ्या आवाजांत तो म्हणाला.

'ऐका आतां नीट. पुन्हां पुन्हां येड्यासरखं इचारूं नगा.'

एरवीं रंगा असें कांहीं बोलला असता तर लोकांनीं तें ऐकून घेतलें नसतें. त्यालाहि ते फाड्दिशीं उलटे बोलले असते. पण आतांची गोष्ट वेगळी होती. सगळ्यांत तो एकटा शहाणा निघाला होता. म्हणून लोक गप्प बसले. निमूटपणें तो काय बोलतो तें ऐकूं लागले.

'हां, कसं कसं झालं म्हनतोस ?'

'पहिल्यांदा चोर झाडावरनं आंत आला. सरळ खिडकींतनं आंत शिरून त्यानं ट्रंक उघडली. आंतला डबा काढला—'

'त्ये त्याला कसं कळलं हितंच डबा हाये हें ?'

'आहो, माहितगाराचंच काम कुणाचंतरी ! आतां एवढंबी कळंना का तुमाला ?'

रंगाचें तिरसटपणाचें हें बोलणें ऐकून पुन्हां सगळे गप्प झाले. कौतुकानें त्याचें बोलणें ऐकत राहिले.

'बरं मग ?'

'मग काय ? डबा घेतला आन् पळाली स्वारी. तिवढ्यांत देशमुखाच्या बायकोनं बगितलं आसनार. ती बोंबलली आसनार—'

'बरोबर. फुडं ?'

'फुडं काय ?' रंगाला पुन्हां मोठी जांभई आली. ती देतदेतच तो बोलला, 'गडी घाबरला आसनार—'

'व्हय कीं.'

'पयला त्याचा बेत आसनार कीं दरवाजा सरळ उघडावा आन् चालूं लागावं. पण बाई वराडली तस फिसकटलं त्याचं तें.'

'आसंल बाबा.'

'मग गडी घुम् पळाला त्यो हिकडंच आला. ह्ये न्हवं कागवात मुडा-पलंय हितं, मघांशीं बगितलं न्हाई का?'

'बगितलं बगितलं. अगदीं खर.'

लोकांनीं माना डोलवल्या. कान टवकारून ते रंगाचें बोलणें ऐकत राहिले. त्याच्याकडे आदरानें पहात राहिले.

मग रंगानें भिंतींतल्या बारीक फटी एक दोन दाखविल्या. त्यांत अंगठा बिंगठा बसवून वर चढतां येणें कसें शक्य आहे हेंहि सांगितलें. लोकांनीं पुन्हा माना डोलाविल्या. मग त्यांना रंगाचें बोलणें पटत गेलें.

'मग?'

'मग काय? गडी लागला आसंल वर चढायला गडबडीनं. तेवढ्यांत बाई पुन्हा बोंबलली आसंल. झालं. आधींच घाबरलेला त्यो बाई बोंबलल्या-वर हादरलाच. घेतली त्यानं तशीच वर उडी—'

'व्हय व्हय. फुडं?'

'आतां फुडं काय व्हायलं आणखीन्—'

असें म्हणून रंगानें एक मोठी जांभई पुन्हां एकदां दिली. झोंपेनें आतां त्याला चांगलेंच घेरलें. नकळत त्याचे डोळे मिटले. मोठ्या कष्टानें ते उघडून तो म्हणाला,

'घाबरलेला गडी. त्याच्या काखंतला डबा निसटून पडला ह्या अंगाला आन्—'

आणि पेंगतां पेंगतां तो पुढें म्हणाला,

'— आन् मी पडलों बाहेरच्या अंगाला.'

****

## १०  :  पाहुणे

देगांवच्या खराडे पाटलाच्या वाड्यांत लगीनघाईची गडबड चाललेली होती. रात्रीचे बारा वाजून गेले असावेत. हें आपलें अदमासानें. कारण घड्याळ असें कोठें नव्हतेंच. पण सगळीकडे सुन्न शांतता होती. आभाळांतल्या चांदण्या पुष्कळच पुढें सरकल्या होत्या. दाट अंधार पडला होता. आणि रातकिड्यांची किरकिर मध्यें ऐकूं येत होती. गांवांत निजानिज होऊन कितीतरी वेळ लोटला होता.

एकट्या खराड्याच्या वाड्यांतील बत्ती तेवढी झगमगत होती.

बत्तीचा उजेड बंद दाराच्या फटींतून बाहेर रस्त्यावर अंधुक पडला होता. त्या उजेडांत कावेच्या आणि चुन्याच्या पट्ट्यांनीं रंगवलेली समोरची भिंत ठळकपणें दिसत होती. दोन्ही बाजूंच्या दरवाजजांवळ दोन शिपाई भिंतीवर फुलें हुंगीत होते. वर सोनेरी नारळाजवळ गणपतीचें चित्र लटकलें होतें.

आंत वाड्यांतल्या अंगणांत पालें पसरलीं होतीं. वर पालांचाच मांडव उभा होता. या मांडवाखालीं पोरेंटोरें कुठेंहि वेडींवांकडीं झोंपलीं होतीं. लेकुरवाळ्या बाया त्यांना झोपवण्यासाठीं घटकाभर लवंडल्या होत्या. पण त्यानाहि दिवसभराच्या मेहनतीनें चांगली गुंगी आली होती. लग्नांतलें नानाप्रकारचें सामान अंगणांत अस्ताव्यस्त पडलें होतें. पलीकडे ओसरीवर गडीमाणसें, उरलेसुरले लोक अजून जेवत होते. परसदारांतली स्वैंपाकाची गडबड बाहेर अंगणापर्यंत ऐकूं येत होती. तोंडावर धोतरें घेऊन बापये गडीहि

'पयला त्याचा बेत आसनार कीं दरवाजा सरळ उघडावा आन् चालूं लागावं. पण बाई वराडली तस फिसकटलं त्याचं तें.'

'आसंल बाबा.'

'मग गडी घुम् पळाला त्यो हिकडंच आला. ह्ये न्हवं कागवात मुडा-पलंय हितं, मघाशीं बगितलं न्हाई का ?'

'बगितलं बगितलं. अगदीं खर.'

लोकांनीं माना डोलवल्या. कान टवकारून ते रंगाचें बोलणें ऐकत राहिले. त्याच्याकडे आदरानें पहात राहिले.

मग रंगानें भितींतल्या बारीक फटी एक दोन दाखविल्या. त्यांत अंगठा विंगठा बसवून वर चढतां येणें कसें शक्य आहे हेंहि सांगितलें. लोकांनीं पुन्हा माना डोलाविल्या. मग त्यांना रंगाचें बोलणें पटत गेलें.

'मग ?'

'मग काय ? गडी लागला आसंल वर चढायला गडबडीनं. तेवढ्यांत बाई पुन्हा बोंबलली आसंल. झालं. आधींच घाबरलेला त्यो बाई बोंबलल्या-वर हादरलाच. घेतली त्यानं तशीच वर उडी—'

'व्हय व्हय. फुडं ?'

'आतां फुडं काय न्हायलं आणखीन्—'

असें म्हणून रंगानें एक मोठी जांभई पुन्हां एकदां दिली. झोंपेनें आतां त्याला चांगलेंच घेरलें. नकळत त्याचे डोळे मिटले. मोठ्या कष्टानें ते उघडून तो म्हणाला,

'घाबरलेला गडी. त्याच्या काखंतला डबा निसटून पडला ह्या अंगाला आन्—'

आणि पेंगतां पेंगतां तो पुढें म्हणाला,

'— आन् मी पडलों बाहेरच्या अंगाला.'

****

# १० : पाहुणे

देगांवच्या खराडे पाटलाच्या वाड्यांत लगीनघाईची गडबड चाललेली होती. रात्रीचे बारा वाजून गेले असावेत. हें आपलें अदमासानें. कारण घड्याळ असें कोठें नव्हतेंच. पण सगळीकडे सुन्न शांतता होती. आभाळांतल्या चांदण्या पुष्कळच पुढें सरकल्या होत्या. दाट अंधार पडला होता. आणि रातकिड्यांची किरकिर मध्यें ऐकूं येत होती. गांवांत निजानिज होऊन कितीतरी वेळ लोटला होता.

एकटचा खराड्याच्या वाड्यांतील बत्ती तेवढी झगमगत होती.

बत्तीचा उजेड बंद दाराच्या फटींतून बाहेर रस्त्यावर अंधुक पडला होता. त्या उजेडांत कावेच्या आणि चुन्याच्या पट्ट्यांनीं रंगवलेली समोरची भिंत ठळकपणें दिसत होती. दोन्ही बाजूंच्या दरवाजजांवळ दोन शिपाई भिंतीवर फुलें हुंगीत होते. वर सोनेरी नारळाजवळ गणपतीचें चित्र लटकलें होतें.

आंत वाड्यांतल्या अंगणांत पालें पसरलीं होतीं. वर पालांचाच मांडव उभा होता. या मांडवाखालीं पोरेंटोरें कुठेंहि वेडींवांकडीं झोंपलीं होतीं. लेकुरवाळ्या बाया त्यांना झोपवण्यासाठीं घटकाभर लवंडल्या होत्या. पण त्यानाहि दिवसभराच्या मेहनतीनें चांगली गुंगी आली होती. लग्नांतलें नानाप्रकारचें सामान अंगणांत अस्ताव्यस्त पडलें होतें. पलीकडे ओसरीवर गडीमाणसें, उरलेसुरले लोक अजून जेवत होते. परसदारांतली स्वैंपाकाची गडबड बाहेर अंगणापर्यंत ऐकूं येत होती. तोंडावर धोतरें घेऊन बापये गडीहि

जागा मिळेल तिथें पसरले होते. कुणी जेवूनखाऊन पानसुपारीच्या द्रोणाभोंवतीं घोंघावत होते. हलक्या आवाजांत गप्पा चालल्या होत्या. घरांतल्या कर्त्या बायकांपैकीं मध्येंच कुणीतरी बाहेर डोकावे. एकदम चिरक्या सुरांत कुणालातरी हांक मारी. बिडी अर्ध्यावर विझवून कुणीतरी तसाच पळत आंत जाई. लग्न उद्यां दुपारचें होतें. पण गडबड एकसारखी चालली होती. माणसांची रवरव तर सतत सुरू होती. सकाळपासून पाहुणे येत होते. त्यांची जेवणींखाणीं, इतर व्यवस्था लावतां लावतां घरच्या माणसांचे कंबरेचे कांटे ढिले झाले होते. कुणी कुठेंहि जातयेत होते. त्या गोंधळांत कशाचा कशाला पत्ता नव्हता.

अंगणांत वरच्या जोत्याला टेकून पाल टाकलें होतें. या पालावर चौघेपांचजण घोळामेळानें बसले होते. सुस्त पोटानें पान चघळीत त्यांच्या गप्पा चालल्या होत्या. डोळे पेंगत होते. मध्येंच डुलकी लागत होती. पण तरीसुद्धां एकंदरींत मंडळी जागी होती.

यशवंता खराडचाला मध्येंच अशी एक डुलकी लागली. त्याची मान अधांत्रीं हालायला लागली. डोळे चांगले मिटले. मग केराप्पानें त्याला कोपरानें ढुसणी दिली. हांक मारली.

'येसवंता, ए येशवंतराव–'

पण यशवंताला दिवसभराच्या श्रमांनीं चांगली गुंगी आली होती. तो एका हांकेनें जागा झाला नाहीं.

केराप्पानें त्याला गदगदा हलवलाच. पाठीवर दणकून थाप मारली.

'ओ महाराज ! भले !––'

ज्ञानू जमदाडयानें हातांतली विडी विझवली. तोंडांतून राहिलेला धूर सोडला. त्यानेंहि यशवंताला जागें केलें.

'उठा राजे हो ! घरची माणसं तुमी. तुमीच झोपल्यावर उजेडलंच मग. उठा उठा.'

काशीनाथ गडी बाजूला भिंतीला टेकून पेंगला होता. त्याचें मुंडासें तोंडावर आलें होतें. या बोलण्यानें यशवंताआधीं तोच जागा झाला. एकदम उठून बसला. डोळे चोळून म्हणाला,

'मालक, उठा हो. आजून रातसार जागायचंय. एवढ्यांत डोळा गुर-माळला तर कसं हुयाच ?'

सगळ्यांनींच कालवा केला तसा यशवंता जागा झाला. डोळे चोळून नीट बसत बसत म्हणाला,

'काय बगताबगता पेंग आली. छ्या: ! आंग आसं आंबलंय, डोळा उघडून दीना अजीबात.

केराप्पानें मान हलवली.

'आजून निमी रात जायाचीय.'

'कसं हुयाचं ?'

'हानाशीक पानाचा बार एक ? चट् झोप जातीय.'

'नगं आतां. चरबाट झालं त्वांड खाऊनखाऊन.'

मग दोन पायावर बसलेला संदिपान तसाच पायांनीं पुढें सरकत म्हणाला,

'गोस्ट सांगू का एक ? आगदी झकास.'

कपाळाला आंठ्या घालून ज्ञानू बोलला, 'मला म्हाईत हाये तुजी गोस्ट. शंकर पार्वतीची न्हाईतर ढब्बाढब्बीची. एक होता ढब्बा अन् एक होती ढब्बी. हुडूत् लेका--'

'न्हायलं. दुसरी सांगतो.'

'नगं. लई पागूळ लावतूस तूं. नगं नगं. कटाळा येतो लई.'

यशवंता समजुतीच्या सुरांत ज्ञानूला म्हणाला, 'आरं, पावणं येस्तंवर आसूं दे कीं. कुनीकडनं येळ गेला म्हंजे झालं.'

'नगं नगं.'

'आसूं दे. आसूं दे. सांग रे संदिपान.'

संदिपान खाकरला. मग म्हणाला,

'थांबा हां. जरा आटवतो. मधलं आधलं इसरलंय.'

'हट लेका !' असें म्हणून यशवंतानें जांभई दिली. आळोखेपिळोखे दिले. आळसटपणानें तो पुढें म्हणाला,

'कवां येत्यात, बापा हीं पावणं कुणाला ठावं ! आलं एकदां म्हंजे बरं.'

संदिपानाला तेवढ्यांत गोष्ट आठवली. तो लगेच गोष्ट सांगूंहि लागला.

'एक असाच राक्षसमानूस हुता. अक्राळविक्राळ. एका दमांत तीन ताड उडायचा--

संदिपानाची गोष्ट सुरू झाली. ती घटकाभर सगळ्यांनीं ऐकून घेतली. मग एकेक कंटाळले. हुश्शार झालेलीं माणसें पुन्हां पेंगायला लागलीं. मधून-मधून सगळ्यांचेच डोळे मिटूं लागले. थोड्या वेळानें संदिपानालाहि गुंगी आली. तोहि थांबला. सगळीकडे शांत वाटूं लागलें.

बराच वेळ गेला.

वाडा सगळा जवळजवळ झोपला. पोरें झोपलीं. आयाबाया झोपल्या. कर्ते पुरुष झोपले. गडीमाणसें पेंगुळलीं. अंगणांतल्या बत्तींतलें तेलहि संपत आलें. तिचा उजेडहि कमी झाला.

नाहीं म्हणायला ही मंडळी तेवढी मधूनमधून जागी होती. पेंगत डुलकी घेत पण सगळेच बसून राहिले होते. बत्तीचा 'भसस्' आवाज एक-सारखा कानावर पडत होता. त्यानें डोकीं दुखायला लागलीं होतीं. बत्तीच्या भोंवतीं किडे झेपावत होते. तिकडें बघत कुणी डोळे मिटत होते. पुन्हां उघडीत होते. जागें राहण्याची खटपट करीत होते. त्यांना कळत होतें कीं, आपण झोपतां उपयोगी नाहीं. जागे राहिलेंच पाहिजे. परगांवाहून आतां येणाऱ्या पाहुण्यांची नीट व्यवस्था लावली पाहिजे. त्यांतून आपल्या सोय-ऱ्यांचे ते पाहुणे. हलगर्जीपणा करून चालायचें नाहीं. तोंपर्यंत आपण लवंडणें ठीक नाहीं. पण पुन्हां असेंहि वाटत होतें कीं, पाहुणे गाडीनें येणार. सातार-कडची गाडी आधींच अपरात्रीं येते. त्यांतून तिला उशीर झालेला असला म्हणजे मग बघायलाच नको. स्टेशनवर बैलगाड्या पाठवल्या ही गोष्ट खरी, पण स्टेशन कुठें जवळ आहे? दोनअडीच कोसांचा हेलपाटा आहे. तिथनं माणसं यायचीं. केव्हां येतील तेव्हां येतील. तोंपर्यंत एक झोप काढायला काय हरकत आहे? एकदां पाहुणे आले म्हणजे कुठला आलाय निवांतपणा? चटाचटा उठून कामाला लागावें लागेल. त्यांना पानें वाढावीं लागतील. जेवणें झाल्यावर दुसऱ्या वाड्यांत पोचवावें लागेल. तिथली त्यांची व्यवस्था बघावी लागेल. मग कुठली झोप? त्यापेक्षां लवंडा जरा आत्तांच.

अशा विचारानें मंडळी पेंगत होती. पण कुणीतरी कुणाला उठवीत होतें आणि कुणालाच झोप येत नव्हती. सगळ्यांचेच डोळे जागरणानें लाल

झाले होते. डोकीं बधीर झालीं होतीं.

बत्तीचा उजेड आतां आणखी कमी झाला. अगदीं फिकट, दिसेल न दिसेल इतका. मधलें उजेडाचें पिवळें फूल तेवढें राहिलें. अंगणांत अगदींच अस्पष्ट दिसूं लागलें.

मग आणखी थोडा वेळ गेला आणि एकाएकीं दरवाजाजवळ माणसांची गडबड ऐकूं आली. कुणीतरी दरवाजा ढकलतें आहे, असा आवाज झाला.

केराप्पा दचकून जागा झाला. बाहेर माणसें आलीं हें त्याला कळलें. न जाणो, त्यांनीं हांकाहि मारल्या असतील. गुंगींत आपल्याला ऐकूं आल्या नसतील, या विचारानें तो झटकन् उठला. इकडे यशवंताला त्यानें मोठ्यानें हांका मारून जागें केलें;

'ए येसवंतराव, ऊठ ऊठ, पाव्हणे आले बग.'

—आणि ओरडून तो म्हणाला;

'आलो आलो होऽ, उघडतो दार, जरा थांबा.' मग चुरचुरणारे डोळे पुसत, डोकें झाडतच तो दरवाजाकडे गेला. दिंडीदरवाजाची कडी काढली. दरवाजा उघडला. अंधारांत उभ्या असलेल्या माणसांना घाईघाईनें म्हणाला,

'या की पाव्हणे आंत. आसं वाकून नीट या.'

अंधारांत उभीं असलेलीं माणसें क्षणभर उभींच राहिलीं आणि मग एकाएकीं आंत शिरलीं. एकेकजण खालीं वांकून आंत वाड्यांत आला.

ही सगळी मंडळी आंत येईपर्यंत यशवंता जागा झाला होता. पाहुणे आले म्हटल्याबरोबर तो दचकून उठून बसला. त्यानेंहि डोळे चोळले. मग त्यानें ज्ञानू जमदाड्याला उठवलें. ज्ञानूनें सदिपानाला उठवलें. संदिपानानें काशीनाथाला हांक मारली. सगळीच मंडळी भराभर उठून बसली. कुणी उठून उभें राहिलें कुणी भराभरा पालें साफसूफ केलें.

दिंडी उघडल्याबरोबर आठ दहा माणसें आंत आलीं होतीं पण ती दरवाज्याजवळ तशीच उभी होती. सगळ्यांचेच कपडे मळलेले होते. कुणाच्या दाढ्या वाढल्या होत्या. कुणाचीं मुंडाशीं अस्ताव्यस्त झालीं होतीं. सगळ्यांचे पाय धुळीनें भरले होते.

ओसरीवरचा धुरकटलेला कंदील कुणीतरी वर उचलला तेवढ्यांत

यशवंताला हें दिसलें. एकूण पाहुणे मंडळींना बरीच दगदग पडलेली असावी.

डोळ्यांत आलेलें पाणी पुसून यशवंता घाईघाईनें दाराकडे गेला. अगत्यानें बोलला,

' या कीं हो पाहुणे. बसा पालांवर. '

हें ऐकल्यावर सगळेच पाहुण एकमेकांकडे टकामका बघूं लागले. कुणीही जागचे हलले नाहीं. बोलले नाहीं. मंडळी कशानेंतरी रागेजलेली दिसतात खास. कशानें बरें ? काय विघडलें असावें यांचें ?

यशवंतानें पुन्हां अगत्यानें आग्रह केला. चला म्हटलें. तेव्हां सगळ्यांत पुढें असलेला पाव्हणा रुक्ष करड्या आवाजांत म्हणाला,

' बसाया आलो न्हाई आमी हितं--'

यशवंतानें चटदिशीं त्याचा हात धरला.

' वा वा ! म्हणजे ही काय रीत झाली ?'

त्याचा हात झटकून तो पाव्हणा कर्कश सुरांत म्हणाला,

' आमाला येळ न्हाई. जायाचंय चट्दिशीं. '

' जाल हो. तुमाला पोचवतो बराबर, मग झालं का न्हाई ?'

' पण--'

' पण न्हाई आन् काय न्हाई. जरा बसाशिक. कुठल्या कुठनं आल्यालं तुमी. जरा टेका. चार घांस खावा. आन् मग जावा. काय ?'

एवढें बोलून यशवंतानें त्या पाव्हण्याला हाताला धरून जवळजवळ ओढीतच मोठ्या आग्रहानें पालावर नेऊन बसविलें. मग केराप्पानें दुसऱ्याला धरलें. संदिपानानें तिसऱ्या एकाला आग्रह चालवला. ' हां हां, हात लावू नका अंगाला ' असें म्हणेपर्यंत ज्ञानू जमदाड्यानें दोन माणसांचे हात धरून त्यांना आपल्याकडे ओढून आणलेंहि. पालावर नेऊनच बसवलें. काशीनाथानें सुद्धां लांब उभा राहून नुसताच बोलण्याचा धडाका उठवला. या सगळ्यांनीं इतकी लगट केली कीं एक अक्षर न बोलतां सगळे निमूटपणें पाठोपाठ आले. मुकाट्यानें पालावर येऊन बसले. मुक्यानेंच एकमेकांकडे पाहूं लागले.

अंधार बराच झाला होता. ओसरीवरल्या कंदिलाच्या उजेडांत साधारण तोंडाला तोंड दिसत होतें. पाहुण्यांचें कांहींतरी बिनसलें आहे हें स्पष्ट दिसत होतें. कारण त्यांच्या तोंडावर अनोळखीपणा होता, राग होता, थकवा

होता. आणि कुणीहि चकार शब्द बोलत नव्हतें.

मग पाव्हण्यांना जरा बोलतें करावें या हेतूनें ज्ञानू जमदाड्यानें सलगीच्या सुरांत जाड मिशावाल्या पाव्हण्याला प्रश्न विचारला.

'का पाव्हणे, लई येळ केला यायला ?

'येळ केला ?--' त्या पाव्हण्याच्या तोंडावर आश्चर्य उमटलेलें दिसलें. तो बाकीच्या आपल्या मंडळीकडे पाहूं लागला आणि बाकीचे त्याच्याकडे पाहूं लागले.

'हां हां !'

'गाडी लेट आली आसल न्हाई ?'

'गाडी ?--आं ? हां हां !'

'मग बराबर.'

केराप्पालाहि मध्येंच प्रश्न विचारायची हुक्की आली. डोळे पुन्हांपुन्हां चोळून तो म्हणाला,

'आमच्या गाड्या कुठशीक भेटल्या तुमाला ?'

मघांचा पाव्हणा पुन्हां घोगऱ्या आवाजांत बोलला,

'गाड्या ? कसल्या गाड्या ?'

'म्हंजे काय ? गाड्या पाठवल्या हुत्या तुमास्नी आनायला ! भेटल्या न्हाईतर का ? भले !'

पाव्हणा कांहींच बोलला नाहीं. त्यानें फक्त विचित्र दृष्टीनें एकदां केराप्पाकडे पाहिलें आणि मान हलवली.

ही सगळी मंडळी एकमेकांकडे सारखी कां बघताहेत आणि आपल्याकडे पुन्हां पुन्हां विचित्र नजरेनें कां पहात आहेत हें ज्ञानू जमदाड्याच्या बरोबर लक्षांत आलें. पाव्हण्यांसाठीं गाड्या घेऊन लक्षुमणला पाठविलें होतें. पण तो गाजेकस माणूस. गाड्या बाजूला सोडून तो खुशाल झोपला असेल. आणि एकदां गडी झोपला म्हणजे सबंध आगगाडी अंगावरून गेली तरी पठ्ठ्या जागा व्हायचा नाहीं. कठीण काम आहे. पाव्हण्यांना चांगला हिसका बसला रात्रीचा. दोनअडीच कोस चालत यायचें म्हणजे काय झालें काय ? छे: छे: ? हें कांहीं ठीक झालें नाहीं. यशवंताचा चुलता उद्यां सालटी काढणार आपली. या लक्षुमणाला उद्यां चांगला चोपला पाहिजे बाजूला नेऊन.

'मग चालत आला ? का गाड्या केल्या भाड्याच्या ?'

'भाड्याच्या गाड्या ?'

'हां हां—'

'न्हाई, चालतच आलो.'

'आरारारा–! लई तकाटा पडला तुमास्नी. इनाकारन् आनखीन् !' संदिपान मध्येंच म्हणाला,

'ह्यो लक्षा भोसडीचा पयल्यापासनं हालगर्जी माणूस. ह्यॅः'

सगळ्यांनींच लक्ष्मणाला शिव्या देऊन घेतल्या. झालेल्या प्रकाराबद्दल बराच राग आणि खेद व्यक्त केला. पण पाव्हण्यांचें तिकडे लक्ष असल्यासारखें दिसलें नाहीं. त्यांची एकसारखी कांहींतरी चुळबुळ चालली होती. एकमेकांकडे बघत ते हां हूं करीत होते. पण त्यांचें त्यांत लक्ष नव्हतें. त्यांना कांहीं बोलायचें असावें, असें यशवंताला वाटलें. पण काय तें नेमकें समजेना. बावचळल्यासारखा तो त्यांच्याकडे पहात राहिला.

तेवढ्यांत मागें अंधारांत बसलेला एक पाहुणा ताडकन् उठला. पुढें बसलेल्या मिशीवाल्या पाव्हण्याकडे तोंड करून एकाएकीं ओरडला,

'नाईक, बास झाला ह्यो तमाशा. तोंडांत आन न्हाई आमच्या, आन् ही रिकामी वटवट कशाला ?'

झोपेनें बधीर झालेल्या यशवंताच्या डोक्यांत एकदम प्रकाश पडला मघापासून ही मंडळी इतकी का चुळबुळ करीत होती, हें त्याच्या लक्षांत आलें. इतक्या रात्रींचे आलेले पाहुणे. जेवणींखाणीं नीट झालेलीं नसतील. भुकेनें कळवळली असतील. आणि आपण खुशाल त्यांच्याशी गप्पा मारीत बसलों आहोंत. आपल्याला कांहीं डोकें आहे कीं नाहीं ? माणसें चिडतील नाहींतर काय होईल ?

चटदिशीं उठून त्यानें उभ्या राहिलेल्या पाव्हण्याचे दोन्ही हात हातांत घेतले.

'आसं काय करता पावणे ? आतां जेवायाला वाढतो. जेवण तयार हाये.'

मग झानू जमदड्याच्या अंगावर खेंकसल्यासारखें करून तो म्हणाला,

'ए लेका जमदाड्या, तू तर नुसता बोलका जरदाळू हायेस बग. पानं

घे चटाचटा कवाची भुकेजलेली असत्याल मानसं. आं ?'

त्याबरोबर ज्ञानूनें जीभ चावली. 'आरं, व्हय की' म्हणत तो उठला. वर ओसरीवर गेला. त्याच्या पाठोपाठ दोनतीन माणसं धावलीं. कुणी पत्रावळी काढल्या. कुणी मांडल्या. एकानें भाताचीं ढेकळें भराभरा पानांत ओतलीं. एकानें द्रोणांत आमटी ओतली. कुणी पानांत दोन दोन जाडजूड पुरणपोळ्या टाकल्या. दहापांच मिनिटांत पानें वाढून तयार झालींसुद्धां.

हातांत आमटीचें ओघराळें तसेंच धरून ज्ञानू ओरडला.

'चला हो मंडळी, पानें तैय्यार.'

पानं वाढण्याचा हा दंगा होईपर्यंत आलेली सगळी पाहुणे मंडळी एकमेकांकडे पहात गुपचुप बसली होती. मधूनमधून भोंवतीं बसलेल्या मंडळींकडे पहात होती.

अंगणांत पोरेंटोरें दमून पडलीं होतीं. पलीकडे बायका दमून निजल्या होत्या. त्यांच्याकडे त्यांची दृष्टि मधूनच जात होती. पण कुणीच कांहीं बोलत नव्हतें. सगळ्यांच्याच तोंडावर कंटाळा होता. अतिश्रमाचा थकवा होता. डोळे लालसर होते.

ज्ञानूनें हांका मारल्यावर पुन्हां ती मंडळी एकमेकाकडे पाहूं लागली. कुणी उठण्याचें चिन्ह दिसेना, तेव्हां यशवंता मघांप्रमाणेंच अजीजीनें म्हणाला,

'आसं का हो पावणे ? उठा कीं, चार घांस खावा. कवांचीं पानं वाढून ठिवल्यात.'

मघांपासून मिशीवाला पाव्हणा तेवढा बोलत होता. बाकीचे मुक्यासारखे गप्पगप्प बसले होते. यशवंता एवढें अजीजीनें बोलल्यावर मात्र दुसऱ्याला कंठ फुटला. तो तुटकपणानें म्हणाला,

'नगं नगं. आमाला भूकच न्हाई.'

'वा ! आसं कुटं झालंय ?'

'खरंच भुका न्हायती ?'

केराप्पा म्हणाला, 'छ्या छ्या ! आसं न्हाई चालायचं हां, उठशिक. हातपाय धुवा. चला चला.'

यशवंतानें, केराप्पानें असा आग्रह चालवला, इतकी गडबड सुरू केली कीं पाव्हण्यांना कांहीं विचार करायलाहि वेळ मिळाला नाहीं. ते एकमेकांना

खुणावीत नुसतेच बघत राहिले. शेवटीं एकदांचे उठले. हातांतलें सामान खालीं ठेवून सगळ्यांनीं हातपाय धुतले. धोतराला पुसले आणि एका मागोमाग एक सगळेच पानावर बसले. भाताच्या डिखळांत आमटी ओतून त्यांनीं भात कालवायला सुरुवातहि केली.

जेवणाचा राडा उठला.

येशवंताच जातीनें समाचाराला उभा राहिला. कंदिलाच्या अंधुक उजेडांत तो आग्रह करूं लागला. ज्ञानू आणि बाकीची मंडळी वाढण्यांत गुंतली.

काशीनाथ गडी खांबाला टेकून लांब बसला होता. त्याच्या मनांत एकदम आलें कीं बत्तीला पिन मारावी. पेटली दहापांच मिनिटं तरी बरें. तेवढाच नीट उजेड पडेल. जेवणें व्यवस्थित होतील. मग उत्साहानें उठून त्यानें बत्तीला पिन मारली. तेल संपलेंच होतें. पण पिन मारल्यामुळें बत्तींतलें फूल एकदम झगमगलें. क्षणभर झकास उजेड पडला आणि मग बत्ती एकदम विझलीच.

पण बत्तीच्या उजेडांत अंगणांत पालावर जें दिसलें तें पाहून त्याला धसकाच बसला.

अंगणांत पालावर चारदोन कुऱ्हाडी, फरशा पडल्या होत्या. एक बंदूकहि होती.

जोत्याजवळ बसलेल्या संदिपानाला त्यानें डोळ्यानेंच खूण करून जवळ बोलावलें. आपण काय पाहिलें तें हळूंच सांगितलें, घाबरून जाऊन तो म्हणाला,

'स...संदिपान, आता रे ?'

संदिपान आश्चर्यानें म्हणाला,

'का ? काय झालं ?'

'हे सामान कुठनं आलं ?'

'कुठनं म्हंजे ? पाव्हण्यानीं आनलं आसंल.'

'कशापायी ?'

संदिपानानें त्याच्या पाठीवर थाप मारली. 'हट् मर्दा ! तुला भ्या वाटली व्हय ?'

'तर काय !'

'अरं, सातारकडचं पाव्हणं हायेती हे. त्यांचा नमुना आसाच !'

'आसं का ?'

'मग सांगतो काय —'

असें म्हणून संदिपान पुढें सरकला. एखादी गुप्त गोष्ट सांगावी तशा आविर्भावांत बोलला,

'लेका काशा, खुळा हायेस खुळा. मर्दा, ही सातारकडची मानसंच अशी. लई येडचा डोस्क्याची. फरशी–कुन्हाडीबिगर करमतच न्हाई भडव्यान्ला. मला इचार की.'

'आसं ?'

काशानें असा प्रश्न विचारला खरा. पण संदिपानानें इतक्या सहजपणें हें उत्तर दिलें होतें कीं, त्याचा निम्मा संशय दूर झाला होता.

'तर काय ! माझा मेव्हणा तकडचाच नव्ह का? सारखा गडी फरशीला धार लावत बसलेला आसतो. दुसरा धंदा न्हाई.'

'मग हाये. मग हाये.'

काशानें मान डोलवली. पण त्याला पुन्हां एक शंका आली.

'व्हय. तें खरं. पण ही बदूक कशापायी आणली आसंल ?'

'हूं : ! आरं ती उडवायची आसंल वरातीच्या टायमाला दारू ठासून.'

'पटलं.'

काशानें डोळे विस्फारून मान हलवली. आपल्या सगळ्या शंकाकुशंका दूर झाल्या हें त्यानें मान हलवून दाखवलें. मग त्याला आपल्या भेदरटपणाचेंच हंसूं यायला लागलें.

हा त्यांचा संवाद होईपर्यंत इकडे पाव्हण्यांचीं जेवणें आटोपलींसुद्धां. ज्ञानूनें आग्रह करकरून पोळ्या वाढल्या तेव्हां पाव्हणे मंडळी चांगलीच सुस्तावली. त्यांचीं पोटें जड झालीं त्यांना चांगलीच भूक लागली होती. केवळ भिडस्तपणानें ते नाहींनाहीं म्हणत होते, ही गोष्ट सगळ्यांच्या लक्षांत आली. आपण आग्रह करकरून त्यांना जेवायला बसवलें ही चांगली गोष्ट झाली, असें यशवंताला वाटलें. एवींतेवीं त्यांची भारीच गैरसोय झाली होती.

अवेळीं स्टेशनवरून चालत यावें लागलें. बैलगाड्या मिळाल्या नाहींत. आतां जेवायचाहि आग्रह आपण फार केला नसता तर ते खुशाल उपाशीपोटींच झोपले असते. आणि मग आमच्या पाव्हण्यांची गैरसोय केली म्हणून आपल्या चुलत्याला सोयऱ्यांकडच्या माणसांनीं चांगलींच नांवें ठेवलीं असतीं. चुलता आपल्या नांवानें ओरडला असता. तें सगळे टळलें हें बरें झालें.

हात धुवून मंडळी अंगणांत परत उतरली. लगबगीनें जागीं बसली. तेव्हां तितक्यात लगबगीनें यशवंतानें पानसुपारीची व्यवस्था केली. अडकित्यानें सुपारी भराभरा कातरून सगळ्यांना दिली. पानें वाटलीं. बाकीचें साहित्य पुढें केलें.

‘ घ्या, पावणे घ्या. अनमान नको. ’

सगळ्यांनीं मुकाट्यानें पानसुपारी घेतली. पुन्हां चुळबुळ करीत एकमेकांकडे पाहिलें. पान लावीत मिशीवाल्या पाव्हण्यानें सबंध घरभर नजर टाकली. रात्रभर जागून थकून गेलेल्या या मंडळींकडे पुन्हां पुन्हां निरखून पाहिलें. दिवसभराच्या उसाभरीनें लोळागोळा होऊन लवंडलेल्या बायकांकडे एकदां दृष्टी टाकली. पत्रावळीचा ढीग बघितला. अस्ताव्यस्त पडलेल्या लग्नाच्या सामानाकडे टक लाऊन पाहिलें. मग तंबाखूची चिमट हातांत धरून तो एकाएकीं उठलाच. घोगऱ्या आवाजांत म्हणाला,

‘ बराय, जातो आमी. ’ त्याच्या पाठोपाठ बाकीचे पाव्हणेहि पटापटा उठले.

यशवंता आश्चर्यानें म्हणाला,

‘ कां वो ? गरबड कां एवडी ?’

‘ उशीर झाला. जातो. ’

‘ थांबा की वो ? कुणीतरी मानूस देतों संगट वाडा दाखवायला.. तसंच कसं जाताय ?’

‘ वाडा ?–हां हां. हाय ठावं आमाला. जातो बराबर ! ’

‘ खरं म्हणताय का भिडंनं आपलं ?’

‘ भीड कसली ? जातो आमी नीट. ’

केराप्पा घाईनें म्हणाला,

‘ खंदिल देऊ का लावून एखादा ?’

'काय नगं. रामराम.'

'रामराम.'

आतां गार हवा सुटली होती. गारठा वाटत होता. बाहेर पडायला नकोच वाटत होतें. यशवंतानेंहि मग फार आग्रह केला नाहीं. त्याचें अंग दुखत होतें, डोळे जड होऊन पुन्हां मिटूं लागले होते. पाव्हण्यांनीं अंधारांतच आपलें सामान उचललें. हें पाहूनहि त्यानें तोंडांतून एक शब्द बाहेर काढला नाहीं. सगळे उठले. उघडच्या दिंडींतून भराभरा बाहेर पडले. त्या दाट अंधा-रांत दिसेनासे झाले. थोडा वेळ सगळ्यांच्या चालण्याचा आवाज तेवढा ऐकूं येत राहिला. मग सगळीकडे शांत शांत झालें.

पहांट व्हायला आली होती. गारठा आतां चांगला जाणवत होता. सगळ्यांची झोप पार उडाली होती. पण गारठ्यानें पुन्हां सगळ्यांचे डोळे जड झाले. आतां उजाडेपर्यंत घटकाभर बोलत वेळ काढावा म्हणून सगळेच घोळामेळानें पुन्हां बसले. कुणी धोतरें पांघरलीं.

ज्ञानूनें जोत्यावरचा कंदिल आणला.

उघडलेली दिंडी लावून घेऊन केराप्पा पालावर येऊन बसला. तो म्हणाला,

'पाव्हणं मुकंबिकं हायेती कारं ? एकजण मिशीवाला बाबा तिवढा बोलत हुता. बाकी आपलं गप. एक न्हाई आन् दोन न्हाई. काय बी इचारा.'

मघापासून सगळ्यांनांच कांहींतरी चमत्कारिक वाटत होतें. केराप्पानें त्याला तोंड फोडल्यावर सगळ्यांनाच बरें वाटलें. त्याचें बोलणें पटलें.

मोठ्ठी जांभई देत संदिपान म्हणाला,

'हीं सातारकडचीं मानसंच आसलीं. सदान्‌कदा फरशीकुऱ्हाड हातांत. आन् घुम. तोंडाला कुलूप.'

काशानें मान हलवली.

'व्हय व्हय. कसल्या फरशी-कुऱ्हाडी हुत्या संगट ह्येंच्या! मला तर पयल्यांदा भ्याच वाटली.'

यशवंताचे जड होऊन मिटूं लागलेले डोळे एकदम उघडले. दचकून सांवरीत तो म्हणाला,

'काय म्हणाला ? फरशी-कुऱ्हाड ?'

अनुक्रम 30497 विभाग वा. वा. क्रमांक 2464 नों. दि. 5/10/57 वाचनालय

'व्हय.'

'पाव्हण्यांच्याजवळ हुत्या ?

'आं: एक बंदूक सुदिक हुती कीं!'

'कशावरनं ?'

'म्यां समक्ष बघितलंय. ह्या हितंच हुती.'

काशाचें हें बोलणें ऐकल्यावर यशवंता केराप्पाकडे, ज्ञानूकडे पाहूं लागला. सगळेच एकमेकांकडे पाहूं लागले. विचित्र शांतता पसरली. लग्नाला आलेले पाहुणे आणि त्यांच्याजवळ फरशी–कुऱ्हाडी हा काय प्रकार आहे हें कुणालाच कळेना.

थोडा विचार करून शेवटीं यशवंता म्हणाला,

'आसल एखाद्या बारीला, काय त्यांत हाये ?'

पण कुणी कांहीं बोललें नाहीं. त्यामुळें यशवंताचाहि आपल्या बोलण्यावर विश्वास बसला नाहीं.

थोड्या वेळानें केराप्पा म्हणाला,

'ते समदं खरं. बग गड्या, आपुन सगळं झोपंतच. माज्या आतां लक्षांत आलं–'

'काय ?'

'एकातरी पाव्हण्याजवळ सामान हुतं का ? आं ?'

संदिपान मध्येंच म्हणाला,

'ही सातारकडची मानसंच आशी. कंदी भडवीच्यांजवळ सामायन नसतं. माजा मेव्हणा तर काय ? नुस्ता बोंबलत हिंडत आसतो.'

त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून यशवंता पुन्हां मोठ्यांदा म्हणाला,

'खरंच कीं लेकांच्याजवळ सामायन कसं नव्हतं बरं ? कायतरी घोटाळा दिसतोय.'

'घोटाळा कसला ?'

'घोटाळा न्हाई तर काय ? कुनी हानबिगार बोलतच न्हवतं. का बरं?'

केराप्पा पुन्हां आठवून बोलला,

'आन् बाया मानूस एक न्हवतं सबंद पुऱ्यांत. हें कसं काय ?'

'व्हय की !'

सगळेच पुन्हां एकमेकांकडे पाहूं लागले. हा काय प्रकार घडून आला असावा ? आलेलीं माणसें पाहुणेच होते ना ? का दुसरे कोणी होते ? पण दुसरे कोण ?

कुणाला कांहीं कळेना.

शेवटीं ज्ञानू म्हणाला,

'ही उगी आपली कल्पना तुमची. दुसरं कोण यायला लागलंय ह्या वक्ताला ? कुनी चोर, दरवडेखोर असते तर जेवले असते का हितं ? आं ? पाव्हणेच आसनार.'

'कशावरून ?'

'हातच्या कांकनाला आरसा कशाला ? त्या वाड्यांत जाऊन बगून येऊं या पाव्हणं तकडं आल्यात का न्हाईत त्ये. म्हंजे दोन मिटात निकाल !'

पण ज्ञानूचें हें बोलणें पुरें झालेंच नाहीं.

वाड्याच्या दरवाजापाशीं एकाएकीं बैलगाड्यांची खळबळ ऐकूं येऊं लागली. बैलांच्या गळ्यांतल्या चंगळ्यांचा आवाज स्वच्छ ऐकूं आला. दरवाजापाशीं थांबला. मग एकाएकीं दरवाजावर थाप पडली आणि लक्षुमण वाटेकऱ्याची हांक ऐकूं आली,

'दार उघडा हो येसवंतराव, पाव्हणं आल्याती.'

****

IRBK-0112956

IRBK-0112956